सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, २८ ऑगस्ट २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २८९ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# हिंदूंचे एकीकरण हेच लक्ष्य


## ● सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन ● त्रिदिवसीय संवाद कार्यक्रमाचे दुसरे सत्र

◆ **नवी दिल्ली, २७ ऑगस्ट**

संपूर्ण हिंदू समाजाला एक करण्याचे लक्ष्य आम्ही गाठत नाही, तोपर्यंत आम्हाला चालत राहायचे आहे आणि हे मैत्री, उपेक्षा, आनंद आणि करुणा चार मार्गदर्शक सिद्धांताच्या आधारेच शक्य आहे, असे प्रतिपादन रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी आज येथे केले. दैनंदिन जीवनात देशभक्तीचा अवलंब करत देशासाठी जगण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

रा. स्व. संघाच्या शताब्दीनिमित्त समाजाच्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांसाठी '१०० वर्षांची संघयात्रा, नवे क्षितिज' या शीर्षकाखाली राजधानी दिल्लीतील विज्ञान भवनात आयोजित त्रिदिवसीय संवाद कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी डॉ. मोहनजी भागवत संबोधित करत होते. व्यासपीठावर सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे, उत्तरक्षेत्र संघचालक पवन जिंदल आणि दिल्ली प्रांत संघचालक डॉ. अनिल अग्रवाल उपस्थित होते.

महात्मा गांधींनी ज्या सात पापांच्या शाश्वत धोक्यांचा इशारा दिला होता, त्याचा उल्लेख करत डॉ. भागवत म्हणाले की, आजच्या परिस्थितीत हा इशारा अधिक प्रासंगिक ठरू लागला आहे. हिंदू राष्ट्राचे जीवनलक्ष्य काय आहे, अशी विचारणा करत




### जागतिक व्यापार स्वेच्छेने व्हावा, दबावाने नाही

आंतरराष्ट्रीय व्यापार हा स्वेच्छेने झाला पाहिजे, दबावाने नाही, असे नमूद करत डॉ. मोहनजी भागवत म्हणाले की, शेजारी देशांशी आम्ही आपले संबंध सौहार्दपूर्ण केले पाहिजे. त्यांच्याही विकासाचा विचार केला पाहिजे, कल्याणाचा आणि सुरक्षितेचा आग्रह धरला पाहिजे. भारताची शेजारी देशांशी वागणूक ही मोठ्या भावासारखी राहिली पाहिजे.

### हिंदू हा विश्वाला शांती देणारा धर्म

जगात पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धानंतर तिसऱ्या महायुद्धाची स्थिती निर्माण झाली आहे, मात्र आंतरराष्ट्रीय संस्था शांततेचा तोडगा काढू शकल्या नाहीत, याकडे लक्ष वेधत डॉ. भागवत म्हणाले की, या जागतिक समस्यांतून धर्मसंतुलन आणि भारतीय दृष्टिकोन यातूनच तोडगा निघू शकतो. सर्व जण उपभोगवादाच्या मागे धावत असल्यामुळे स्पर्धा होते, त्यामुळे आपसात भांडणे होतात, त्यातून जग नष्ट होण्याची भीती निर्माण होते. मात्र आमची विचारधारा ही सर्वांच्या कल्याणाची आहे, धर्म हा सार्वभौमिक आहे आणि सृष्टीच्या उत्पत्तीपासून अस्तित्वात आहे. तुम्ही विश्वास ठेवा वा ठेवू नका, पण हिंदू धर्म विश्वाला शांती देणारा धर्म आहे. अनियंत्रित उपभोक्तावाद आणि भौतिकवादाने आमचा संयम आणि पारंपरिक मूल्यांवर घाला घातला आहे.

### पंचपरिवर्तनाचा केला आग्रही पुरस्कार

संघाच्या भविष्यातील वाटचालीची रूपरेषा विशद करताना डॉ. भागवत यांनी पंचपरिवर्तनाचा तपशीलवार आढावा घेतला. कुटुंबप्रबोधन, पर्यावरणाचे रक्षण, सामाजिक समरसता, आत्मनिर्भरता आणि संविधान तसेच कायद्याचे पालन करण्याचा आग्रह धरला. सगळ्या मानवी जिवांसाठी पाणी, मंदिर आणि स्मशान एकच असले पाहिजे. आज देशासाठी मरण्याची नाही तर २४ तास जगण्याची गरज आहे, असे हितोपदेश करत ते म्हणाले की, घरात पूजाघर चांगल्या ठिकाणी बनवले गेले पाहिजे. अडचणीच्या आणि गैरसोयीच्या ठिकाणी नाही. आम्ही राहू अथवा न राहू पण भारत देश राहिला पाहिजे, त्यानुसार सर्वांनी आपली वागणूक ठेवली पाहिजे. विश्वगुरुपदाचा अत्यंत नम्रपणे स्वीकार करत आपल्या आचरणातून त्याची प्रचीती आणून दिली पाहिजे, असे ते म्हणाले.

## विचारपुष्प



सेवा केल्याने मन शुद्ध होते आणि आत्मविश्वास वाढतो. आपल्याला नेहमी समाजसेवेसाठी पुढे यावे लागेल कारण स्वाभिमानी समाज उभा करणे हेच आपले कार्य आहे, स्वाभिमान तोच जो स्वतःच्या कर्तव्यावर स्थिर राहील.
**- कुप्पू. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

## आज ऋषिपंचमी



शेगावनिवासी संतश्रेष्ठ श्रीगजानन महाराज यांची आज पुण्यतिथी



मुख्यमंत्र्यांचे शासकीय निवासस्थान वर्षा येथे गणपती बाप्पाचे आगमन झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पत्नी अमृता फडणवीस

# विघ्नहर्त्याचे वाजतगाजत स्वागत

## देशावरील संकट दूर व्हावे यासाठी मुख्यमंत्र्यांचे साकडे

◆ **मुंबई, २७ ऑगस्ट**

सर्वत्र उत्साह आणि मंगलमय वातावणात दहा दिवसांच्या गणेशोत्सवाला बुधवारपासून प्रारंभ झाला. घरोघरी आणि सार्वजनिक मंडळांमध्ये गणरायाचे आगमन झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शासकीय निवासस्थानी श्रीगणेश विराजमान झाले. देशावरील संकटे दूर होऊ दे, असे साकडे त्यांनी गणेशाला घातले.

मुहूर्तावर बाप्पा विराजमान व्हावा, यासाठी सकाळपासूनच लगबग सुरू होती. मूर्ती खरेदी, पूजाविधी आणि सजावटीचे साहित्य खरेदी करण्यासाठी भाविकांनी बाजारपेठांमध्ये गर्दी केली होती. घरोघरी आणि लहान गणेश मंडळांनी मुहूर्त साधत मूर्तीची स्थापना केली. सुख, समाधान आणि नवचैतन्य देणाऱ्या बाप्पाचे आगमन झाले असून आता पुढील दहा दिवस भक्तिमय वातावरण सर्वत्र अनुभवायला मिळणार आहे.

मोठ्या मंडळांनी वाजतगाजत मिरवणुकीने बाप्पाला मंडपस्थळी आणले. रात्रीपर्यंत मूर्तींची स्थापना सुरू होती. गेल्या काही काळापासून अनुकूल वातावरण असल्याने मोठ्या प्रमाणात गणेशोत्सव साजरा केला जात आहे. राज्यात गणेशोत्सवाचा कालावधी वेगवेगळा आहे. दीड दिवस, तीन दिवस अथवा पाच दिवसांच्या गणपतीची स्थापना केली जाते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी गणेशाची स्थापना करण्यात आली. देश आणि राज्यावर आलेली संकटे दूर होऊ दे, अशी प्रार्थना मुख्यमंत्र्यांनी केली. (वृत्तसंस्था)

# गडचिरोलीत भीषण चकमक; चार माओवाद्यांचा खात्मा

## तीन महिलांचा समावेश, कोपर्शी जंगलातील घटना

◆ **आलापल्ली, २७ ऑगस्ट**

गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यात कोपर्शी जंगलात पोलिस आणि माओवाद्यांमध्ये बुधवारी सकाळी भीषण चकमक उडाली. या चकमकीत तीन महिलांसह चार जहाल माओवाद्यांचा खात्मा करण्यात आला. गडचिरोली-नारायणपूर सीमेवर ही चकमक उडाली.

गडचिरोली-नारायणपूर सीमेवरील कोपर्शी जंगल परिसरात गडचिरोली विभागाचे गट्टा दलम, कंपनी क्रमांक १० व इतर माओवादी दबा धरून बसले असल्याची विश्वासार्ह गोपनीय माहिती मिळाल्यानंतर अपर पोलिस अधीक्षक अभियान एम. रमेश यांचे नेतृत्वाखाली सी-६० ची १९ पथके आणि सीआरपीएफ क्युआरटीची दोन पथके सदर जंगल परिसरात रवाना करण्यात आली होती.

सदर भागात सुरू असणाऱ्या प्रचंड पावसादरम्यान दोन दिवसानंतर पोलिस पथके आज सकाळी सदर जंगल परिसरात पोहोचून शोध मोहीम राबवत असताना माओवाद्यांनी पोलिस पथकांवर अंदाधुंद गोळीबार सुरू केला, ज्याला पोलिस पथकाने प्रभावी प्रत्युत्तर दिले. सुमारे आठ तास चाललेल्या चकमकीनंतर सदर परिसरात शोध घेतला असता एकूण ४ जहाल माओवाद्यांचे मृतदेह (१ पुरुष आणि ३ महिला) मिळून आले आहेत. (तभा वृत्तसेवा)



घटनास्थळावरून जप्त करण्यात आलेल्या साहित्यासह पोलिस

### घटनास्थळावरून शस्त्रसाठा जप्त

घटनास्थळावरून १ एसएलआर रायफल, २ इन्सास रायफल व ३०३ रायफल जप्त करण्यात आले आहेत. उर्वरित माओवाद्यांचा शोध घेण्यासाठी माओवाद विरोधी अभियान सुरू असून अजून मृतांची संख्या वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## महत्त्वाचे




### टाटांनी सुरू केली नवी एआय कंपनी

**नवी दिल्ली** : देशातील सर्वांत मोठी आयटी सेवा देणारी कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसने (टीसीएस) एका नवीन आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आणि सर्व्हिस ट्रान्सफॉर्मेशन युनिट स्थापन केले आहे. अमित कपूर हे मुख्य एआय आणि सर्व्हिस ट्रान्सफॉर्मेशन ऑफिसर म्हणून याचे नेतृत्व करतील. सध्या कपूर इंग्लंड आणि आयर्लंडमधील टीसीएसच्या व्यवसायाचे नेतृत्व करत आहेत. त्याची जबाबदारी आता विनय संघवी यांच्याकडे सोपवली जाईल. महत्त्वाचे म्हणजे टाटाने टीसीएसच्या माध्यमातून आयटी क्षेत्रात दबदबा निर्माण केला असला तरी, आतापर्यंत त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात पाऊल टाकले नव्हते. मात्र, आता कंपनी या क्षेत्रातही उतरली आहे.

# कुत्रा चावल्याने विद्यार्थ्याचा मृत्यू

◆ **मुजफ्फरनगर, २७ ऑगस्ट**

भटक्या कुत्र्यांची पुन्हा एकदा मोठी दहशत पाहायला मिळत आहे. यामुळे अनेकांचे जीव जाऊ लागले आहेत. उत्तरप्रदेशातील मुजफ्फरनगर जिल्ह्यातून धक्कादायक घटना समोर आली आहे. कुत्रा चावल्यामुळे नववीच्या वर्गातील विद्यार्थी शिवाचा रेबीजने तडफडून मृत्यू झाला.

बुढाना कोतवाली परिसरातील चंधेडी गावातील रहिवासी असलेला १५ वर्षीय विद्यार्थी शिवाला एक महिन्यापूर्वी गावातील भटक्या कुत्र्यांनी चावा घेतला होता. पण भीतीमुळे विद्यार्थ्याने त्याच्या कुटुंबाला याबद्दल माहिती दिली नाही. ज्यामुळे मुलाला वेळेवर उपचार मिळू शकले नाहीत. (वृत्तसंस्था)

# जरांगेंना आझाद मैदानातील आंदोलनाला अखेर परवानगी

## पोलिसांनी घातल्या अटी

◆ **मुंबई, २७ ऑगस्ट**

मराठा आरक्षणाच्या प्रलंबित मागण्यांसाठी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांच्या मार्गदर्शनाखाली हजारो समाजबांधवांचा महामोर्चा अंतरवली सराटीतून बुधवारी सकाळी दहा वाजता मुंबईकडे रवाना झाला असतानाच दुसरीकडे आझाद मैदानातील आंदोलनाला परवानगी देण्यात आली आहे. फक्त एका दिवसासाठी संध्याकाळी सहा वाजेपर्यंत ही परवानगी देण्यात आली आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी ऐन गणेशोत्सवात जरांगे यांनी मुंबईत येऊन आंदोलन करण्याचा इशारा दिल्याच्या पृष्ठभूमीवर मुंबई हायकोर्टात दोन याचिका दाखल झाल्या आहेत. यातील पहिली याचिका एमी फाऊंडेशनचे अनिलकुमार मिश्रा, तर दुसरी याचिका वकील गुणरत्न सदावर्ते यांनी दाखल केली होती. या दोन्ही याचिकांच्या माध्यमातून जरांगेंच्या आझाद मैदानावरील उपोषणाला विरोध करण्यात आला होता.

मंगळवारी हायकोर्टाने मनोज जरांगे पाटील यांना मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणासाठी परवानगी नाकारत नवी मुंबई किंवा खारघर येथे उपोषणासाठी पर्याय दिला होता.

या पृष्ठभूमीवर बुधवारी मनोज जरांगेंच्या आंदोलनाला परवानगी देण्यात आली. ध्वनिक्षेपक आणि इतर आवश्यक परवानग्या घ्याव्या लागणार असून, गणेश विसर्जनाशिवाय रहदारीला अडथळा ठरणार नाही याची खबरदारी जरांगेंना घ्यावी लागणार आहे. मुंबईत आंदोलनाला परवानगी दिल्याबद्दल धन्यवाद, असे जरांगे म्हणाले. (वृत्तसंस्था)

# आज श्री संत गजानन महाराजांचा ११५ वा पुण्यतिथी उत्सव

◆ **शेगाव, २७ ऑगस्ट**

श्री संत गजानन महाराजांचा ११५ वा पुण्यतिथी उत्सव ऋषिपंचमी, गुरुवार २८ ऑगस्ट रोजी उत्साहात साजरा होत आहे. उत्सवाला २४ रोजी श्री गणेशयागाने प्रारंभ झाला. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन संस्थानच्या वतीने करण्यात आले.

यामध्ये श्री गणेश याग, पाच दिवस दररोज भजन, कीर्तन, प्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते. उद्या सकाळी १० वाजता श्री गणेश व वरुण यागाची पूर्णाहुती होईल. तत्पूर्वी सकाळी ७ ते ९ वाजेदरम्यान भरत बुवा पाटील म्हैसवाडीकर यांचे 'श्रीं'च्या समाधी सोहळ्यानिमित्त कीर्तन होईल. दुपारी 'श्रीं'ची रजत मुखवटा असलेली पालखी रथ, मेणा, पताकाधारी, टाळकरी-वारकरी व अश्वासह नगर परिक्रमेसाठी निघेल. सायंकाळी पालखी मंदिरात पोहोचल्यावर महाआरती व टाळकऱ्यांचे रिंगण होईल. २९ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता प्रमोदबुवा राहणे यांचे काल्याचे कीर्तन व दहीहंडीने पुण्यतिथी उत्सवाची सांगता होईल.

उत्सवानिमित्त 'श्रीं'च्या मंदिरावर करण्यात आलेल्या विद्युत रोषणाईने मंदिर उजळून निघाले आहे. महाराष्ट्रच नव्हे तर इतर राज्यातील शेकडो भजनी दिंड्या, हजारो वारकरी व लाखो भक्तांनी संत नगरीत हजेरी लावली आहे. (तभा वृत्तसेवा)

# भारत-अमेरिकेत चर्चेचे द्वार खुले

## ● दोन्ही बाजूंनी मिळाले संकेत

**नवी दिल्ली, २७ ऑगस्ट**

अमेरिकेच्या ५० टक्के टॅरिफची अंमलबजावणी बुधवारपासून सुरू झाली आहे. मात्र, भारत आणि अमेरिकेत व्यापार कराराबाबतची चर्चा बंद झालेली नाही. दोन्ही देशांनी चर्चेचे द्वार खुले ठेवले आहे, असे सरकारी सूत्रांनी सांगितले.

व्यापारावरील चर्चेबाबत दोन्ही देशांकडून सकारात्मक संकेत मिळत आहेत आणि यावर पुढे काम करण्याची गरज असल्याचे सूत्रांनी सांगितले. टॅरिफमुळे दोन्ही देशांतील व्यापारावर संकट निर्माण झाले आहे. मात्र, भारताबाबत सांगितले जाते, तितका प्रभाव पडणार नाही, असे सूत्रांनी सांगितले. भारताचा व्यापार केवळ अमेरिकेवर अवलंबून नाही. त्यामुळे घाबरण्याचे किंवा मोठे संकट येण्याची कोणतीही शक्यता नाही. कोणत्याही मोठ्या व्यापार संकटाचे संकेत दिसत नाही, असे सूत्रांनी सांगितले. अमेरिकेने टॅरिफ लादल्यानंतर भारत व अमेरिकेतील संवाद बंद झालेला नाही.

मात्र, भारताबाबत सांगायचे झाल्यास, या देशाने यापूर्वीही जागतिक अर्थव्यवस्थेचे फटके सहन केले आहे. त्यामुळे टॅरिफ संकटावर मात करण्यासाठी भारत सज्ज आहे.




भारतीय आयुर्विमा महामंडळ सादर करत आहे विशेष पॉलिसी पुनरूज्जीवन मोहिम विलंब शुल्क सवलती सह.
कालावधी 18/08/2025 ते 17/10/2025
त्वरा करा! ही संधी सोडू नका.
तुमचं विमा संरक्षण पुन्हा मिळवण्याची आणि त्याचा लाभ सतत मिळवत राहाण्याची संधी.

| एकूण देय प्रीमियम | % विलंब शुल्कात सवलत | सवलतीची कमाल मर्यादा* |
|---|---|---|
| ₹1,00,000 पर्यंत | 30% | ₹3000 |
| 1,00,001 ते 3,00,000 पर्यंत | 30% | ₹4000 |
| 3,00,001 आणि जास्त | 30% | ₹5000 |

*नियम आणि अटी लागू.
पॉलिसी अदा न केलेल्या पहिल्या प्रीमियमच्या तारखेपासून 5 वर्षांच्या आत पुन्हा सुरू करता येईल.
कृपया जवळच्या एलआयसी शाखेमध्ये किंवा एजंटला संपर्क साधा. आमच्या सोबत रहा. एलआयसीमध्ये स्वतःचा मोबाइल नंबर, ईमेल, एनईएफटी आणि पॅन नंबर अपडेट करा.
डाऊनलोड करा एलआयसी मोबाईल ॲप LIC digital | भेट द्या: licindia.in | कॉल सेंटर सेवा (022) 6827 6827 | IRDAI Regn No.: 512
अधिक माहितीसाठी आपल्या एजंटला/जवळच्या एलआयसी शाखेला संपर्क करा किंवा तुमच्या शहराचे नाव 56767474 ला SMS करा
आम्हाला फॉलो करा: LIC India Forever | आमचा व्हॉट्सॲप नं. 8976862090 बोला 'Hi'
बनावट फोन कॉल्सपासून आणि खोट्या/फसव्या ऑफर्सपासून सावध राहा. आयआरडीएआय किंवा त्यांचे अधिकारी विमा पॉलिसींची विक्री, बोनस जाहीर करणे किंवा प्रिमियमची गुंतवणूक, रकमा परत करणे यासारख्या विमा व्यवसायाशी संबंधित कोणत्याही कामकाजात सहभाग होत नाहीत, अशा प्रकारचे दूरध्वनी येणाऱ्या पॉलिसीधारकांनी अथवा संभाव्य ग्रहकांनी पोलिसांकडे तक्रार नोंदवावी. जोखीम घटकांवर, नियम व अटींवर अधिक माहिती मिळवण्यासाठी, कृपया विक्री समाप्त करण्यापूर्वी विक्री पुस्तिका काळजीपूर्वक वाचून घ्या.
LIC भारतीय आयुर्विमा महामंडळ LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA
प्रत्येक क्षणी तुमच्या सोबत
LIC/MI/2025-26/15/Mar

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# ‘दादू’ फॅमिलीसह राजच्या बाप्पाच्या चरणी; दोन्ही कुटुंबियात रंगल्या दोन तास गप्पा

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २७ ऑगस्ट-**

गेल्या दोन, अडीच महिन्यापासून राज्याच्या राजकारणाचे लक्ष वेधून घेतलेल्या उद्धव व राज या ठाकरे बंधूच्या मनोमिलनाचा तिसरा अंक बुधवारी पहावयास मिळाला. त्यासाठी निमित्त ठरले ते विघ्नहर्ता बाप्पाच्या आगमनाचे. उद्धव यांनी पत्नी रश्मी व पुत्र आदित्य ठाकरे यांच्यासह दादरमधील शिवतीर्थ या राज ठाकरे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या गणेशाचे दर्शन घेतले. दोन्ही कुटूंबियात सुमारे गप्पा रंगल्या. दोन्ही बंधुमध्येंही काहीवेळ चर्चा झाली. त्यांच्यातील या मनोमिलनामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ठाकरे गट व मनसे एकत्र असण्याची केवळ औपचारिकता शिल्लक राहिली असल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही दुपारी राज यांच्या घरी जाऊन गणेश मूर्तीचे दर्शन घेतले. गेल्या २ दशकापासून



एकमेकांचे कट्टर राजकीय वैरी असलेले उद्धव व राज ठाकरे यांच्यात पहिलीपासून हिंदी सक्ती विरोधाच्या निमित्याने स्नेहाचे बंध पुन्हा विणले जात आहेत. मराठी भाषेसाठी ५ जुलैला वरळीतील डोम येथे झालेल्या विजयी मेळव्यात दोघे एकत्र आले होते. राज यांनी शिवसेनेला 'जय महाराष्ट्र' केल्यानंतर त्यांची ही पहिलीच राजकीय भेट होती. त्यानंतर २७ जुलैला उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने राज ठाकरे त्यांच्या घरी गेले होते. त्यानंतर आज उद्धव राज यांनी दिलेल्या निमंत्रणानुसार पत्नी रश्मी व आदित्य यांच्यासमवेत दुपारी साडेबाराच्या सुमारास राजच्या घरी गेले.त्यांच्या घरी प्रतिष्ठापना केलेल्या श्रीच्या मूर्तीची सर्वानी दर्शन घेतले. यावेळी राज यांची आई, पत्नी शर्मिला, पुत्र अमित, कन्या, सुन आणि चंदू मामा उपस्थित होते. त्यांच्यात सुमारे २ तास कौटुंबिक गप्पा रंगल्या. त्यांनी दुपारचे जेवणही एकत्र केले. दरम्यानच्या काळात राज व उद्धव यांच्यात स्वतंत्र खोलीत थोडावेळ चर्चाही झाल्याचे समजते. दुपारी अडीचच्या सुमारास उद्धव व त्यांचे कुटूंबीय बंगल्यातून बाहेर पडले. यावेळी स्थानिक आ. महेश सावंत, मनसे नेते बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई आदी उपस्थित होते.

ठाकरे बंधूंच्या या वाढत्या सलगीमुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी दोन्ही पक्ष एकत्र येतील, यांची दोन्ही पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांना खात्री पटली असल्याचे सांगितले जात आहे.

### उद्धव २२ वर्षानंतर राजच्या घरी

गणेशोत्सवानिमित्त उद्धव ठाकरे आज तब्बल २२ वर्षानंतर आज राज ठाकरे यांच्या घरी गेले. यापूर्वी २००३ मध्ये श्रीकांत ठाकरे यांचे निधन झाले असताना ते कृष्णकुंज येथे निवासस्थानी जाऊन त्यांचे दर्शन घेतले होते. त्यानंतर काही वर्षांपूर्वी उद्धव ठाकरें यांच्यावर शस्त्रक्रिया झाल्यानंतर राज यांनी हॉस्पिटलमध्ये जाऊन त्यांची विचारपूस केली होती. त्यांचा डिस्चार्ज झाल्यानंतर राज गाडी चालवित मातोश्रीवर घेऊन आले होते.

### बाप्पांने दोघा बंधूंना एकत्र ठेवावे : मुख्यमंत्री

राज आणि उद्धव ठाकरे यांच्या आजच्या भेटीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले गणेशोत्सवानिमित्त दोन्ही भाऊ एकत्र येत असतील तर ती चांगली गोष्ट आहे. बाप्पा दोन्ही भावांना एकत्र राहण्याची सद्बुद्धी देवो. उद्धव निघून गेल्यानंतर काही वेळातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शिवतीर्थावर जाऊन राज यांच्या बाप्पाचे दर्शन घेणार आहे. दरम्यान, ठाकरे बंधूंनी एकत्र यावे, यासाठी गिरगाव परिसरात काही ठिकाणी पुन्हा एकदा दोन्ही भावांनी मराठी माणसाच्या हितासाठी एकत्र यावे, अशा आशयाचे पोस्टर्स लावण्यात आले आहेत

## महत्त्वाचे...



### साक्षात्कार गणपती मंडळाची मिरवणूक उत्साहात

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

स्वातंत्र सैनिक नगर सांस्कृतिक बहुद्देशीय युवक मित्र मंडळ संचलित साक्षात्कार गणपती मंडळाचे मिरवणूक मुली व मुलांचे लेझीम वाद्यासहित सत्यम हॉटेल कमटम वसाहतीपासून निघून स्वातंत्र्य सैनिक पर्यंत निघाली. यात सोसायटीतील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते. मंडळ स्थापनेच्या २० वर्षापासून आत्तापर्यंत डीजे मुक्त कार्यक्रम करण्यात आले. गणेश उत्सवात सांस्कृतिक, आध्यात्मिक, धार्मिक या कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. मिरवणूकीत अध्यक्षा रचना कट्टा, उपाध्यक्षा प्रेमा स्वामी, माजी अध्यक्षा संगीता पवार, मंडळाचे सर्व पदाधिकारी, सदस्य,तसेच संस्थेचे अध्यक्ष नरेंद्र दंतकाळे, सल्लागार लक्ष्मीकांत दंडी, स्वप्नील सातपुते, अभिलाष स्वामी उपस्थित होते.



### स्वातंत्र्य सैनिक नगर येथे सिमेंट कॉंक्रीटीकरण रस्त्याचा शुभारंभ

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

अनेक वर्षापासून कर्णिक नगर रिक्षा स्टाफ जवळील स्वातंत्र्य सैनिक गृह निर्माण सोसायटीतील वंचित असलेले रस्त्याचे काम शहर मध्य मतदारसंघाचे आमदार देवेंद्र कोठे यांनी आपल्या स्थानिक विकास निधीतून सिमेंट कॉंक्रीटीकरण मंजूर केले. त्या कामाचा शुभारंभ आमदार कोठे यांचे हस्ते झाला. यावेळी सोसायटीचे चेअरमन सुनील रसाळे, सचिव मोहन कट्टा, सदस्य मल्लिनाथ येळमेळी, प्रकाश आडके, बाबुराव क्षीरसागर, माजी नगरसेविका रामेश्वरी बिर्रु, राधिका पोसा, माजी नगरसेवक मेघनाथ येमूल, भाजपा मंडळ अध्यक्ष अक्षय अंजिखाने, बजरंग कुलकर्णी, दत्तात्रय पोसा, आनंद बिर्रु, लेबर फेडरेशन चेअरमन शंकर चौगुले, किरण भंडारे, स्वातंत्र्य सैनिक गृह सोसिटीतील संगीता पवार, सुमन कलशेट्टी, अंजली हैदेले, शुभांगी बनकर, सुनीता जाधव, राजेश धनुरे, सिद्राम कोरे, राकेश यांनाम, शारंगधर हैदेले, अमोल जाधव, अर्जुन कस्सा, बालाजी मामद्याल, अनिकेत कलशेट्टी, प्रमोद पवार, संजय आळंद, अंबादास पवार आदी उपस्थित होते.



### ओम स्कूल हत्तुरे नगरमध्ये गणारायाचे स्वागत

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

ओम इंग्लिश मीडियम स्कूल हत्तुरे नगर मध्ये श्री गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना ओंकार काशिनाथ मळेवाडी यांच्या हस्ते झाली. याप्रसंगी संस्थापिका रेखा काशिनाथ मळेवाडी व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. याप्रसंगी दिपाली बोरगावकर, सुनीता बिराजदार, पल्लवी पाटील, अनुराधा कुलकर्णी, अंबिका कुलकर्णी, माधवी गोरनाळे, सारिका लांबतुरे, सुलोचना इटकर, सुषमा भंडारे, रोहिणी माने, पूजा करजगीकर, विकास प्रधान, जयश्री घोडके, आनंद भूपाळे उपस्थित होते. गणरायाच्या आरतीनंतर विद्यार्थ्यांना प्रसाद वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



### ब्रह्मपुरीत नुकसानीचे महसूल विभागाने केले पंचनामे

**मंगळवेढा, दि. २७ ऑगस्ट-**

भीमा नदीला पूर आल्याने नदीकाठावरील शेतात पाणी घुसून पिकांचे मोठे नुकसान झाले. या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाने दिल्यानंतर पूर भागातील नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम सुरू आहे. दरम्यान ब्रह्मपुरी येथील कांदा ६ हेक्टर, उडीद १२ हेक्टर पिकांचे पंचनामे करण्यात आल्याची माहिती ब्रह्मपुरीचे तलाठी रोहिणी कारंडे यांनी दिली. मागील दोन आठवडयापुर्वी काठालगतच्या बागायत क्षेत्रात पसरलेल्या पाण्याचा फटका बागायत क्षेत्राला बसला होता. नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे अद्यापही सुरू आहेत. या सर्व नुकसानीचे प्रत्यक्ष तलाठी रोहिणी कारंडे, कृषी सहाय्यक प्रज्ञा कोळी, कोतवाल सुहासिनी देशमुखे आदिंनी नुकसानग्रस्त भागाना प्रत्यक्ष भेटी देवून विविध पिकांचे पंचनामे केल्याचे सांगण्यात आले.

# बोहाळीच्या उपसरपंचपदी माधवी कुसुमडे बिनविरोध



परीचारक गटाचे भास्करदादा कसगावडे यांच्या सर्व ग्रा. प . सदस्य यांनी सहकार्य केल्याने उपसरपंचपदी माधवी कुसूमडे यांची निवड झाली.

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२७ ऑगस्ट-**

तालुक्यातील बोहाळी ग्राम पंचायतीच्या उपसरपंचपदी आ. समाधान आवताडे गटाच्या माधवी कुसुमडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

बोहाळी ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदाच्या निवडीसाठी सरपंच शिवाजी पवार व ग्राम पंचायत अधिकारी म्हमाणे यांच्या उपस्थितीत मंगळवारी (दि.२६) सभा घेण्यात आली. यावेळी उपसरपंच पदासाठी माधवी कल्याण कुसुमडे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आल्याचे जाहीर करण्यांत आले. निवडीबद्दल त्यांचा ग्राम स्थांच्यावतीने सत्कार करण्यांत आला. गुलालाची उधळण करत आनंदोत्सव करण्यात आला. यावेळी सरपंच शिवाजी पवार, माजी उपसरपंच जगन्नाथ जाधव, बाळासाहेब जाधव, राणी जाधव, वैशाली शिंदे, ग्रा.पं. सदस्य राजेश कुसुमडे, आकाश चंदनशिवे, मोनाली घोडके, शुभांगी कुंभार तसेच नानासाहेब जाधव, विठ्ठल पाटील, मधुकर कुसूमडे, धर्मराज कुसूमडे, बंडु जाधव, जालिंदर कुसूमडे, पै.सतीश कुसुमडे, विक्रम चंदनशिवे, नागेश घोडके, सर्जेराव जाधव, अण्णा जाधव, बाळासाहेब जाधव, सुधाकर पाटील, पंजाब

# मुंबईला रवाना होण्याकरिता मराठा बांधवांची तयारी पूर्ण

### आज दहा वाजता निघणार ताफा

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

मराठा आरक्षणाकरिता २९ ऑगस्ट रोजी मुंबईला रवाना होण्याकरिता सोलापूर मधील लाखो समाज बांधवांची तयारी पूर्ण झाली असून गुरुवारी सकाळी दहा वाजता सोलापूर जिल्ह्यातील लाखो मराठ्यांचा ताफा मुंबईच्या दिशेने रवाना होणार आहे. मोर्चात निघणाऱ्या वाहना करिता स्टिकर आणि भगव्या टावेल यांची वाटप सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आले.

मराठा समाजाला ओबीसी मधूनच आरक्षण देण्यात यावे आणि सग्या सोयऱ्यांचा जीआर काढण्यात यावा अशा मागण्याकरिता मराठा समाजाच्या वतीने मुंबईच्या दिशेने आगेकूच करण्यात येत आहे. सोलापूर शहर आणि जिल्ह्यामधून लाखो मराठा बांधवांसह किमान २५००० वाहने मुंबईच्या दिशेने रवाना होतील या वाहनांमध्ये मोटरसायकल जीप टेम्पो ट्रक ट्रॅक्टर ॲम्बुलन्स पाण्याचे टँकर अशा हजारो वाहनांचा समावेश असणार आहे. २८ ऑगस्टच्या मुंबई आंदोलनासाठी सर्व समाज बांधव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून मुंबईच्या दिशेने निघणार आहेत. चार हुतात्मा, राजमाता अहिल्यादेवी होळकर, छ. शिवाजी महाराज, छ. संभाजी महाराज या महापुरुषांना अभिवादन करून सर्व समाज बांधव दुचाकी व चारचाकीने निघणार आहेत.



सोलापूर : जरांगे पाटीलचे काही समर्थक बुधवारी रात्री मुंबईला सिद्धेश्वर एक्सप्रेसने रवाना झाले.


# मंगळवेढा शहर व ग्रामीण भागात घरोघरी तसेच विविध मंडळाकडून श्री गणरायाचे उत्साहात स्वागत

## गणेश मिरवणुकीदरम्यान डॉल्बीचा घुमणारा आवाज यंदा झाला हद्दपार...


**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. २७ ऑगस्ट-**

मंगळवेढा शहर व ग्रामीण भागात घरोघरी तसेच १२६ गणेशोत्सव मंडळानी मोठया उत्साहात वाजतगाजत गणरायाचे स्वागत करून श्री ची स्थापना केली.

दरम्यान पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी डॉल्बीमुक्तीचा संदेश दिला होता. याला मंगळवेढयात गणेश मंडळानी प्रतिसाद देत डॉल्बी हद्दपार करून मिरवणुकीने श्री गणरायाचे स्वागत केले. घरोघरी कुटुंबियानी तसेच विविध मंडळानी पुजाअर्चा करून स्वागत केले. मंगळवेढयात गणेश विहीर जवळ व्यापाऱ्यांनी मुर्ती विक्रीचा स्टॉल लावल्याने मुर्ती खरेदी साठी मोठी गर्दी होती. वरूणराजानेही आज सुट्टी दिल्याने गणेशभक्तामध्ये प्रचंड उत्साह होता. वाहतुक कोंडी होवूनही याची खबरदारी



घेत पोलिस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांनी शहराच्या मुख्य रस्त्यावर बॅरीगेट लावून वाहतुक अन्य मार्गाने वळवल्यामुळे वाहतुकीची कोंडी टळल्याचे चित्र होते. श्री गणरायाच्या आगमनानिमित्त पोलिस अधिकारी-५, सहाय्यक पोलिस निरीक्षक-२, पोलिस उपनिरीक्षक-२, पोलिस अंमलदार-३०, होमगार्ड-५१, स्टॉकिंग फोर्स-१ असा चोख पोलिस बंदोबस्त डी.वाय.एस.पी.डॉ.बसवराज शिवपुजे यांच्या मार्गदर्शनाखाली ठेवण्यात आला होता. ऑनलाईन मंडळाचे परवाने असल्याने बुधवारी सायं.४ पर्यंत १२६ मंडळाचे अर्ज प्राप्त झाल्याची माहिती गोपनीय विभागाचे पोलिस हवालदार दिगंबर गेजगे यांनी दिली. दरम्यान गतवर्षी १९० मंडळानी परवाने काढले होते. यंदा यामध्ये घट झाल्याचे दिसून येत आहे. श्री गणरायाचे आगमनानिमित्त घरोघरी सकाळपासूनच स्वच्छता मोहिम महिलांनी हाती घेवून घराच्या अंगणात सडा रांगोळी करण्यात आली होती. मुर्ती आणून घराच्या अंगणात आगमनानिमित्त श्री ची पुजाअर्चा करून घरात प्रवेश केला तदनंतर घराच्या हॉलमध्ये श्री गणरायाची प्रतिष्ठापना करून त्यांची आरती करण्यात येवून मोदकांचा नैवेद्य दाखवण्यात आला.



### सैनिकाने उरकले साखरपुड्यातच लग्न

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२७ ऑगस्ट-**

विवाह समारंभ मध्ये होणारा खर्च टाळून साखरपुड्यातच विवाह करावा अशी संकल्पना नेते संजय (अण्णा) क्षीरसागर यांनी मांडली त्यामुळे साखरपुड्यातच सैनिकाचे लग्न लागले हा आनंददायी सोहळा बुधवारी गणेश आगमनाच्या दिवशी संपन्न झाला.

मोहोळ तालुका भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष सोहाळे येथील माऊली अण्णा जगताप यांचे भाचे व स्व.गणपत पाटील माचणूर यांचे चिरंजीव सुजित आणि देगाव (वा) येथील सत्यवान दगडे यांची कन्या चि.सौ.का.भागीरथी या नवदांपत्यांचा साखरपुडा सोहळा होता. परंतु विवाहाचा खर्च टाळून दगडे आणि पाटील परिवाराच्या संमतीने साखरपुडा समारंभातच विवाह पार पाडावा अशी समाज हिताची संकल्पना लोकसेवक संजय क्षीरसागर व भाजपाचे माजी अध्यक्ष माऊली अण्णा जगताप, सतीश पाटील यांनी मांडली. दोन्ही परिवारांनी यास संमती दिली. विशेष म्हणजे नवरदेव सुजित यांनी मुलीच्या वडिलांचा लग्नाचा खर्च वाचवण्यासाठी मोठ्या मनाने संमती दिली. यावेळी नामदेव जगताप, अमोल पाटील, बाळासाहेब वाघमोडे, भाऊसाहेब जगताप उपस्थित होते.



### लष्कर विभाग मध्यवर्ती मंडळाकडून गणरायाची स्थापना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

लष्कर मध्यवर्ती गणेशोत्सव महामंडळाच्या गणरायाचे आगमन मंडळाच्या कार्यालयात वाजत गाजत मिरवणूक काढून स्थापना करण्यात आली.

मंडळाचे संस्थापक प्रकाश पारसवार, देवेंद्र भंडारे, अब्राहम कुमार, लक्ष्मणसिंग बंबेवाले यांच्या उपस्थितीत जिल्हा सरकारी वकील ॲड. डॉ. प्रदिपसिंग राजपूत यांच्या हस्ते स्थापना करण्यात आली.

यावेळी अध्यक्ष सागर शिंगे, सचिव सुरेंद्रसिंग शिवशिगवाले, ट्रस्ट अध्यक्ष रामचंद्र मोतीवाले, शिवाजी बनसोडे, रवि माने, गणेश बुरहाणपुरे, वैभव पाटील, कुमार जंगडेकर, जगन्नाथ सज्जन, मनुसिंग बाबावाले, मोहनसिंग बंबेवाले, प्रविण वाडे, मोहन जमादार, राजेश मिनगुले, नागेश म्हेत्रे, राहुल आळसंदे, नितीन मुकारे, अनंत गोडलोलू, श्रीनिवास म्हेत्रे, भारतसिंग बडुरवाले, रवि कैय्यावाले, सुरेश पाटोळे, लखन गायकवाड, अभिजीत भंडारे, आनंद पलोलू, परशुराम सतारेवाले, तुषार शिंगे, अशोक बोकेवाले, सालोमन

# महिलांद्वारे शिवसेनेची आणखी ताकद वाढवणार

## राज्य समन्वयक अनिता माळगे : जिल्हा दौऱ्यातून राज्यात प्रवास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ ऑगस्ट-**

शिवसेना शिंदे गटाच्या महिला सक्षमीकरण विभागाच्या वतीने महिलांचे संघटन अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न असून त्याद्वारे शिवसेनेची राज्यात अधिक ताकद दिसेल असे प्रतिपादन महिला सक्षमीकरणच्या राज्य समन्वयक अनिता माळगे यांनी केले.

या विभागाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण अधिक मजबूत करण्यासाठी तसेच महिलांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी राज्य समन्वयक माळगे यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील सर्व जिल्ह्यातून आढावा बैठका घेण्यात येत आहेत. त्याची सुरवात कोल्हापूर येथून झाली. त्यानंतर सांगलीती बैठक होऊन



आता हा दौरा सोलापूर जिल्ह्यात आहे. यावेळी अनिता माळगे यांच्यासह शीतल म्हेत्रे, प्रियांका परांडे,वर्षा चव्हाण, पूजा चव्हाण, वैशाली हावनूर, निशा ढोकणे, शशिकला कसपटे, अनिता गवळी, रुपारणी चव्हाण, नीता शिंदे, वर्षा म्हेत्रे, अंजना चव्हाण, गौतमी लोंढे. गंगाबाई स्वामी, जयश्री कोलारी व इतर महिला पदाधिकारी यांची उपस्थिती होती. महिला शिवदूत व महिला बचत गटाची सक्षम बांधणी करणे यावर भर देण्याचे ठरले. नाबार्ड, कृषी विभाग, आत्मा विभाग, कृषी विज्ञान केंद्र, उमेद, माहीम, स्मार्ट प्रकल्प केंद्र व राज्याच्या विविध योजना तळागाळात पोहचवून महिलांना सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने शिवसेनेचे पहिले पाऊल असल्याचे माळगे यांनी मार्गदर्शन केले.

महिलांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी पक्ष व सरकार त्यांच्या पाठीशी असल्याचा विश्वास देणे, महिलांना रोजगार व तांत्रिक प्रशिक्षण देणे, महिलांना शासन व बँकेकडून आर्थिक भांडवल उपलब्ध करून देणे करिता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनखाली ॲप निर्मिती करून महिलांना एका लिंक माहिती असणार आहे. थेट लाभ महिलांना मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# भाद्रपदात नद्यांनी धारण केले उग्ररूप



ओडिशातील बालासोर जिल्ह्यात सुवर्णरेखा नदीचे पाणी नागरी वस्तीत घुसल्याने नागरिकांना बोटीच्या मदतीने बाहेर काढले जात आहे




काश्मीर खोऱ्यात झेलम नदीचे पाणी अनंतनागमध्ये शिरले आहे. वेगवान प्रवाहामुळे नदीवरील पूल वाहून गेला



गंगेचे विशाल पात्रही पुराच्या पाण्याला पुरले नाही. तीर्थक्षेत्र प्रयागराजच्या छोटा बाघडा भागाला पुराने वेढले आहे

## सुवर्णरेखा, गंगा, यमुना, झेलम, चिनाब, सतलज, बियास नद्यांचा कहर

**नवी दिल्ली : श्रावणात देशाच्या पूर्व आणि उत्तर भागात धुमाकूळ घातल्यानंतर भाद्रपदात वरुणराजाची वक्रदृष्टी पुन्हा उत्तरेसह पश्चिम भागाकडे वळली आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने ओडिशा, उत्तर प्रदेश, राजस्थान, हिमाचल, उत्तराखंड, पंजाब आणि जम्मू-काश्मीर या राज्यांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले. जम्मूमध्ये तावी नदीने उग्ररूप धारण केले आहे. नदीच्या काठावरील शेकडो घरे वाहून गेली आहेत. वैष्णोदेवी येथे ढगफुटीनंतर आलेल्या पुरामुळे प्रचंड वित्तहानी आणि जीवितहानी झाली. बुधवारपर्यंत मृतांचा आकडा ३४ पर्यंत पोहचला होता. ओरिसात सुवर्णरेखा नदीचे पाणी वस्त्यांमध्ये घुसले. उत्तर प्रदेशात गंगानदीचे पाणी प्रयागराजच्या अनेक भागांत घुसले आहे. सतलज,बियास, रावी नद्यांना आलेल्या पुराने पंजाबात बिकट स्थिती निर्माण झाली आहे. झेलम, चिनाब नद्यांनी आक्राळविक्राळ रूप धारण केले अनेक घरे, पूल आणि रस्ते वाहून गेले आहेत.**

# प्रदीर्घ संघर्षासाठी सज्ज राहावे

## राजनाथसिंह यांचे आवाहन | स्वावलंबन ही काळाची गरज

◆ **महू, २७ ऑगस्ट**

अभूतपूर्व भूराजककीय वातावरण पाहता सशस्त्र दलांनी अल्पकालीन संघर्षापासून ते पाच वर्षांच्या युद्धासारख्या सर्वच सुरक्षा आव्हानांसाठी सज्ज राहावे, असे संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी बुधवारी सांगितले.



भारताला कुणाचीही जमीन नको, पण आपली प्रादेशिक एकता जपण्यासाठी कोणत्याही पातळीवर जाण्यास भारत तयार आहे, असे राजनाथसिंह यांनी येथील आर्मी वॉर कॉलेजमध्ये आयोजित 'रण संवाद' या कार्यक्रमात संबोधित करताना सांगितले.

आजच्या युगात युद्ध अचानक सुरू होते. त्यामुळे कोणते युद्ध कधी संपेल आणि ते किती काळ सुरू राहील याचा अंदाज बांधणे अतिशय कठीण आहे. त्यामुळे भारतीय लष्कराने प्रत्येक परिस्थितीला तोंड देण्यासाठी सज्ज राहावे. राष्ट्रीय सुरक्षा हा आता लष्कराचा विषय राहिलेला नाही, तर तो संपूर्ण राष्ट्राच्या दृष्टिकोनाचा मुद्दा बनला आहे, असे राजनाथसिंह यांनी सीडीएस अनिल चौहान, वायुदलप्रमुख ए. पी. सिंग आणि नौदलप्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांच्यासह भारताच्या वरिष्ठ उच्च लष्करी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सांगितले.

### युद्ध जिंकण्यासाठी शस्त्रसाठा पुरेसा नाही

सायबर युद्ध, कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन आणि उपग्रह आधारित पाळत ठेवणे हे भविष्यातील युद्धांना आकार देत असल्याने सैनिकांची संख्या किंवा शस्त्रास्त्रांचा साठा आता पुरेसा राहिलेला नाही. अचूक दिशादर्शक शस्त्रे, रिअल-टाईम इंटेलिजन्स आणि माहिती आता कोणत्याही संघर्षात यशाचा आधारस्तंभ बनली आहे, असे राजनाथसिंह यांनी सांगितले. ■

'ऑपरेशन सिंदूर'मध्ये सहभागी असलेल्या तिन्ही दलांचे त्यांनी कौतुक केले आणि हे भारताच्या स्वदेशी मंच, उपकरणे आणि शस्त्रास्त्र प्रणालींच्या यशाचे एक उत्तम उदाहरण म्हणून उदयास आले आहे. येणाऱ्या काळात स्वावलंबन ही एक अत्यंत गरज आहे, हे त्यांच्या कामगिरीने पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. आपण खरोखरच स्वावलंबनाच्या मार्गावर लक्षणीय प्रगती केली आहे. परंतु, अजून बराच पल्ला गाठायचा आहे, असे राजनाथसिंह म्हणाले. 'ऑपरेशन सिंदूर'चे यश हे शौर्याचे आणि वेगवान कारवाईचे सर्वोत्तम उदाहरण आहे. अशी घणाघाती कारवाई होईल याचा विचार दहशतवाद्यांनी कधीच केला नव्हता, असे राजनाथसिंह म्हणाले.

(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### मनोज वाजपेयीसोबत झळकणार 'हास्यजत्रे'तील ओंकार राऊत

**मुंबई** : 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'मध्ये झळकणारा अभिनेता ओंकार राऊतची हिंदी वेबसीरिजमध्ये वर्णी लागली आहे. 'इन्स्पेक्टर झेंडे' असे या सीरिजचे नाव आहे. सत्या घटनेवर आधारित ही सीरिज नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार असून यात मुख्य भूमिकेत अभिनेता मनोज वाजपेयी आहे. याचे पहिले पोस्टर नुकतेच समोर आले आहे. त्यात भाऊ कदम, गिरीज ओक आणि हरीश दुधाडे हे मराठी कलाकार दिसत आहेत. त्याच रांगेत ओंकार राऊतही दिसतोय्. यातील ओंकारची नेमकी भूमिका काय, हे अद्याप समोर आले नसून ही सीरिज ५ सप्टेंबरपासून पाहता येणार आहे. ■



### मनोरंजन जगतातील कलाकारांकडे बाप्पांचे जल्लोषात स्वागत



**मुंबई** : गणेश चतुर्थी हा मराठी, हिंदी मनोरंजन जगतातील सर्वात आवडत्या सणांपैकी एक मानला जातो. दरवर्षी या खास प्रसंगी सेलिब्रिटी मोठ्या थाटामाटात त्यांच्या घरी बाप्पाचे स्वागत करतात. मंगळवारी, गणेश चतुर्थीच्या एक दिवस आधी, अनेक बॉलिवूड आणि टीव्ही सेलिब्रिटी गणपतीची मूर्ती घेण्यासाठी मुंबईतील मूर्ती केंद्रात पोहोचले. त्यात अंकिता लोखंडे, सोनू सूद, भारतीसिंह, हंसिका मोटवानी आदींचा समावेश होता. अभिनेता स्वप्नील जोशीकडेही बाप्पांचे दणक्यात स्वागत झाले. जवळपास प्रत्येक सेलिब्रिटीने आपल्याकडील बाप्पांचे फोटो समाज माध्यमांवर शेअर केले आहेत. विशेष म्हणजे, दरवर्षी अतिशय धडाक्यात गणेशोत्सव साजरा करणाऱ्या शिल्पा शेट्टीकडे यंदा गणपती बसलेला नाही. कुटुंबातील एकाच्या निधनामुळे यंदा तिच्याकडे बाप्पांचा उत्सव साजरा होत नाहीय. मात्र, याविषयी तिने दु:ख व्यक्त केले असून यंदा बाप्पांशिवाय घर अपूर्ण वाटत असल्याचे म्हटले आहे. ■

### 'सैयारा' फेम अनिताला मिळाला यशराजचा चित्रपट

**मुंबई** : 'सैयारा' या चित्रपटाने यंदा तरुणाईला चांगलेच वेड लावले. त्यामुळे यातील कलाकारही प्रसिद्धीच्या झोतात आले. यातील मुख्य भूमिकेत झळकलेली अभिनेत्री अनिता पड्डा लवकरच आणखी एका प्रेमकथेत दिसणार आहे. 'बँड बाजा बारात' फेम दिग्दर्शक मनीष शर्मा अनितसोबत एक रोमँटिक चित्रपट बनवणार आहेत. अनितचा हा चित्रपट यशराज फिल्म्स निर्मित करणार आहे. करिअरच्या सुरुवातीलाच तिला यशराजसारख्या बॅनरचा चित्रपट मिळणे, ही फार मोठी बाब मानली जात आहे. अनितचा हा रोमँटिक चित्रपट पंजाबवर आधारित असेल. त्याचबरोबर चित्रपटाचे चित्रीकरण २०२६ च्या पहिल्या सहामाहीत सुरू होईल. चित्रपटात अनितच्या विरुद्ध कोण असेल याबद्दल अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. ■



# अमेरिकी टॅरिफची अनिश्चितता भांडवली खर्चाच्या निर्णयात अडथळा

## क्रिसिलचा अंदाज

◆ **कोलकाता, २७ ऑगस्ट**

अमेरिकी टॅरिफभोवती असलेली अनिश्चितता चालू आर्थिक वर्षात भांडवली खर्चाच्या निर्णयांमध्ये एक नवीन अडथळा ठरू शकते, असे पत मानांकन संस्था क्रिसिलने बुधवारी म्हटले.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाच्या तेल खरेदीसाठी भारतावर लादलेला अतिरिक्त २५ टक्के कर बुधवारपासून लागू झाला. यामुळे भारतावर लादललेले एकूण शुल्क ५० टक्क्यांवर पोहोचले आहे. सरकार आतापर्यंत गुंतवणूक वाढवत असून, खाजागी कंपन्यांचा भांडवली खर्च मंदावला आहे, असे क्रिसिलने म्हटले आहे.

निरोगी कॉर्पोरेट ताळेबंद नवीन गुंतवणुकीला पाठिंबा देत असतानाही शुल्क लादल्याने भावनांवर परिणाम होण्याची शक्यता आहे, असे क्रिसिलने अहवालात म्हटले आहे. सध्याच्या अनिश्चित वातावरणात मुक्त व्यापार करार टॅरिफ अडथळे कमी करून आणि अंदाजे व्यापार धोरणे स्थापित करून गुंतवणूकदारांचा विश्वास वाढवू शकतात, असे क्रिसिलने स्पष्ट केले. २४ ऑगस्टपर्यंत भारतावरील अमेरिकेचे शुल्क बांगलादेश, व्हिएतनाम आणि इंडोनेशियावरील शुल्कांपेक्षा जास्त आहे.

विस्तृत अर्थशास्त्रीय निकषांनुसार भारतीय खाजगी सेक्टरमध्ये सराकारात्मकता असतानाही ते या टॅरिफमुळे मागे जात आहे, त्यामुळे जागतिक पुरवठा श्रृंखलेत अडचणी निर्माण होत असून, भूराजकीत तणाव वाढत आहे, असे या अहवालात म्हटले आहे. ब्रिटनसोबतच्या व्यापार करारामुळे आणि कार्पोरेट घराण्यांच्या गुंतवणूक क्षमतेमुळे या संधी निर्माण होतात. (वृत्तसंस्था)


# गुजरातमधील बेनामी पक्षांना ४३०० कोटी रुपये कुठून आले?

## राहुल गांधींचा पुन्हा निवडणूक आयोगावर प्रहार

◆ **नवी दिल्ली, २७ ऑगस्ट**

गुजरातमधील अज्ञात राजकीय पक्षांना मिळालेल्या ४३०० कोटी रुपयांच्या देणग्यांबाबत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बुधवारी निवडणूक आयोगाला प्रश्न विचारला. त्यांनी एका वृत्तवाहिनीचा एक अहवाल शेअर केला आणि म्हटले की या १० पक्षांनी एवढी मोठी देणगी घेतली पण खर्च फक्त ३९ लाख रुपये दाखवला.

त्यांनी एक्सवर लिहिले, गुजरातमध्ये काही निनावी पक्ष आहेत ज्यांचे नाव कोणीही ऐकले नाही, परंतु



त्यांना ४३०० कोटी रुपयांच्या देणग्या मिळाल्या. या पक्षांनी फार कमी वेळा निवडणुका लढवल्या आहेत किंवा त्यावर खर्च केला आहे.

हे हजारो कोटी कुठून आले? ते कोण चालवत आहे? आणि पैसे कुठे गेले? निवडणूक आयोग चौकशी करेल का की येथेही प्रतिज्ञापत्र मागवेल? की हा डेटा लपवता यावा म्हणून कायदाच बदलेल?

राहुल गांधी सध्या बिहारमध्ये १६ दिवसांच्या मतदार हक्क यात्रेवर आहेत. ही यात्रा १,३०० किमी पेक्षा जास्त अंतर कापेल आणि २० जिल्ह्यांमधून जाईल आणि १ सप्टेंबर रोजी पाटणा येथे संपेल. यात्रेदरम्यान, काँग्रेस आणि राजद नेत्यांनी मतदार यादीतील अनियमितता आणि मत चोरीचे आरोप केले आहेत. त्यांच्या समवेत तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन हेही उपस्थित होते. (वृत्तसंस्था)

## त्रिपुरात शस्त्रसाठा जप्त

◆ **आगरतळा, २७ ऑगस्ट**

पश्चिम त्रिपुरा जिल्ह्यात चार पिस्तूल आणि सात मॅग्झिन्स जप्त करण्यात आले, असे पोलिसांनी बुधवारी सांगितले. प्राप्त झालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे मंगळवारी रात्री अमताली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मध्यपारा परिसरातील एका घरावर छापा टाकून पोलिसांनी हा शस्त्रसाठा जप्त केला, असे पोलिस अधीक्षक नमित पाठक यांनी सांगितले. हे घर दीपंकर सेन नावाच्या कुख्यात गुन्हेगाराचे आहे. त्याच्याविरुद्ध शस्त्रास्त्र कायद्याच्या अंतर्गत अनेक गुन्हे दाखल आहेत, असे पाठक यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# भारताने पुन्हा पाकिस्तानला दिला पुराचा इशारा

◆ **नवी दिल्ली, २७ ऑगस्ट**

तावी नदीला पूर येण्याची मोठी शक्यता असल्याचा इशारा पाकिस्तानला दिला आहे. उत्तरेकडील राज्यांमध्ये सतत पाऊस पडतअसल्याने प्रमुख धरणांमधून अतिरिक्त पाणी सोडावे लागत आहे. त्यामुळे तावी नदीला पूर येण्याची शक्यता असल्याचे सूत्रांनी बुधवारी सांगितले.

परराष्ट्र व्यवहार मंत्रालयामार्फत पाकिस्तानला देण्यात आलेल्या इशाऱ्यामागे मानवतादी कारण असल्याचे सूत्रांनी सांगितले. यापूर्वी पहिला इशारा सोमवारी देण्यात आला होता. आम्ही मंगळवारी आणि बुधवारी तावी नदीत पूर येण्याची शक्यता असल्याचा आणखी एक इशारा जारी केला आहे. भारतीय भागांत अतिवृष्टी झाल्याने काही धरणांचे दरवाजे उघडावे लागले, असे एका सूत्राने सांगितले.



हिमालयातून उगम पावल्यावर पाकिस्तानच्या चिनाब भागात जाण्यापूर्वी तावी नदी जम्मू विभागातून जाते. २२ एप्रिल रोजी पाकिस्तानी दहशतवाद्यांनी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे २६ जणांची हत्या केल्यानंतर, सिंधू जल कराराच्या अंतर्गत भारताने पाकिस्तानसोबत जलविज्ञानविषयक डेटाची नियमित देवाणघेवाण थांबवली.

स्थगिती असूनही सीमेपलीकडील जीवित आणि मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी नवीन पूर इशारा देण्यात आला, असे सूत्रांनी सांगितले. पंजाबमध्ये सतलज, बियास आणि रावी नद्या आणि हंगामी नाले दुथडी भरून वाहत आहेत.कारण, त्यांच्या पाणलोट क्षेत्रा मुसळधार पाऊस पडत आहे.

जम्मूमध्येही सततच्या पावसामुळे नद्या तुडुंब भरून वाहत आहेत. पाण्याची पातळी धोकादायकरीत्या वाढत असल्याने अधिकाऱ्यांकडे प्रमुख जलाशयांचे दरवाजे उघडण्याशिवाय पर्याय उरला नाही. १९६० मध्ये स्वाक्षरी झालेल्या आणि जागतिक बँकेच्या मध्यस्थीने झालेल्या सिंधू पाणी कराराने भारत आणि पाकिस्तानमधील नदीच्या पाण्याच्या वाटपाचे दीर्घकाळ नियमन केले आहे. (वृत्तसंस्था)

## कर्जापायी कुटुंबाची आत्महत्या

◆ **शहाजहांपूर, २७ ऑगस्ट**

कर्जामुळे एक कुटुंब उद्ध्वस्त झाले. पती, पत्नीने आपल्या चार वर्षाच्या मुलाला विष दिले. त्याचा मृत्यू झाल्यानंतर दोघांनी वेगवेगळ्या खोलीमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेने खळबळ उडाली आहे. पोलिसांना मयताच्या घरात सुसाईड नोट मिळाली असून, त्यामुळे तिघांच्या आत्महत्येचे कारण समोर आले आहे.

डोक्यावर वाढलेले कर्ज, बिघडलेले आर्थिक गणित यामुळे पती, पत्नीने कुटुंबच संपवण्याचा निर्णय घेतला. उत्तरप्रदेशातील शाहजहांपूर जिल्ह्यात ही घटना घडली. पती, पत्नीने चार वर्षाच्या मुलाला विष दिल्याचे समोर आले.

एका कॉलनीमध्ये सचिन ग्रोवर (वय ३०), शिवानी (वय २८) यांनी चार वर्षाचा मुलगा फतेह याला विष दिले. सचिन हातमाग उद्योग करायचा. मुलाला विष देऊन मारल्यानंतर दोघांनी वेगवेगळ्या खोल्यांमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली.

**चिठ्ठीत काय लिहिले?**

पोलिसांना घरात एक चिठ्ठी मिळाली. त्यात सचिनने लिहिले की, कर्जामुळे खूप त्रस्त झालो आहे. वेगवेगळ्या लोकांकडून कर्ज घेतले होते. पण, उत्पन्न मिळत नव्हते, त्यामुळे मानसिक ताण वाढत आहे. या वाईट काळात कुणीही आधार दिला नाही. माझी कुटुंबीयांबद्दल कोणतीही तक्रार नाही. सगळ्यांनी मला साथ दिली. आमची कार, घर आणि इतर वस्तू विका आणि माझ्यावरील सर्व कर्जाची परतफेड करा. जेणेकरून कुणीही असे म्हणू नये की आमचे पैसे देणे बाकी आहे. (वृत्तसंस्था)

# गणपतीची ३२ रूपे असलेले एकमेव मंदिर

## म्हैसूर येथे ११व्या शतकात बांधले गेले श्रीकांतेश्वर मंदिर

◆ **म्हैसूर, २७ ऑगस्ट**

११व्या शतकात बांधलेले श्रीकांतेश्वर मंदिर कर्नाटकातील म्हैसूर येथील नानजंगुड येथे आहे. भगवान शिवाच्या या मंदिराच्या कमानावर ३२ रूपांमध्ये गणेशाच्या मूर्ती आहेत. हे या मंदिराचे वैशिष्ट्य आहे.

अशी खासियत असलेले हे जगातील एकमेव मंदिर आहे. मंदिराचे प्रवेशद्वार १२० फूट उंच आहे, जे त्याच्या अंगणात उघडते. मंदिराच्या आत खोलवर गेल्यावर, भगवान श्रीकांतेश्वर म्हणजेच महादेवाची मूर्ती दिसते. येथे असलेल्या गणपतीच्या ३२ मूर्तींमध्ये गणेश नृत्य करताना दिसतो. तो बालकाच्या रूपात आणि किशोराच्या रूपातही आहे. या मूर्ती गव्हाळ रंगाच्या दगडापासून बनवलेल्या आहेत. नांजनगुड मंदिर संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत म्हणाले की, मुद्गल आणि गणेश पुराणात या रूपांचा उल्लेख आहे. श्रीकांतेश्वर मंदिराला नांजूडेश्वर मंदिर असेही म्हणतात.

या मंदिरात गणपती, शंकर आणि पार्वतीसाठी वेगवेगळे गर्भगृह आहेत. मोठ्या अंगणाच्या एका कोपऱ्यावर १०८ शिवलिंगे आहेत. या विशाल मंदिरात एक असे स्थान देखील आहे जिथे सकाळी उंच छतावरून सूर्याची पहिली किरणे येतात. मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराला महाद्वार असे म्हणतात. (वृत्तसंस्था)

**भगवान गणेश या ३२ रूपांमध्ये उपस्थित आहेत**

बाल गणपती, तरुण, भक्त, वीर, शक्ती, द्विज, सिद्धी, उच्छिष्ट, विघ्न, क्षिप्रा, हेरंब, लक्ष्मी, महागणपती, विजय, नृत्य, उर्ध्वा, एकाक्षर, वरद, त्र्यक्षर, क्षिप्रा प्रसाद, हरिद्र, एकदंत, ऋचांमु, धृष्ट, रिद्धी, ऋषि, त्रिमुख, सिंह, योग, दुर्गा गणपती आणि संकट हरण गणपती. ■



## अग्रलेख...

# विदेशींना देऊया स्वदेशीचा दणका!

सध्या अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प 'टॅरिफ' या मुद्यावर भारताला धमकावत आहेत. अमेरिकेत विकल्या जाणाऱ्या भारतीय उत्पादनांवरील आयात शुल्क वाढवायचे व त्यांच्या किमती वाढल्या की खप कमी होईल, असे ट्रम्प यांचे गणित आहे. पण, भारतानेही या धमकीला भीक न घालता आपल्या पद्धतीने प्रत्युत्तर द्यायचे ठरविले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. जयशंकर टॅरिफविषयक धमक्यांना ठाम उत्तर देत आहेत. देशवासीयांमध्ये जागृती करण्याचे काम पंतप्रधान दररोज करीत आहेतच. भारतीय नागरिकांनी स्वदेशीचा वापर वाढविल्यास आपोआपच विदेशी, त्यातही विशेषकरून अमेरिकी उत्पादनांचा वापर कमी होईल आणि अमेरिकेला उत्तरही मिळेल, अशी पंतप्रधानांची अपेक्षा. ती योग्य आहे. भारतीय नागरिकांमध्ये या विषयावर बऱ्यापैकी जागृती होत असल्याचेही समाज माध्यमांवर जाणवत आहे. अमेरिकी उत्पादनांना दणका दिला तर ट्रम्प यांची हेकडी सरळ व्हायला वेळ लागणार नाही. कारण अमेरिकी उत्पादनांसाठी खंडप्राय भारत देश ही फार मोठी बाजारपेठ आहे ही वस्तुस्थिती आहे.

भारतात स्वदेशी किंवा स्वदेशीचा वापर हा मुद्दा मुळीच नवीन नाही आहे. तो शंभर वर्षांपूर्वी इंग्रजांची राजवट असतानाही महत्त्वाचा मुद्दा ठरला होता. भारतीय स्वातंत्र्यलढा हा केवळ परकीय सत्तेविरुद्धचा राजकीय संघर्ष नव्हता. तो एक व्यापक सामाजिक-आर्थिक क्रांतीचा लढा होता. या लढ्यातील दोन संकल्पना सर्वाधिक महत्त्वाच्या ठरल्या होत्या- स्वराज्य आणि स्वदेशी. स्वराज्य म्हणजे राजकीय स्वातंत्र्य, तर स्वदेशी म्हणजे आर्थिक स्वातंत्र्य. महात्मा गांधींनीही स्पष्टपणे सांगितले होते, राजकीय स्वातंत्र्य केवळ तेव्हाच खरे मानले जाईल, जेव्हा ते आर्थिक स्वातंत्र्यावर आधारलेले असेल. ब्रिटिशांनी भारतीय कापड उद्योग मोडून काढण्यासाठी जाणीवपूर्वक उपाय केले. भारतातून स्वस्तात कच्चा कापूस इंग्लंडला नेला जाई. तेथे कापड तयार करून ते भारतात महागात विकले जाई. त्यामुळे भारतीय विणकर व कारागीर बेरोजगार झाले. भारतीयांवर भारी कर लादले गेले. इंग्रजांच्या संरक्षणाखाली परकीय वस्तू स्वस्तात बाजारात येऊ लागल्या. परिणामी देशी वस्तू महाग व परकीय वस्तू स्वस्त वाटू लागल्या. इंग्रजांनी पाश्चात्त्य वस्तू म्हणजे दर्जेदार आणि देशी म्हणजे निकृष्ट, अशी मानसिकता भारतीयांमध्ये रुजविली. ही मानसिक गुलामगिरी स्वदेशी आंदोलनासाठी मोठा अडथळा ठरली.

१९०५ मध्ये लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी केली. त्यामुळे भारतीय समाजात प्रचंड असंतोष पसरला. या फाळणीविरोधी आंदोलनात स्वदेशी ही संकल्पना अग्रभागी आली. लाल-बाल-पाल या त्रिकुटाने, म्हणजेच लोकमान्य टिळक, बिपीनचंद्र पाल व लाला लजपतराय यांनी जनतेला स्वदेशीचा नारा दिला. त्याचे घोषवाक्य झाले- 'स्वदेशी वस्तू वापरा, परकीय वस्तूंचा बहिष्कार करा.' त्याकाळी लोकांनी परदेशी कपड्यांची होळी केली. शाळा-कॉलेजांमध्ये स्वदेशी शिक्षणसंस्था स्थापन केल्या गेल्या. साबण, माचिस, कपडे, कागद, पेन यांसारख्या वस्तूंचे देशी उद्योग उभे राहिले. या आंदोलनाचा परिणाम असा झाला की राष्ट्रीय चेतना जागृत झाली, स्वदेशी उद्योगांची वाढ झाली आणि आर्थिक बहिष्कार हा राजकीय आंदोलनात शस्त्र म्हणून वापरला गेला. परदेशी कपड्यांची होळी करण्यासाठी महिला घराघरांतून बाहेर पडल्या. युवकांनी स्वदेशी उद्योग उभारण्याचे काम हातात घेतले. स्वदेशी वस्तूंचा प्रचार करण्यासाठी नाटके, गाणी, कीर्तने, व्याख्याने आयोजित केली जाऊ लागली. या साऱ्यांचा फार चांगला परिणाम भारताच्या अर्थकारणावर झाला. १९९१ मध्ये भारतावर आर्थिक संकट आले. परकीय चलनसाठा संपला होता. पी. व्ही. नरसिंहराव सरकारमधील अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण या तत्त्वांवर आधारित धोरणे स्वीकारली. प्रचंड आकाराच्या भारतीय बाजारपेठेची ताकद जगासमोर खुली झाली. परिणामी कोका कोला, पेप्सी, प्रॉक्टर अॅण्ड गॅम्बल, नेस्ले, युनिलिव्हर अशा मोठ्या कंपन्यांनी भारतीय बाजारपेठेत बस्तान बसवले. स्वदेशी उद्योगांवर दबाव आला. स्थानिक साबण, शीतपेये, टूथपेस्ट, वस्त्रोद्योग यांना स्पर्धा झेपेना. अनेक जुने देशी ब्रॅण्ड बंद पडले. परकीय कंपन्यांनी आधुनिक मार्केटिंग व दर्जेदार उत्पादनांमुळे ग्राहकांचा विश्वास जिंकला. स्वदेशी उत्पादक मागे पडले. या काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रेरित स्वदेशी जागरण मंच पुढे आले. त्यांनी परकीय कंपन्यांविरुद्ध चळवळी उभारल्या. त्यामुळे स्वदेशीचा मुद्दा पुन्हा जनतेसमोर आला. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात क्रांतिकारी अशी ओळख मिळवणारे राजीव दीक्षित यांनी स्वदेशी चळवळ बळकट केली. त्यांनी या चळवळीला आक्रमक भूमिका दिली. 'स्वदेशी म्हणजेच आझादी' अशी भूमिका मांडून आझादी बचाव आंदोलन देशभर पोचवले. भारतीय ग्राहक चळवळीचे प्रणेते बिंदुमाधव जोशी यांनी ग्राहक हक्कांसोबतच स्वदेशीची भूमिका तेवढ्याच जोरकसपणे मांडली. गांधीजींनी स्वातंत्र्यापूर्वी 'मीठ' हे एक प्रतीक स्वीकारून जनजागृती केली होती. तशीच भूमिका जोशी यांनी मांडली. 'कोलगेट' या विदेशी टूथपेस्टवर बहिष्कार टाका, असे मीठ आंदोलनासारखे स्वरूप त्यांनी जनमानसासमोर ठेवले. विदेशी म्हणजे काय, विदेशी नेमके कोण, हे सांगून त्यांनी भारतातील बाजारपेठेच्या मोठ्या भागावर अधिराज्य गाजविणाऱ्या पन्नासावर विदेशी कंपन्यांची आणि त्यांच्या हजारांहून जास्त उत्पादनांची नावेच जाहीर केली. ते म्हणत की, 'एक वेळ रावणाशी लढणे सोपे आहे कारण ते खुले युद्ध आहे. पण हे सुवर्ण हरिणाचे मोहक रूप घेऊन आलेल्या मारीच राक्षसाशी मायावी युद्ध करावे लागते. जाहिरातींचा प्रचंड मारा करून, नावीन्य व आधुनिकतेच्या नावाखाली हजारो वस्तू आपल्या भारतीयांच्या घरात घुसवून विदेशी कंपन्या रोज एक-एक बाजार ताब्यात घेत आहेत आणि भारताच्या समृद्धीचे गड-किल्ले उद्ध्वस्त करीत आहेत.'

आता, ट्रम्प तात्यांच्या लहरीपणाच्या पृष्ठभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'आत्मनिर्भर भारत' आणि 'व्होकल फॉर लोकल' हे दोन प्रभावी नारे दिले आहेत. त्यांचा अर्थ स्वदेशीच. आपल्या देशात अनेक वस्तूंची बाजारपेठ अमेरिकेसह इतर देशांनी बळकवली आहे. कोलगेट, क्लोजअप, सर्फ, रिन, लक्स, विम, लाईफबॉय, रेड लेबल, कॅडबरी, नेस्कॅफे, बोर्नव्हिटा, हॉर्लिक्स, व्हिक्स, आयोडेक्स, टाईड, एरियल, मॅगी ही सारी नावे, एवढेच नव्हे तर काही गोंडस भारतीय नावे असलेले खाद्यपदार्थ देखील विदेशी मूळ असलेल्या कंपन्यांनी तयार केलेले आहेत, हे आपण लक्षात ठेवायलाच हवे. आपल्या पोटात घुसून कचरा करणारे कोकाकोला, डोमिनोज, केएफसी, पिझ्झा हट असे सारेच विदेशी आक्रमक आहेत. अनेक वस्तू घरबसल्या बोटांची हालचाल करून घरपोच मागवून देणाऱ्या ऑनलाईन पेमेंट कंपन्या किंवा अॅमेझॉनसारख्या एजंट कंपन्या देखील विदेशी हात बळकट करणाऱ्याच आहेत, हेही भारतीयांनी लक्षात ठेवायला हवे. अगदी रस्त्यांवर मिळणाऱ्या अनेक वस्तू बहुसंख्येने चिनी आहेत, हेही आपल्याला माहीत असायला हवे. महागड्या दुचाकी व चारचाकी वाहनांच्या बाजारातसुद्धा विदेशी कंपन्यांचे प्राबल्य आहे. हे सारे आक्रमण एकाएकी दूर होणार नाही. त्यासाठी टप्प्याटप्प्याने जावे लागेल. सणासुदी व त्यानंतरच्या लग्नसराई काळ हा भारतात अर्थकारणाला बळकटी देणारा काळ असतो. या काळात भारतीयांनी आग्रहपूर्वक स्वदेशीचा उद्गार आणि अंगीकार केला पाहिजे. येत्या तीन-चार महिन्यांत विदेशी आणि स्वदेशी या फरकाकडे सर्व भारतीयांनी लक्षच ठेवायला हवे. कापड, रेडिमेड यांत भारत मोठा निर्यातदार आहे. त्यामुळे आपण विदेशी कपड्यांकडे ढुंकूनही पाहण्याची गरज नाही. पणत्या, दीपमाळा, तोरण, हार, मखर, फटाके अशा कित्येक चिल्लर वस्तूंवर चिनी आक्रमण झाले आहे. ते आपण थोपवू शकतो. अपरिहार्य असल्याखेरीज आपली खरेदी अमेरिकन, चिनी किंवा अन्य देशांतील कंपन्यांना बळकटी देणारी नसावी, याची काळजी घेणे ही सुद्धा देशभक्तीच आहे. आपली स्वतःची बाजारपेठ आणि क्रयशक्ती एवढी मोठी आहे की, भारताला कुणाच्या दारात उभे राहण्याची गरज नाही. आम्ही माल तयार करू शकतो आणि त्याची बाजारपेठही चालवू शकतो, हे दाखवून देण्याचा हा प्रसंग आहे. पुन्हा एकदा स्वदेशीचा दणका देण्याची ही वेळ आहे.

## प्रासंगिक

### डॉ. नंदिनी कडुस्कर

# ऋषिपंचमी : ऋषींना अभिवादन

'ऋषी' शब्द ऐकताच आपल्या डोळ्यापुढे कुठल्या तरी झाडाखाली बऱ्याच काळापासून तपोमग्न, आत्मतेजाने उजळत असलेली, विश्वकल्याणाची कामना विश्वदेवाकडे करीत असलेली मूर्ती तरळते. एवढे 'तपः स्वाध्याय निरतः' राहून तेजोपासना करतात, हेच भारतीयत्व आहे. 'भा' म्हणजे प्रकाश, भासमान करणे, बुद्धीचे तेज.

'आदित्यानामहं विष्णुर्ज्योतिषां रविरंशुमान् ।'

संपूर्ण ब्रह्मांडाला जे तेज व्यापून असते, त्याला विष्णू, आदित्य, सूर्य-रवी, अंशुमान असे भगवद्गीतेत म्हटलेय. आत्मज्योतीचे तेज पिंडाला म्हणजे मनुष्यदेहाला जाणीव रूपाने व्यापून असते; अशा पिंड-ब्रह्मांडाला प्रकाशित करणाऱ्या तेजाला ('अहमात्मा गुडाकेश सर्व भूताशयः स्थितः' भ. गीता, 'सूर्य आत्मा जगतःस्तस्तुषश्च' - पुरुषसूक्त) ब्रह्मांडाचा स्वामी-आत्मा-सत्-सत्य म्हणतात. त्याचा साक्षात्कार होण्यासाठी नामसाधना म्हणजे तप लागते. वेद ज्ञान होणे; ते ज्यांना झाले त्यांना 'ऋषी' म्हणतात. वेदज्ञानाच्या योगे प्राप्त झालेली सफल प्रायोगिकताच ऋषींच्या ज्ञानाची व्याप्ती व विशेषता प्रकट करते. विशेषतांमुळे ऋषी, ब्रह्मर्षी, महर्षी, देवर्षी, राजर्षी, खंडर्षी, परमर्षी असे सप्तर्षी झाले.

सर्वप्रथम संपूर्ण वेद ब्रह्मदेवांना ऐकू आले. अनंत कोटी ब्रह्मांडाचे ज्ञान वेदात आहे. वेद मंत्र वेगवेगळ्या काळात कधी अनेक ऋषींना कधी एखाद्याला ऐकू आले. श्रवणाच्या माध्यमातून ऐकल्याने वेदमंत्रांना 'श्रुती' ऐकू आलेले मंत्र अर्थासह स्मरण करून लिहून ठेवले; त्या ग्रंथांना 'स्मृती' म्हणतात. मंत्र ज्यांना ऐकू आले त्या ऋषींचे नाव 'माध्यम.' म्हणून वेदातील त्या सूक्तापुढे आलेय. वेदांचे कोणीही रचयिता नाही, ते 'अपौरुषेय' आहेत. त्यामुळे नावासाठी ऋषींमध्ये अहमहमिकाही कधी नव्हती. ऋषी सूर्योपासक असल्याने त्रिकाळ संध्योपासना ते करीत. भृगु, अगस्त्य, गौतम, कपिलमहामुनी, वाल्मीकि, क्रतु, अंगीरस आदी अनेक ऋषी होऊन गेलेत. महर्षी भृगुंनी अग्नीचा शोध लावला. भृगुवंशीय म्हणजेच भार्गव. याच वंशात विष्णूंचा अवतार भार्गवराम, मातृपितृभक्त परशुराम झाले. महर्षी च्यवन याच कुळातले. आयुर्वेदात शरीरविज्ञान शाखेत यांनी अद्‌भुत शोध लावले. महर्षी गौतमांनी शिवशंकराला त्याच्या जटेतून गंगेची एक धारा (गोदावरी) ब्रह्मगिरीवर कुशावर्तात सोडण्यास आपल्या तपाने विवश केले. भारतीय षड्‌दर्शनातील न्यायशास्त्र गौतमांनी व सांख्यशास्त्र कपिलांनी सांगितले. कपिलांनी ज्ञानचक्षूंनी हिमालयावरील गंगेचा शोध घेतला. गंगेला भागीरथी नाव मिळाले. भारत सुजलाम् झाला. महर्षी वाल्मीकिंनी रामायण महाकाव्यातून श्रीराम हा साक्षात धर्माचा अवतार, युगप्रवर्तक, मर्यादा पुरुषोत्तम, आदर्श राजाचे (पुरा परंपरा वक्ति पुराणं तत्



प्रशस्यते) आर्य संस्कृतीचे, परंपरांचे दर्शन करविले. त्यांचेच शिष्य महर्षी भरद्वाज हे शास्त्रज्ञ असल्याने विमानांची निर्मिती केली. सर्व प्रकारच्या वनस्पतींचे रोपण संवर्धन, विशेष प्रक्रियेने संशोधन करून सर्वकाली फळणारी झाडं आपल्या आसमंतातील चैत्ररथ वनात वाढविली. रावणाला मारून राम अयोध्येत परत जाताना बरोबर असलेल्या वानरांची भूक भागविण्यासाठी मार्गात अशीच बारमाही फळणारी झाडं राहोत, असा वर रामांना भरद्वाजांनी दिला.

पूर्वी वेदाप्रमाणे पुराणही एकच होते. पुढे त्यांच्या विषयानुसार मंत्रार्थानुसार ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्व, साम हे ४ वेद व १८ पुराणे असे विभाग केले. ऋग्वेदातून शरीर, आरोग्यविषयक ज्ञानाच्या ऋचा वेगळ्या करून 'आयुर्वेद' हा उपवेद झाला. पिण्ड ब्रह्मांडाच्या स्थूलसूक्ष्म रूपाचे ज्ञान असल्याने त्यांच्या ज्ञानाचा आवाका मोठा असल्याने त्यांना महर्षी वेदव्यास म्हणतात. जगद्‌गुरू श्रीकृष्णाचे दर्शन घडविणारे, विश्वाचे सांस्कृतिक, पौराणिक, खागोलिक, भौगोलिक सर्व ज्ञान देणारे असे भागवत, महाभारत हे दोन महान ग्रंथ त्यांनी जगाला दिले. व्यासांनी जे सांगितले तेच पुढील सर्वच ज्ञानियांनी टीका रूपाने सांगितले. म्हणूनच 'व्यासोच्छिष्टं जगत्रयं' म्हणतात. परब्रह्माला स्वदेहाच्या ठिकाणी अनुभवणाऱ्या आणि वेदमंत्र जाणणाऱ्या ऋषींना ब्रह्मर्षी म्हणतात. व्यासांनी आश्रमात बसून कुरुक्षेत्रावर श्रीकृष्णांनी अर्जुनाच्या निमित्ताने जगाला सांगितलेले भगवद्‌गीतेचे ज्ञान ऐकले आणि दूरदृष्टीने युद्ध पाहिले. हीच दूरदृष्टी त्यांनी त्यांचा शिष्य संजयला दिली; जिच्या योगे त्याने आंधळ्या धृतराष्ट्राला कुरुक्षेत्रावरील युद्धाचे प्रत्यक्ष समालोचन ऐकविले.

महर्षी अगस्ती यांचेही ज्ञान अगाध होते. त्यांच्या पत्नी लोपामुद्रेच्या नावे काही सूक्त वेदात आहेत. अगस्तींनी राम-रावण युद्धात रणांगणावर प्रकट होऊन 'आदित्यहृदय' स्तोत्र रामांना दिलं; ज्याने पुढील मार्ग प्रकाशित होईल म्हणाले आणि एक अभिमंत्रित असा अमोघ बाण रावणाच्या नाभीत मारण्यास दिला. त्याच बाणाने रावण मेला. तसेच कार्तिकेयाला ज्ञान अगस्तींनी दिले. वसिष्ठ, वामदेव, कश्यप, गौतम, विश्वामित्र, कुशिक, अत्री, भरद्वाज, जमदग्नी, मेधातिथी, मुद्‌गल असे अनेक दीर्घायुषी ब्रह्मर्षी झाले. दशरथाला पुत्रकामेष्टी यज्ञ करा, पुत्रांची प्राप्ती होईल, असा सल्ला त्रिकालज्ञानी वसिष्ठांनीच दिला. तो फळला. वसिष्ठांचा मोठा मुलगा सुयज्ञाने श्रीरामांना धनुर्वेद निपुण केले. दुराचारी रावणाला मारण्यासाठी रामाला विश्वामित्रांजवळच्या सर्व विद्या, त्यांचे मार्गदर्शन जे त्यांच्याच सहवासाने प्राप्त होणार म्हणून दूरदर्शी वसिष्ठांनी दशरथाला समजविले. तेव्हा विश्वामित्रांबरोबर राम-लक्ष्मणाला यज्ञ रक्षणास पाठविण्यास दशरथ तयार झाले. पुढे रावण वधानंतर राम अयोध्येत आल्यावर आदराने म्हणतात -

**'गुरु वसिष्ठ कुल पूज्य हमारे । जिनके बल दनुज वन मारे ॥**

वसिष्ठांनी शरयू नदी शराने अयोध्येकडे वाहवत आणली. विदर्भात वरदा/वसिष्ठा त्यांनीच आणल्याचे पुराणात आहे. श्रीरामांना आत्मज्ञान वसिष्ठांनी दिले. 'योगवासिष्ठ' ग्रंथ लिहिला. ब्रह्मांडावर शासन करताना देवाचे पार्षद म्हणून जे जे ऋषी कार्य करतात, त्यांना देवर्षी म्हणतात. कण्व, कश्यप हे देवर्षी होते. कश्यपांना प्रजापती म्हणतात. पृथ्वीवरील सर्व सजीव ही त्यांचीच निर्मिती असल्याने पृथ्वीला काश्यपी हे नाव त्यांच्यामुळेच पडले. कण्वांनी शकुंतलेला (मानसकन्या) सासरी पाठवताना सांसारिक स्त्रीने घरात कसे वागावे? यासाठी केलेला उपदेश भारतीय कुटुंब व्यवस्था सांभाळण्यासाठी सर्व काळी उपकारक ठरला. त्याचे प्रतिबिंब कविकुलगुरू कालिदासांच्या वाङ्मयात पडले. देवर्षींना 'नारद ही माझी विभूती आहे' श्रीकृष्ण गीतेत सांगतात. नारदांचा अधिकार, महती सांगणारी प्रमाणं सर्वच पुराणकथांमधून व कीर्तनकारांच्या मुखातून नामकथा गंगा 'पोखीत तीरीचे पादप' या न्यायाने पावन करीत या पृथ्वीतलावर वाहतच आहे. कलियुगात मात्र वेद मंत्र कुणालाही ऐकू येत नाहीत. कारण कलेर्दोषनिधे! परंतु वेदज्ञ व आत्मसाक्षात्कारी संत या भूतलावर जे झाले त्या सर्वांना ऋषीच म्हणावे लागेल. संत गजानन महाराजांनी अनेक वेळा वेद मंत्र म्हणून दाखवून चुकीचे मंत्रोच्चारण करणाऱ्यांच्या चुकांची दुरुस्ती केली. लेखक दासगणूंनी त्यांना ऋषीच म्हटले-

'भाद्रपद मासी । ऋषी पंचमी या दिवशी ।
आधुनिक काळचा हा ऋषी । समाधिस्थ जाहला ॥ (६४ गजानन विजय.)

हे ज्ञानसूर्य ऋषी अमरत्वाकडे नेणाऱ्या वाटा नेहमीच उजळत राहिले. त्यांचे स्मरण करून कृतज्ञतेने नमन करण्याचा हा दिवस.

९४२१७०१५६२

## वेध

### नंदकिशोर काथवटे

# रस्ते खड्डेमुक्त की भ्रष्टाचारमुक्त?

देशाच्या प्रत्येक कोपऱ्यातील शहरांना, गावांना राष्ट्रीय महामार्गांनी जोडून दिल्याचे श्रेय केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना जाते. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आज भारतातील महामार्ग चकचकीत झाले आहेत, राज्यातून राज्य सहजगत्या जोडले जात आहे. महामार्गांवरून प्रवास करताना 'खड्डेमुक्त भारत' हे खरेपणाने जाणवते, म्हणूनच जनमानसात गडकरींना प्रेमाने रोडकरी म्हणून ओळखले जाते. मात्र, या उज्ज्वल चित्राच्या पृष्ठभूमीवर महाराष्ट्रातील शहरांचे अंतर्गत रस्ते पाहिले की ते पूर्णतः विरुद्ध दृश्य डोळ्यांसमोर येते. शहरातील रस्ते खड्ड्यांनी विद्रूप झालेले, पावसाळा आला की चिखल, उन्हाळा आला की धुळीचे ढग आणि या सगळ्याचा त्रास सामान्य नागरिकांना सोसावा लागतो. खरेतर शहरांच्या अंतर्गत रस्त्यांसाठी शासनाकडून दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर केला जातो. विकासकामांच्या नावाखाली पथकर, कर, करप्रकार करून नागरिकांकडून पैसा गोळा केला जातो. पण याच पैशाचा उपयोग करून जे काम केले जाते त्याचा दर्जा अत्यंत निकृष्ट असतो. एकच रस्ता, एकच नाली वारंवार केली जाते. दोन वर्ष टिकणे तर दूर, सहा महिन्यातच रस्ते उखडायला लागतात. सिमेंट काँक्रीटचे रस्ते असूनही काही महिन्यांत त्यावरची गिट्टी उघडी पडते. डांबरी रस्ते तर पावसाच्या पहिल्याच सरींनी चिखलमय होतात. हा सगळा प्रकार नागरिकांच्या डोळ्यांसमोर घडतो आणि तरीदेखील जबाबदारांकडे याविषयी संवेदनशीलता दिसत नाही. सध्या राज्यभरातील कंत्राटदार संघटना आंदोलनाच्या तयारीत आहेत. त्यांचे म्हणणे आहे की शासनाकडे जवळपास ९० हजार कोटींची बिले थकित आहेत. केवळ गडचिरोली जिल्ह्यातील कंत्राटदारांचे तब्बल पंधराशे कोटी रुपये शासनाकडे अडकून पडले आहेत. शासनाने वेळेत बिले दिली पाहिजेत, याबाबत शंका नाही. कंत्राटदारांना काम पूर्ण केल्यावर त्यांचा मोबदला योग्यवेळी मिळाला पाहिजे हे शासनाचे कर्तव्यच आहे. पण केवळ थकित बिले हा एकमेव मुद्दा मानून आंदोलन उभारणारे कंत्राटदार आपल्या जबाबदाऱ्या विसरले आहेत का, हा प्रश्न उपस्थित होतो. कारण शासनाचे पैसे थकित असले तरी जनतेचे पैसे वाया गेले आहेत याची जबाबदारी कोणाची? खरे पाहता समस्या केवळ शासनाची नाही, समस्या ही संगनमताची आहे. सार्वजनिक बांधकाम विभागातील अनेक अधिकारी व ठेकेदार हातात हात घालून शासनाला लुटत आहेत. कामाच्या निविदा काढल्या जातात, टेंडर दिले जाते, कोट्यवधींचा निधी मंजूर होतो, पण जमिनीवर दिसणारे काम हे निकृष्ट दर्जाचेच असते. अधिकारी डोळेझाक करतात, कंत्राटदार दर्जा सांभाळत नाहीत आणि लोकप्रतिनिधी स्वतःच्या राजकीय सोयीसाठी या सगळ्याकडे कानाडोळा करतात. त्यामुळे भ्रष्टाचाराची साखळी अशी घट्ट विणली गेली आहे की शेवटी नुकसान नागरिकांचेच होते.

आज एखाद्या शहरातील रस्त्यांवरून फिरा आणि पाहा-रस्ते आहेत की खड्ड्यांचा पट्टा, हे ओळखणे कठीण होते. वाहनचालकांचा जीव धोक्यात येतो, पादचारी जखमी होतात, अपघात होतात. धुळीमुळे आजार वाढतात, खड्ड्यांमुळे आर्थिक नुकसान होते. हे सर्व लोकांच्या पैशाने तयार केलेल्या रस्त्यांवरच घडते. जर एखादे काम दर्जेदार झाले असते तर नागरिकांना हा त्रास भोगावा लागला नसता. मग प्रश्न उरतो, नागरिकांनी आपले हक्क मागण्यासाठी आंदोलन करायचे का? आज ठेकेदार आंदोलनाची भाषा करतात कारण त्यांना आपले पैसे हवे आहेत. परंतु याच ठेकेदारांनी केलेली निकृष्ट दर्जाची कामे हा आंदोलनाचा वेगळाच मुद्दा आहे. जर ठेकेदारांनी काम प्रामाणिकपणे केले असते, दर्जा पाळला असता, तर नागरिकही त्यांच्या पाठीशी उभे राहिले असते. पण वास्तव वेगळे आहे. कामे उघड्या डोळ्यांनी पाहिली की भ्रष्टाचार स्पष्ट जाणवतो. अशा वेळी ठेकेदारांनाही विचारले पाहिजे की तुम्हाला केवळ पैसे कमवायचे आहेत का? की समाजाप्रति, राज्याप्रति तुमची काही जबाबदारी आहे? शासनाने बिले द्यावीत हे सत्य आहे. पण कंत्राटदारांनी कामाचा दर्जा टिकवला पाहिजे हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांनी जबाबदारीने काम पाहिले पाहिजे. अन्यथा, भ्रष्टाचाराचे हे सगळे चक्र नागरिकांच्या जीवावर उलटणार आहे. आज जनता सहन करते आहे कारण तिला दुसरा मार्ग नाही. पण भविष्यात जर सामान्य नागरिकांनीच आंदोलन उभारले तर त्याचा रोष केवळ ठेकेदारांवरच नव्हे तर शासन, अधिकारी आणि लोकप्रतिनिधींवरही ओढवणार आहे. लोकांच्या सहनशीलतेचा अंत झाला की रस्त्यांवर उतरणाऱ्या जनतेसमोर कोणतेही आंदोलन टिकणार नाही. विकासाच्या नावाखाली होणारा हा भ्रष्टाचार थांबवला गेला नाही तर उद्याच्या पिढ्या शासनालाही माफ करणार नाहीत आणि ठेकेदारांनाही वाचवणार नाहीत.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

### श्यामकांत जहागीरदार

# राजकारणाचे शुद्धीकरण करणारे विधेयक

पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि केंद्राचे तसेच राज्यांचे मंत्री ३० दिवस तुरुंगात राहत असतील तर त्यांना पदावरून हटवण्याची तरतूद असलेले १३० वे घटनादुरुस्ती विधेयक सरकारने संसदेत सादर केल्यामुळे विरोधी पक्षांच्या गोटात खळबळ उडाली आहे. सरकार हे विधेयक लोकसभेत सादर करत असताना विरोधकांनी प्रचंड गदारोळ केला. मात्र सरकारने हे विधेयक सादर केले. विरोधकांच्या भूमिकेमुळे हे विधेयक संयुक्त सांसदीय समितीकडे (जेपीसी) पाठवण्याची घोषणा गृहमंत्री अमित शाह यांनी केली. ३१ सदस्यीय संयुक्त सांसदीय समितीत लोकसभेचे २१ तर राज्यसभेचे १० सदस्य राहणार आहेत. या समितीतील सदस्यांच्या नावांची घोषणा अद्याप झाली नाही. मात्र या समितीत सहभागी होण्यास आप, तृणमूल काँग्रेस आणि समाजवादी पक्ष यांनी नकार दिला आहे. त्यामुळे आता काँग्रेसही या समितीवर बहिष्कार घालेल, असे वाटत आहे. या विधेयकाचा फटका ज्या पक्षांच्या नेत्यांना बसण्याची शक्यता आहे, त्यांनीच या समितीत सहभागी होण्यास नकार दिला, असे दिसते.

आपल्या देशात आतापर्यंत अनेक माजी पंतप्रधानांवर गुन्हे दाखल करण्यात आले, त्यांना तुरुंगातही जावे लागले, पण एकाही पंतप्रधानावर अशी वेळ आली नाही. मात्र अनेक राज्यांच्या मुख्यमंत्र्यांवर आणि मंत्र्यांवर ते पदावर असताना गुन्हे दाखल झाले, त्यांना तुरुंगात जावे लागले, ही वस्तुस्थिती आहे. राजकारणाच्या शुद्धीकरणाच्या गोष्टी आपल्या देशात केल्या जातात, पण त्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले तर त्याला मात्र विरोध केला जातो. आपल्या राजकारणाचा आणि समाजजीवनाचा हा दुटप्पीपणा म्हटला पाहिजे. एखाद्यावर फौजदारी गुन्हा दाखल झाला आणि त्याला तुरुंगात असताना ३० दिवसपर्यंत जामीन मिळाला नाही तर ३१ व्या दिवशी त्याला पदावरून आपोआप हटवण्याची तरतूद या विधेयकात आहे. विशेष म्हणजे या गुन्ह्यात नंतर त्यांची निर्दोष सुटका झाली तर तो पदावर परत येऊ शकतो. मात्र एकदा कोणाचेही पद गेले तर त्याने पदावर परत येणे आपल्याकडे वाटते तितके सोपे नाही. विशेष म्हणजे राजकीय आंदोलनातील गुन्ह्यासाठी अशी तरतूद नाही.

असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म (एडीआर) च्या एका अहवालानुसार देशातील ३० पैकी १२ मुख्यमंत्र्यांच्या विरोधात फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल झाले आहेत. तर यातील १० म्हणजे ३० टक्के मुख्यमंत्र्यावर हत्येचा प्रयत्न, अपहरण आणि भ्रष्टाचाराचे आरोप आहेत. यातील काही नेत्यांवर बलात्काराचे आरोप आहेत की नाही, ते मात्र समजले नाही. आपल्या देशात भ्रष्टाचाराच्या आरोपावरून अनेक माजी मुख्यमंत्र्यांना आतापर्यंत अटक झाली. यात बिहारचे तत्कालीन मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव, तामिळनाडूच्या तत्कालीन मुख्यमंत्री जयललिता, झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन, दिल्लीचे तत्कालीन मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यासह आणखी काही जणांचा समावेश आहे. विशेष म्हणजे लालूप्रसाद यादव, जयललिता आणि हेमंत सोरेन यांच्यावर मुख्यमंत्री असताना फौजदारी गुन्हा दाखल झाला होता, मात्र अटक व्हायच्या आधी या सर्वांनी जनाची नाही तर मनाची म्हणून का लाज होईना, आपल्या पदाचा राजीनामा दिला. पण केजरीवाल यांनी तर आपल्याला जनाची सोडा, पण मनाचीही लाज नसल्याचे दाखवून दिले. अरविंद केजरीवाल देशातील एकमेव असे नेते म्हणायला पाहिजे, ज्यांना मुख्यमंत्री पदावर असताना अटक झाली आणि मुख्यमंत्री म्हणून तुरुंगाचा पाहुणचारही घ्यावा लागला.

अटक व्हायच्या आधी केजरीवाल यांनी पदाचा राजीनामा दिला असता तर मोदी सरकारवर हे विधेयक आणण्याची वेळ आली नसती. त्यामुळे या विधेयकामागचे खऱ्या अर्थाने शिल्पकार हे केजरीवाल यांना म्हणावे लागेल. या विधेयकाचे सहशिल्पकार म्हणून द्रमुकचे मंत्री सेंथील बालाजी यांचा समावेश आहे. भ्रष्टाचाराच्या आरोपात अटक झाल्यानंतर बालाजी आठ महिने तुरुंगात होते, पण त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला नाही. नंतर न्यायालयाच्या निर्णयामुळे त्यांना नाईलाजाने राजीनामा द्यावा लागला. एक पदासीन मुख्यमंत्री आणि मंत्री तुरुंगात राहतो, त्यामुळे या व्यक्तीची नाही तर तो त्या पदावर आहे, त्या घटनात्मक पदाची बदनामी होते. देशातील सर्वांत जास्त फौजदारी गुन्हे काँग्रेस नेते आणि तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्यावर आहेत. त्यांच्यावर ८९ गुन्हे दाखल आहेत. त्या खालोखाल दुसऱ्या स्थानावर ४७ गुन्ह्यांसह तामिळनाडूचे मुख्यमंत्री आणि द्रमुक नेते एम. के. स्टॅलिन आहेत. तिसऱ्या स्थानावर तेलगू देसमचे नेते आणि आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू आहेत. त्यांच्यावर १९ गुन्हे दाखल आहेत. कर्नाटकचे मुख्यमंत्री आणि काँग्रेसनेते सिद्धरामय्या १३ गुन्ह्यांसह चौथ्या स्थानावर आहेत. ५ गुन्ह्यांसह झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन पाचव्या स्थानावर आहेत. म्हणजे सर्वांत जास्त गुन्हे दाखल असलेल्या देशातील पहिल्या पाच मुख्यमंत्र्यांत दोन काँग्रेसचे आहेत. द्रमुक, तेलगू देसम आणि झामुमोचा प्रत्येकी एक मुख्यमंत्री आहेत. आणि काँग्रेसच या विधेयकाला विरोध करत आहे. रेवंत रेड्डी, स्टॅलिन, चंद्राबाबू नायडू आणि सिद्धारामय्या या चार मुख्यमंत्र्यांना अद्याप तुरुंगात जावे लागले नाही. या मालिकेतील हेमंत सोरेन यांनाच फक्त तुरुंगाची वारी करावी लागली.

भ्रष्टाचाराच्या आरोपात तुरुंगात राहावे लागल्यामध्ये प्रामुख्याने आप, तृणमूल काँग्रेसच्या मंत्र्यांचा समावेश आहे. तृणमूलच्या पाच मंत्र्यांना तर आपच्या चार मंत्र्यांना तुरुंगात जावे लागले. द्रमुक आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका मंत्र्याचा यात समावेश आहे. तृणमूल काँग्रेसचे सुब्रतो मुखर्जी, पार्थ चटर्जी, ज्योतिप्रिय मलिक, फिरहाद हकीम आणि मदन मित्रा या पाच मंत्र्यांचा यात समावेश आहे. आपचे मनीष सिसोदिया, सत्येंद्र जैन, जितेंद्र तोमर यांनाही मंत्रिपदावर असताना अटक झाली. देशातील विरोधी पक्षांत थोडी जरी नैतिकता शिल्लक असेल तर त्यांनी या विधेयकाला पाठिंबा द्यायला पाहिजे. रेल्वे अपघाताची नैतिक जबाबदारी घेत रेल्वे मंत्रिपदाचा राजीनामा देणारे लालबहादूर शास्त्री कुठे आणि केजरीवाल आणि सेंथील बालाजी कुठे. ज्या रेल्वेचा अपघात झाला ती रेल्वेगाडी काही शास्त्रीजी चालवत नव्हते, पण रेल्वेमंत्री म्हणून प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी नैतिक जबाबदारी आपली आहे, हे मान्य करत त्यांनी रेल्वे मंत्रिपदाचा राजीनामा दिला. आणि आजच्या काळातील राजकारणी भ्रष्टाचाराच्या आरोपात अटक झाल्यानंतर तुरुंगात जाण्याची वेळ आली तरी निर्लज्जासारखे पदावर राहतात. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही तर काळ सोकावतो, त्याचे वाईट वाटते. त्यामुळे मोदी सरकारने जे विधेयक आणले, त्याला देशातील जनतेने पाठिंबा दिला पाहिजे. संसदेत पारित होणाऱ्या अन्य विधेयकांसारखे हे विधेयक नाही. तर या विधेयकामुळे राजकारणाचे शुद्धीकरण होणार आहे, देशात आतापर्यंत राजकारणी कोण आणि गुन्हेगार कोण हे ओळखता येत नव्हते. राजकारणी आणि गुन्हेगार यांच्यातील आतापर्यंत अंधुक असलेली सीमारेषा या विधेयकामुळे अधिक स्पष्ट होणार आहे.

९८८१७१७८१७

## गणरायांचे मंगलमय आगमन



गणरायांचे आगमन होताच सर्वत्र उत्साह संचारला. गणरायाला निरोप देताना आपण म्हणतो पुढच्या वर्षी लवकर या. यावर्षी खरंच लवकरच आलेत. मूर्तिकार किती महिन्यांपासून मेहनत घेतात. त्यांची ही मेहनतीची कमाई असते. त्यांच्या बरोबरीने किती जणांना रोजगार मिळतो. मंडप, डेकोरेशन, फुले, फळे, भाजी, किराणा, आजकाल स्वयंपाकी, कॉन्ट्रॅक्ट घेणारे, मिठाईवाले, मोदक करून विकणारे यासह इतर सर्वांची कमाई होते. बाप्पा सगळ्यांवर प्रसन्न असतो. फक्त त्याची मनोभावे पूजा करायला हवी. त्याला प्रिय आहे गूळखोबरे, लाल फूल, शांततेसाठी दूर्वा, शमीपत्र व केवडा, हळद, कुंकू, शेंदूर, अक्षता आणि बसायला आसन. एवढे केले तरी बाप्पा प्रसन्न होतो.

पण आता लोकांनी खूप अवडंबर केले आहे. फोटोसाठी काय काय करतात. बरं पण त्यामुळे फुलवाल्यांची चांगली कमाई वाढली आहे. फुलांच्या शेतीला पणं महत्त्व आले आहे. फक्त भक्तिभाव कायम ठेवून सगंळ करा. बाप्पांची कायम कृपा राहील.

**अंजली पळणीटकर**/नागपूर

●● ●●

## शालार्थ घोटाळा : डिजिटल फसवणूक, देणगी नव्हे!

अलिकडे शालार्थ घोटाळ्याची चर्चा जोरात आहे. पण दुर्दैवाने या घोटाळ्याचा संबंध शाळांमधील डोनेशन प्रथेशी जोडला जात आहे. ही तुलना चुकीची आहे. शालार्थ घोटाळा म्हणजे सरकारी सॉफ्टवेअरमध्ये खोटे आयडी तयार करून बनावट कर्मचारी दाखवणे आणि त्यांच्या नावाने वेतन व निधी लाटणे हा स्पष्ट डिजिटल गैरव्यवहार आहे. तर डोनेशन प्रथा ही शाळांमध्ये नोकरीसाठी पैसे देण्याची जुनी सामाजिक-आर्थिक समस्या आहे. दोन्ही प्रश्न वेगळे आहेत. डोनेशनचा मुद्दा ओढून शालार्थ घोटाळा झाकण्याचा प्रयत्न होतो आहे. त्यामुळे खरे गुन्हेगार वाचतात आणि निरपराध शिक्षक व पालकांवर दोष टाकला जातो. नागरिकांनी लक्ष ठेवावे ते खऱ्या गुन्हेगारांवर, बनावट आयडी तयार करून शासकीय निधी लुटणाऱ्यांवर. अन्यथा हा डिजिटल घोटाळा पुन्हा पुन्हा घडत राहील.

**अरुण कराळे**/१०९६३२६२७२

●● ●●

## वाचक पत्रे

## आता लोकप्रतिनिधीसुद्धा वाचणार नाहीत

'आरोपी मंत्री, मुख्यमंत्र्यांना हटविणारे विधेयक जेपीसीकडे' अशा आशयाचे वृत्त तरुण भारतात वाचले. भ्रष्टाचाराच्या तसेच गंभीर गुन्हेगारी स्वरूपाच्या आरोपाखाली सलग ३० दिवस तुरुंगात राहिल्यास पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री आणि राज्याच्या मंत्र्यांना पदावरून हटविण्याची आणि देशाच्या राजकारणावर दूरगामी परिणाम करणारी तरतूद या विधेयकात आहे. हे विधेयक सादर झाल्यानंतर संसदेत प्रचंड गदारोळ झाला आणि विरोधकांचे अतिशय लज्जास्पद वर्तन अनुभवायला मिळाले. मी कुठल्याही राजकीय पक्षाची सदस्य नाही किंवा पुरस्कर्तादिखील नाही, पण एक सामान्य नागरिक म्हणून मला असे वाटते की, या विधेयकाला विरोध कशासाठी? भ्रष्टाचारी किंवा गैरवर्तन करणारा कर्मचारी असो, मंत्री असो किंवा लोकप्रतिनिधी, तुरुंगात गेल्यावर राहण्याचा नैतिक अधिकार गमावीत असतो. या परिस्थितीला आता कायद्याच्या चौकटीत बांधण्याचा हा प्रयत्न आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अशी तरतूद आहे की, जर कर्मचारी २४ तास किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीत तुरुंगात राहिल्यास तत्काळ प्रभावाने त्या कर्मचाऱ्याला निलंबित केले जाते आणि नंतर विभागीय चौकशी करून आरोप सिद्ध झाल्यास नियमानुसार शिक्षा केली असे असताना लोकप्रतिनिधींना यातून सूट का? लोकप्रतिनिधी जरी असला तरी भ्रष्टाचारी आहे ना मग त्या व्यक्तीला पदावरून का हटविण्यात येऊ नये? या विधेयकाच्या निमित्ताने एक संदेश मात्र जनमानसात गेला आहे तो म्हणजे, नियम, कायदे फक्त सामान्य नागरिकांसाठी नाही तर लोकप्रतिनिधीसुद्धा आता गैरवर्तनातून वाचणार नाहीत. प्रत्येक लोकप्रतिनिधी जाहीररीत्या त्याला जबाबदार राहणार आहे.

विरोधक कदाचित विचार करीत असतील की या कायद्याचा पूर्वग्रहदूषित उद्देशासाठी दुरुपयोग केला जाऊ शकतो. हा त्यांचा विचार अगदीच बालिश आहे. अहो, मूल जन्माला यायच्या आधीच तुम्ही कस ठरवता की ते वाईट चालिरीतीचं राहील. त्याला जन्म घेऊ द्या, वाढू द्या आणि त्याच्या वर्तनावरून ठरवा की ते बाळ चांगले आहे की वाईट. तसेच काहीसे या विधेयकाचे आहे. प्रत्येक वेळी कायद्याचा गैरवापरच होईल हे का म्हणून गृहीत धरता?

**कीर्ती गाडगे**/९९२११९९९२२

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

## अनन्या उलभगतची जिल्हा बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**बार्शी, दि. २७ ऑगस्ट-**

तालुका शालेय बुद्धिबळ स्पर्धेत फिनिक्स पोदार लर्न स्कूल बार्शी येथील



इ. ८ वीत शिकत असलेली अनन्या चंद्रकांत उलभगत हिने १४ वर्षांखालील मुलींच्या गटात द्वितीय क्रमांक मिळवला. या कामगिरीवर तिची जिल्हा स्पर्धेसाठी निवड झाली. क्रीडा व युवक सेवा संचानालय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सोलापूर शालेय तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा सुलाखे इंग्लिश मिडीयम स्कूल, बार्शी येथे झाली होती.

## नितीन आवताडे यांना पीएच.डी प्रदान

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ बाळे येथील शिक्षक डॉ. नितीन रंगनाथ



अवताडे यांना वारकरी संप्रदायाचा सांस्कृतिक व वाङ्ग्यीन अभ्यास याविषयावर पीएच. डी ही पदवी प्रदान करण्यात आली. ही पदवी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्यातर्फे प्रदान करण्यात आली. या संशोधन कार्यासाठी डॉ. राजशेखर शिंदे हे मार्गदर्शक म्हणून लाभले. डॉ. इ. जा. तांबोळी हे कमिटीचे चेअरमन होते तर डॉ. रणधीर शिंदे यांनी परीक्षक म्हणून कार्य पाहिले. यशाबद्दल माजी आमदार निर्मलाताई ठोकळ, आमदार समाधानदादा अवताडे, शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत, संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ, सचिव शिल्पा ठोकळ यांनी अभिनंदन केले.

## गणेश चतुर्थीला पर्यावरणपूरक उत्पादने

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

ग्राहकांना पर्यावरणपूरक आणि पारंपारिक उत्सवाच्या आवश्यक वस्तूंचा विचारपूर्वक तयार केलेला संग्रह ॲमेझॉन इंडियाने ॲमेझॉन डॉट इनवर समर्पित गणेश चतुर्थी स्टोअर सुरू करण्याची घोषणा केली. यामध्ये मातीच्या गणेशमूर्ती आणि हस्तनिर्मित सजावटीच्या साहित्यापासून ते उत्सवाचे कपडे, पूजासाहित्य आणि गोड पदार्थांपर्यंत सर्व काही उपलब्ध असून ही उत्पादने साजरीकरण करता यावे याकरिता तयार करण्यात आली आहेत. ग्राहक उत्पादने शोधण्यासाठी, वैयक्तिकृत शिफारसी मिळविण्यासाठी आणि त्यांचा उत्सवातील खरेदी अनुभव वाढविण्यासाठी ॲमेझॉनच्या एआय-संचालित शॉपिंग असिस्टंट रुफसचा वापर करू शकतात.

# ‘संगमेश्वर’ला सर्वोत्कृष्ट क्रीडा महाविद्यालयाचा पुरस्कार

- सलग सातव्या वर्षी संगमेश्वरने पुंजाल करडंक पटकाविला

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

आंतर महाविद्यालयीन स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट कामगिरीचा सर्वोत्कृष्ट महाविद्यालयाचा प्रा. डॉ. पुरणचंद्र पुंजाल करडक संगमेश्वर महाविद्यालयाने पटकाविला असल्याचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांनी जाहीर केले.

यावेळी क्रीडा संचालक अतुल लकडे, जनसपर्क अधिकारी राहूल वंजारे उपस्थित होते. २०२४-२५ या वर्षातील कामगिरीवर हा फिरता करंडक प्रतिवर्षी प्रदान करण्यात येतो. २०१८-१९ पासून हा कंरडक संगमेश्वरने सलग सातव्या वर्षी आपल्याकडे कायम राखण्यात यश मिळविले आहे. राष्ट्रीय क्रीडा दिनी दुपारी चार वाजता विद्यापीठाच्या सभागृहात महाविद्यालयास







गौरविण्यात येणार आहे. त्याचबरोबर आंतर विद्यापीठ स्पर्धेतील पदकप्राप्त १६ खेळाडू यांना रोख रक्कम व करडंक देऊन तर सहभागी व त्यांचे प्रशिक्षक आणि व्यवस्थापक यांनाही करंडक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

**सत्कारमूर्ती खेळाडू, प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक (खेळ प्रकार व महाविद्यालय)**

**खेळाडू : रोख रकमेचे मानकरी :** ॲथलेटिक्स : अरुण राठोड (सुशीलकुमार शिंदे शारीरिक शिक्षण), निरज महारनवर (उमा, पंढरपूर), हर्ष राऊत, प्रणिता जाधवर, (दयानंद कला व शास्त्र), सुजाता बांगर (गणपतराव देशमुख, सांगोला), बबलू चव्हाण, सौरभ चव्हाण (वसुंधरा), विनित दिणकर (संगमेश्वर), तौसिफ नदाफ (वालचंद कला व शास्त्र). कुस्ती : अश्लेषा बागडे (यशवंतराव चव्हाण, करमाळा). डायव्हिंग : श्रीकांत कोंढारे (वालचंद अभियांत्रिकी), शुभांगी मार्चला(हि.ने. वाणिज्य). टेनिस : ज्योत्स्ना मदने (विद्यापीठ), शर्वरी वाघमोडे, कांचन चौगुले (संगमेश्वर), गौरी गुंड (शिवाजी रात्र).

**करंडकाचे मानकरी :** डायव्हिंगः ईश्वर गड्डम (वालचंद कला व शास्त्र), वरुण दोरनाल, रिया मुस्तारे (वालचंद अभियांत्रिक), माधव गड्डम (दयानंद कला व शास्त्र), गुरुराज कुरापाटी, प्रणिता खंडाल (हिराचंद नेमचंद), शुभम अंगडी (फार्मसी). ज्युदो : वैभव शिदुळे (शिक्षणशास्त्र बार्शी), चंद्रिका बाबर (केबीपी पंढरपूर). कराटे : सृष्टी पवार(केबीपी, पंढरपूर), तेजस्विनी वाघमोडे (समीर गांधी, माळशिरस), रेश्मा खान (संगमेश्वर), नक्षत्रा पकाले (हिराचंद नेमचंद). वेटलिप्टींग : हार्दिक लबड, हर्षिता पठारे, केतकी पाटील (शिवाजी रात्र), साक्षी घाडगे (शंकरराव मोहिते, अकलूज). **प्रशिक्षक व संघव्यवस्थापक :** डॉ. किरण चोकाककर, डॉ. अशोक पाटील (ॲथलेटिक्स), डॉ. बापू मोहिते, नंदकिशोर देशपांडे (कुस्ती). बाळासाहेब वाघचवरे, डॉ. रामहरी नागटिळक, दीपक भोसले (जलतरण व डायव्हिंग), डॉ. प्रशांत तांबिले, गणेश जोरवर, विशाल होनमाने, डॉ. एस.एस. मारकड (ज्युदो), संतोष गवळी (वेटलिप्टींग), मंकरद भुजबळ, डॉ. समर्थ मनूकर (टेनिस).

## वालचंद अभियांत्रिकीचे रिद्धी उपासे व रजत आडम अजिंक्य





**पंढरपूर : आंतर महाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धेतून विद्यापीठ संघात निवड झालेल्या खेळाडूंसमवेत मान्यवर.**

- महाविद्यालयीन बुद्धिबळ
- सांघिक स्पर्धेत पुरुष गटात वालचंद अभियांत्रिकी, महिलांत श्री. संत दामाजी मंगळवेढा विजेते

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

आंतर महाविद्यालयीन निवड बुद्धिबळ स्पर्धेत मुलींच्या गटात वालचंद अभियांत्रिकीची आंतरराष्ट्रीय खेळाडू रिद्धी उपासे हिने सहापैकी सहा गुण प्राप्त करत अव्वल स्थान पटकाविले. मुलांच्या गटात वालचंद अभियांत्रिकीच्याच आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त रजत आडम याने ७ गुणांसह विजेतेपद मिळविले. सांघिक स्पर्धेत मुलात वालचंद इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलजीने स्पर्धेत वर्चस्व राखत व मुलीत मंगळवेढाच्या श्री. संत दामाजी महाविद्यालयाने विजेतेपद पटकाविले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर संलग्नित स्वेरी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूरने सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या सहकार्याने पंढरपूर येथील स्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालयात झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. बी. पी. रोंगे व बॅडमिंटनची आंतरराष्ट्रीय खेळाडू शुभदा पाटील यांच्यातील प्रदर्शनीय लढतीने झाले. यावेळी संस्थेचे डॉ. यशपाल खेडकर, सोलापूर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सचिव व आंतरारष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड, पात्रता समितीचे सदस्य प्रा. बाळासाहेब वाघचवरे, प्रा. आनंद चव्हाण, प्रा. किरण चौगुले, प्रा. आनद ढवन, निवड समितीचे चेअरमन प्रा. डॉ. एस. आर. भोसले, सदस्य प्रा. जे. वाय. चेडे, प्रा. डी. एस. भोसले (सदस्य) तसेच आदी क्रीडा संचालक उपस्थित होते. तर बक्षिस वितरण समारंभ स्वेरी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूरच्या उपप्राचार्या डॉ. एम. एम. पवार, प्रा.आनंद ढवण, प्रा.दिपक भोसले, प्रा. गणेश जोरवर, प्रा. एस. एस. गायकवाड, डॉ. एम. एस. मठपती, क्रीडा संचालक गोकुळ यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

स्पर्धेत प्रमुख पंच म्हणून वरिष्ठ राष्ट्रीय पंच उदय वगरे, प्रज्वल कोरे, यश इंगळे यांनी यशस्वीरीत्या काम पाहिले. यावेळी बुद्धिबळ स्पर्धेमध्ये निवड झालेल्या खेळाडूंना व विजेत्या संघांना सन्मानित करण्यात आले. सदर आंतर महाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धेत विविध महाविद्यालयातील ९८ खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता.

**अंतिम निकाल : (अनुक्रमे १ ते ६, गुण व बोकोल्स गुणांसह)**
**वैयक्तिक : मुले :** रजत आडम - ७, वालचंद अभियांत्रिकी, पंडल नवीन ६ (२७) एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी, शहा तनिष्क ६ (२६) वालचंद अभियांत्रिकी, सागर चौगुले ५.५ (३२.५) माढा कॉलेज, ५) रोंगे ओम - ५.५ (२७.५) संगमेश्वर कॉलेज. ६)) जाधव सुमित - ५ सांगोला कॉलेज. **मुली:** रिद्धी उपासे - ६, वालचंद अभियांत्रिकी, वडीशेरला नवीना ५ हिराचंद नेमचंद कॉलेज, येलदी सृष्टी ४.५ डी बी एफ दयानंद कॉलेज, कोरे मयूरी ४.५ एस. बी. पाटील, मंद्रूप, पाटील साक्षी - ४ डी बी एफ दयानंद, शिंदे तृप्ती - ४ श्री संत दामाजी महाविद्यालय मंगळवेढा

**सांघिक (प्रथम तीन) : मुले :** वालचंद इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलजी, सोलापूर (८ गुण), एन बी नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, सोलापूर (७), बी.एम.आय. टी. कॉलेज, बेलाटी (५). **मुली :** श्री. संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा (३, ६), संगमेश्वर कॉलेज, सोलापूर (३, ५ गुण, स्वेरी, पंढरपूर (२)

## समृद्धी क्रीडा सेवा पुरस्कार जाहीर

### अरुण राठोड, संध्याराणी बंडगर पहिल्या खेळाडू पुरस्काराचे मानकरी

- चंद्रकांत रेम्बर्सु क्रीडा संघटक तर दीपक चिकणे प्रशिक्षकाचे मानकरी



अरुण राठोड



संध्याराणी बंडगर



चंद्रकांत रेम्बर्सु



दीपक चिकणे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त समृद्धी कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळ सोलापूर अंतर्गत समृद्धी स्पोर्टस् क्लबच्या वतीने यंदाच्या वर्षापासून समृद्धी क्रीडा सेवा पुरस्कार क्लबचे संस्थापक सचिव संजय सावंत यांनी जाहीर केले.

लांबपल्याचा आंतराराष्ट्रीय धावपटू अरुण राठोड व आंतरराष्ट्रीय लॉन टेनिस खेळाडू संध्याराणी बंडगर हे पहिल्या खेळाडू पुरस्काराचे मानकरी ठरले. २१०० रुपये रोख, मानपत्र, सन्मानचिन्ह व शाल असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. खेळाडूंबरोबरच क्रिकेटचे संघटक चंद्रकांत रेम्बर्सु व धनुर्विद्येचे आंतराराष्ट्रीय प्रशिक्षक दीपक चिकणे यांनाही समुद्धी पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. मानपत्र, सन्मानचिन्ह व शाल असे यांच्या पुरस्काराचे स्वरुप आहे.

क्लबने यासाठी क्रीडा पत्रकार अजितकुमार संगवे, माजी तालुका क्रीडाधिकारी व आंतरराष्ट्रीय खो-खोपटू सत्येन जाधव आणि शासकीय प्रशिक्षक गणेश पवार यांची निवड समिती नियुक्ती केली होती. या निवडसमितीने ही निवड केली आहे. याचे वितरण २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.४५ वाजता विजापूर रस्त्यावरील मयूरवन हॉटेलच्या हॉलमध्ये होईल.

हा पहिलाच पुरस्कार वितरण समारंभ यशस्वीपणे पार पाडण्यासाठी क्लबचे अध्यक्ष राजू प्याटी, उपाध्यक्ष रामचंद्र दत्तू, राजन सावंत, कार्यकारी अध्यक्ष शोएब बेगमपुरे, कार्याध्यक्ष सुरेश भोसले, सल्लागार चंद्रकांत होळकर, रमेश बसाटे, मल्हारी बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली संतोष जाधव, संजय बनसोडे, राजकुमार कोळी, शाहनवाज मुल्ला, पुंडलिक कलखांबकर, गणेश कुडले, रविंद्र चव्हाण व शिवाजी वसपटे हे सदस्य प्रयत्नशील आहेत.





## तालुका योगा स्पर्धेत फॅबटेक पब्लिक स्कूलचे वर्चस्व





**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २७ ऑगस्ट-**

तालुका शालेय योगासन स्पर्धेत येथील फॅब्रटेक पब्लिक स्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेजने उल्लेखनीय कामगिरी केली. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक पंचाक्षरी स्वामी, आरिफ तांबोळी यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडूंचे स्कूलच्या सीईओ सारीका रूपनर, प्राचार्य सिकंदर पाटील, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

**कामगिरी :** १४ वर्ष वयोगट : रिदमक योगामध्ये माधव डोंगरे, राजवीर चंदनशिवे, सर्वज्ञ शिंदे, विष्णू खांडेकर, आसावरी नलवडे, कार्तिकी गव्हाणे, नम्रता गावडे तसेच मुलींच्या योगासना मध्ये अचल येड्रावकर तसेच आर्टिस्टक प्रकारात स्वरा होनराव, आर्या भद्रशेट्टी, कनक लोखंडे.

**१७ वर्षे मुली :** श्रुती चव्हाण, आर्टिस्टीक मध्ये सृष्टी सावंत, शिवाली काटे, राजनंदिनी भिंगे, मयुरेश राऊत, साईराज जानकर.

## राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त ११ आदर्श क्रीडाशिक्षक पुरस्कार जाहीर

- ड्रीम फाउंडेशन व श्री समर्थ करियर अॅकडमीतर्फे उद्या वितरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून ड्रीम फाउंडेशन व श्री समर्थ करियर अकॅडमीतर्फे तर्फे सोलापुरातील विविध शाळा व कॉलेजमधील क्रीडा शिक्षक प्राध्यापकांना आदर्श क्रीडाशिक्षक पुरस्कार सुहास छंचुरे व काशिनाथ भतगुणगी यांनी जाहीर केले आहे.

याचे वितरण जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, द.का.असावा प्रशाला माजी मुख्याध्यापक जितेंद्र पवार, अण्णाप्पा काडादी प्रशाला मुख्याध्यापक अनिल पाटील, ड्रीम फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष काशिनाथ भतगुणगी, श्री समर्थ करियर अकॅडमी रवि राठोड संचालक यांच्या प्रमुख उपस्थितीत २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.३० वाजता श्री समर्थ करियर अकॅडमी सभागृह कुबेर चेंबर या ठिकाणी संपन्न होणार आहे. या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह,शाल, फेटा बुके असे आहे.



विरेश अंगडी



प्रमोद कुनगुलवार



प्रा. विक्रांत विभुते



प्रा. नावेद मुन्शी



संजय पंडित



नेताजी पवार



रोहन घाडगे



शिवानंद सुतार



प्रशांत सूर्यवंशी



रविंद्र चव्हाण



अब्दुल्ला चौधरी

**हे आहेत क्रीडा शिक्षक पुरस्काराचे मानकरी**

विरेश अंगडी (स.हि.ने प्रशाला), प्रा.विक्रांत विभुते (शारीरिक शिक्षण संचालक. संगमेश्वर कॉलेज महाविद्यालय), संजय पंडित (श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला), प्रा.नावेद मुन्शी (एम.ए पानगल उर्दू हायस्कूल व जुनिअर कॉलेज), प्रशांत सूर्यवंशी (लिटिल फ्लावर इंग्लिश मीडियम स्कूल), शिवानंद सुतार (गांधी नाथा रंगजी मराठी मिडीयम विद्यालय), रोहन घाडगे (पी.एस. इंग्लिश मिडीयम प्रायमरी स्कूल), नेताजी पवार (भारती विद्यापीठ हायस्कूल), अब्दुल्ला चौधरी (सनराईज इंग्लिश मिडियम स्कूल), रविंद्र चव्हाण ( आयडिल इंग्लिश मीडियम स्कूल), प्रमोद कुनगुलवार (द.का.आसावा प्रशाला).

## राज्य क्रीडा धोरणाची लवकरच पुनर्रचना : क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे

**मुंबई, दि. २७ ऑगस्ट-**

२०१२ या क्रीडा धोरणाची लवकरच पुनर्रचना करण्याचे आश्वासन राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिले. त्याचबरोबर राज्यातील क्रीडा प्रबोधिनी, स्वयंसिद्धा, स्पोर्ट्स नर्सरी या योजनाचे स्वरूप ही बदलण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

क्रीडामंत्री श्री कोकाटे यांनी राज्यातील अनेक योजनांचा उल्लेख करून त्या मध्ये बदल करून पुन्हा चालू करण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्याचप्रमाणे शासनाच्या अनेक योजना निधी अभावी. गुंडाळण्यात आल्या होत्या. त्याही नव्याने सुरू करण्यासाठी प्रयत्न करू असे असेही त्यांनी सांगितले.

राज्य क्रीडा धोरण समिती सदस्य अविनाश ओंबासे यांनी क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांची भेट घेऊन राज्यातील क्रीडा संदर्भात सविस्तर चर्चा केली.

राज्यात १९९४ साली पहिले क्रीडा धोरण तयार करण्यात आले. दिवंगत क्रीडा महर्षी भीष्मराज काम यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने सरकारला धोरणाचा मसुदा बनवून दिला होता. पण सरकारी अनास्थेमुळे हा मसुदा बरेच वर्ष तसाच धूळ खात पडला होता. त्यानंतर १९९६ साली मनोहर जोशी यांचे सरकार आल्यानंतर त्यांनी हे क्रीडा धोरण राबवले खरे पण त्याचा पाहिजे तसा फायदा झाला नाही. राज्याला क्रीडा धोरण होते पण ते दिशाहीन असल्याने



त्याचा फायदा खेळाडूंना व क्रीडा क्षेत्राला उपयोग झाला नाही. त्यावेळी राज्याच्या क्रीडा धोरणाविषयी राज्यातील क्रीडाक्षेत्रात असणारी उदासीनता लक्षात घेऊन क्रीडा पत्रकार श्री. ओंबासे यांनी २०१०मध्ये राज्य क्रीडा धोरणाचा पंचनामा ही १२ लेखांची मालिका वृत्तपत्रात लिहिली आणि या मालिकेचा संपूर्ण महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रावर खूप मोठा परिणाम झाला. या मालिकेचा आधार घेत तत्कालीन विरोधी पक्षनेते एकनाथ खडसे व बाळा नांदगावकर यांनी विधिमंडळाच्या अधिवेशनात राज्य सरकारला चांगलेच धारेवर धरले, त्याचा परिणाम होऊन मुख्यमंत्र्यांना राज्याचे क्रीडा क्रीडा धोरण बदलण्याचा ऐतिहासिक निर्णय घ्यावा लागला. नवीन क्रीडा धोरण आखण्यासाठी मुख्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली क्रीडा धोरण समिती नेमण्यात आली त्यामध्ये राज्यातील दिग्गज क्रीडा तज्ञांचा बरोबरच काही खासदार व आमदारचाही समावेश होता. या समितीने संपूर्ण राज्याचा क्रीडा क्षेत्राचा अभ्यास करून ५८ शिफारशी असलेल्या क्रीडा धोरणाचा मसुदा तयार करून दिला. २०१२ मध्ये हे क्रीडा राज्याला समर्पित करण्यात आले.

क्रीडा विभागातील सरकारी अधिकाऱ्यांनी क्रीडा धोरणातील ५८ शिफारशी अमलात आणण्याच्या ऐवजी आपल्याला फायदेशीर आणि सोयीच्या शिफारशीची अंमलबजावणी करत बाकीच्या बासनात गुंडाळून ठेवल्या. त्यामध्ये अनेक बदल करून पुन्हा पूर्ण रचना करण्याची आता आवश्यकता असून क्रीडामंत्री कोकाटे यांनी या धोरणाबाबत सकारात्मक प्रतिसाद देत धोरणावर लवकरच बैठक आयोजित केली जाईल असे आश्वासन श्री. ओंबासे यांना दिले.

**सावधानतेची जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः मौजेः बेलाटी ता. उत्तर सोलापूर येथील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी जिल्हा परिषद सोलापूर हद्दीतील व पंचायत समिती तालुका उत्तर सोलापूर पैकी ग्रामपंचायत मौजे बेलाठी मधील पुर्वीच्या खरेदीखताप्रमाणे बिनशेती गट नं. १४५ हिस्सा नं. अ/१ क्षेत्र ०१ हेक्टर ०० आर यांसी आकार रू. ००.५३ पैसे यापैकी सोलापूर मंगळवेढा रस्त्यास लागून पश्चिमउत्तर भागातील जागा यांसी चालु उताऱ्याप्रमाणे गट नं.१४५/१/अ/२ असे असून याची हद्द पुर्वपश्चिम ४६ मीटर व दक्षिणउत्तर ८९ मीटर याचे एकुण क्षेत्र ४००० चौ.मी. किंवा ०.४०.०० हे. आर चौ.मी. इतके आहे. यापैकी क्षेत्र २९०० चौ.मी. किंवा ०.२९.०० हे. आर चौ.मी. इतकी जागा सुर्यकांत धानप्पा वाले यांच्या मालकीची असून त्यांनी सदरची जागा आमचे अशिलास खुषखरेदी देण्याचे इराद्याने दि.१३/०८/२०२५ रोजी रजि. साठेखत आमच्या अशिलाच्या नावाने नोंदवून दिले आहे. आमचे अशिल सदर रजि. साठेखताअन्वये त्वरीत खुषखरेदीखत नोंदवून घेणार आहे. तरी वर नमुद मिळकतीच्या संदर्भात कोणाच्याही हक्क व अधिकार अथवा बोजा व इतर हक्क असल्यास सदरची नोटीस जाहीर झाल्यापासून ४ दिवसात खाली नमुद पत्यावर लेखी तक्रार, कागदपत्रांच्या पुराव्यासह देणे. जर मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास आमचे अशिल वर नमुद मिळकत रितसर रजि. खरेदीखत करतील व तदनंतर कोणाचीही तक्रार व हरकत आल्यास तो आमच्या अशिलांच्या खरेदीखतावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली ता. २६/०८/२०२५.

सही/-
के. चंद्रमोहन
ॲडव्होकेट
पत्ता - फ्लॅट नं.२, वृषाली अपार्टमेंट, गीताधाम, भवानी पेठ, सोलापूर
मो. नं.९८२२९०२८१२
(अशिला तर्फे ॲडव्होकेट)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### वन-डे फलंदाजी क्रमवारीत गिल, रोहित अव्वल स्थानी



**दुबई** : भारतीय फलंदाज शुभमन गिल आणि रोहित शर्मा हे एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थानावर कायम आहेत आणि विराट कोहली चौथ्या क्रमांकावर आहे. मॅके येथे नुकत्याच झालेल्या मालिकेच्या अंतिम फेरीत दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंनी मोठी प्रगती केली आहे. गिल (७८४ रेटिंग गुण) आणि रोहितने (७५६) अनुक्रमे पहिल्या आणि दुसऱ्या स्थानावर झेप घेतली आहे, तर पाकिस्तानचा बाबर आझम (७३९) पहिल्या तीन स्थानांवर आहे. कोहलीचे ७३६ गुण आहेत. गत काही महिन्यांत भारतीय संघाने एकदिवसीय सामन्यांमध्ये स्थान मिळवले नाही, परंतु गोलंदाजांच्या ताज्या एकदिवसीय क्रमवारीत कुलदीप यादव (६५०) आणि रवींद्र जडेजा (६१६) अजूनही तिसऱ्या आणि नवव्या स्थानावर आहेत. रोहित आणि कोहलीने टी-२० व कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली असली तरी, दोघेही एकदिवसीय स्वरूपात सक्रिय आहेत. रोहित आणि कोहली दोघांनीही फेब्रुवारी २०२५ मध्ये युएईमध्ये झालेल्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी दरम्यान शेवटचा एकदिवसीय सामना खेळला होता, जिथे त्यांनी भारताच्या विजेतेपदाच्या मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावली होती. एकदिवसीय गोलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थानावर स्पर्धा अधिकच तीव्र आहे, दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील मालिका संपल्यानंतर श्रीलंकेचा फिरकी गोलंदाज महेश थीकशनाने त्याचा सहकारी केशव महाराज यांच्यासोबत ६७१ रेटिंग गुणांसह अव्वल स्थान पटकावले आहे. ■

### तिरंगी मालिकेसाठी युएई संघाची घोषणा!

**नवी दिल्ली** : आशिया चषक क्रिकेट स्पर्धा ९ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. या बहुराष्ट्रीय स्पर्धेपूर्वी, यूएई, पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यात टी-२० तिरंगी मालिका खेळवली जाणार आहे. ही मालिका २९ ऑगस्टपासून सुरू होणार आहे. दरम्यान, यूएई क्रिकेट संघाने या तिरंगी मालिकेसाठी आपला संघ जाहीर केला आहे. त्यांनी १५ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे, ज्याचे नेतृत्व मुहम्मद वसीम करणार आहे. या तिरंगी मालिकेद्वारे, तिन्ही संघ आगामी आशिया कपची तयारी करताना दिसतील. यूएईने आपल्या संघात अनुभवी आणि तरुण खेळाडूंना स्थान दिले आहे. मुहम्मद वसीम, अलिशान शर्फू, आसिफ खान, ध्रुव पराशर सारखे खेळाडू फलंदाजीची जबाबदारी सांभाळतील. त्याच वेळी, यष्टीरक्षकाची भूमिका आर्यंश शर्माला देण्यात आली आहे. मुहम्मद फारूख, मुहम्मद जवादुल्लाह आणि जुनैद सिद्दीकी सारख्या खेळाडूंना गोलंदाजीत स्थान मिळाले आहे. या तिरंगी मालिकेत, यूएई संघ ३० ऑगस्ट रोजी पाकिस्तानविरुद्ध पहिला सामना खेळेल. त्यांचा पुढचा सामना १ सप्टेंबर रोजी अफगाणिस्तानविरुद्ध असेल. त्यानंतर ४ सप्टेंबर रोजी त्यांचा पुन्हा पाकिस्तानशी सामना होईल आणि ५ सप्टेंबर रोजी त्यांचा सामना अफगाणिस्तानशी होईल. तिरंगी मालिकेसाठी यूएई संघ : मुहम्मद वसीम (कर्णधार), अलीशान शराफू, अर्यांश शर्मा (यष्टिरक्षक), आसिफ खान, ध्रुव पाराशर, एथन डिसूजा, हैदर अली, हर्षित कौशिक, जुनैद सिद्दीकी, मुहम्मद फारूक, मुहम्मद जवादुल्लाह, मुहम्मद जोहैब, राहुल चोपड़ा (यष्टिरक्षक), रोहिद खान आणि सगीर खान.

### मायकेल क्लार्कला त्वचेचा कर्करोग

**मेलबर्न** : ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार मायकेल क्लार्कला त्वचेचा कर्करोग झाला असून यावेळी त्याच्या नाकावरील जखम काढून टाकण्यासाठी त्याच्यावर सहावी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. २०१५ च्या विश्वचषक विजेत्या ४४ वर्षीय कर्णधाराने इंस्टाग्रामवर शस्त्रक्रियेनंतरचा एक फोटो पोस्ट केला आहे, यात त्याने लोकांना विशेषतः ऑस्ट्रेलियासारख्या जास्त सूर्यप्रकाश असलेल्या देशांमध्ये नियमित त्वचेची तपासणी करण्यास प्राधान्य देण्याचे आवाहन केले आहे. त्वचेचा कर्करोग खरा आहे! विशेषतः ऑस्ट्रेलियामध्ये. आज माझ्या नाकातून आणखी एक कापला गेला आहे. बरा होण्यापेक्षा प्रतिबंध चांगला आहे, परंतु माझ्या बाबतीत, नियमित तपासणी आणि लवकर ओळख पटवणे महत्त्वाचे आहे, असे त्याने इन्स्टाग्रामवर लिहिले. क्लार्कला त्याच्या खेळण्याच्या कारकिर्दीत २००६ मध्ये पहिल्यांदा त्वचेच्या कर्करोगाचे निदान झाले होते आणि त्यानंतर त्याने अनेक प्रक्रिया केल्या आहेत. २०१९ मध्ये, त्याच्या कपाळावरील एकासह तीन नॉन-मेलेनोमा जखमा काढून टाकण्यात आल्या. २०२३ मध्ये, त्याच्या छातीतून बेसल सेल कार्सिनोमा काढून टाकल्यानंतर त्याला २७ टाके घालावे लागले, त्यानंतर त्याने जागरूकता पसरवण्यासाठी ऑस्ट्रेलियन स्किन कॅन्सर फाउंडेशनशी भागीदारी केली. ऑस्ट्रेलियाला एकदिवसीय विश्वचषक जिंकून दिल्यानंतर क्लार्कने २०१५ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. ■

# अश्विन आयपीएलमधून निवृत्त

### इतर लीगचा शोधक होण्याची वेळ आली

◆ **चेन्नई, २७ ऑगस्ट**

भारताचा अनुभवी ऑफस्पिनर रविचंद्रन अश्विनने बुधवारी इंडियन प्रीमियर लीगमधून निवृत्तीची घोषणा केली. आंतरराष्ट्रीय क्रिकेटला निरोप दिल्यानंतर काही महिन्यांनी अश्विनचा या स्पर्धेशी १६ वर्षांच्या संबंधावर पडदा पडला. अश्विनने समाजमाध्यम पोस्टद्वारे ही घोषणा केली.

प्रत्येक शेवटाची एक नवीन सुरुवात होईल, आयपीएल क्रिकेटपटू म्हणून माझा वेळ आज संपत आहे, परंतु विविध लीगमधील खेळाचा शोधक म्हणून माझी वेळ आजपासून सुरू होत आहे, असे अश्विनने पोस्टमध्ये म्हटले आहे.

गत काही वर्षांमध्ये सर्व अद्भूत आठवणी व नातेसंबंधांसाठी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आयपीएल आणि बीसीसीआयने आतापर्यंत मला जे काही दिले आहे त्याबद्दल सर्व फ्रॅन्चायझींचे आभार मानू इच्छितो. माझ्यासमोर जे आहे त्याचा आनंद घेण्यासाठी आणि त्याचा जास्तीत जास्त फायदा घेण्यासाठी उत्सुक आहे, असेही तो म्हणाला.



आर. अश्विनचा आयपीएलला रामराम

अश्विनने २००९ मध्ये चेन्नई सुपर किंग्जकडून आयपीएलमध्ये पदार्पण केले. तो शेवटचा आयपीएल २०२५ मध्ये खेळला होता. तो दशकभराच्या विश्रांतीनंतर ९.७५ कोटी रुपयांना सीएसकेमध्ये परतला होता.

अश्विन तू आमचा वारसा उंचावला आहे, असे सीएसकेने म्हटले आहे.

या महिन्याच्या सुरुवातीला अश्विनच्या चेन्नई सुपर किंग्जमधील भविष्याबद्दलच्या चर्चेला उधाण आले होते, याचदरम्यान अश्विनने आपल्या भूमिकेबद्दल सीएसकेकडून स्पष्टता मागितली होती.

अश्विनने गत वर्षी डिसेंबरमध्ये ऑस्ट्रेलिया दौऱ्यादरम्यान आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. त्याच्या कारकिर्दीत तो अनिल कुंबळे (६१९) नंतर कसोटीत भारताचा दुसरा सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज (५३७) झाला होता. एकूणच, त्याने २२१ आयपीएल सामन्यांमध्ये ३०.२२ च्या सरासरीने १८७ बळी घेतले आणि त्याचे सर्वोत्तम आकडे ४/३४ होते. फलंदाजीने त्याने सर्वाधिक ५० आणि १३.०२ च्या सरासरीने ८३३ धावा केल्या. *(वृत्तसंस्था)*

# प्रज्ञानंद जेतेपदाच्या शर्यतीत; गुकेश स्पर्धेतून बाहेर

### सिंक्विफिल्ड चषक बुद्धिबळ

◆ **सेंट लुईस, २७ ऑगस्ट**

ग्रॅण्डमास्टर आर. प्रज्ञानंदाने येथे झालेल्या सिंक्विफिल्ड चषक बुद्धिबळ स्पर्धेच्या आठव्या व उपांत्य फेरीत अमेरिकेच्या वेस्ली सोशी बरोबरी साधल्यानंतर ग्रॅण्ड चेस टूरमध्ये एकूण अव्वल चाररमध्ये स्थान मिळवण्याच्या शर्यतीत स्वतःला कायम ठेवले.

विश्वविजेता डी. गुकेशलाही अमेरिकेच्या लेव्हॉन ॲरोनियनने बरोबरी रोखले, त्यामुळे गुकेश दहा खेळाडूंच्या राऊंड रॉबिन स्पर्धेतून बाहेर झाला.

फ्रान्सचा खेळाडू मॅक्सिम वॅचियर-लाग्राव्हने अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनाविरुद्ध पांढऱ्या तुकड्यांसह बरोबरी साधली. कारूआनाने अंतिम फेरीतील निकाल काहीही असो, आपल्या पहिल्या स्थानासह ग्रॅण्ड फिनालेमध्ये स्थान मिळवले.

ग्रॅण्ड चेस टूरच्या एकूण क्रमवारीमधील अव्वल चार ब्राझीलमधील साओ पाउलो येथे होणाऱ्या अंतिम फेरीसाठी देखील पात्र ठरतील. या स्पर्धेची सुरुवात या वर्षीपासून होईल.



आर. प्रज्ञानंद आणि डी. गुकेश

वाचियर-लाग्राव्हशिवाय ॲरोनियन, कारूआना व प्रज्ञानंद हे अंतिम फेरीसाठी प्रबळ दावेदार आहेत. दरम्यान, प्रज्ञानंद आणि कारूआना मैदानापासून अर्धा गुणांनी मागे राहिले आणि त्यांचे आठ सामन्यांतून ५.५ गुण झाले. त्यांच्यापेक्षा अर्ध्या गुणांनी वेस्ले व ॲरोनियन मागे आहेत. त्यांची अमेरिकेच्या सॅम्युअल सेव्हियन, पोलंडचा डुडा जान-क्रिसस्टोफ आणि वॅचियर-लॅग्राव्ह यांच्यापेक्षा समान फरकाने आघाडी आहे.

३.५ गुणांसह, गुकेश क्रमवारीत आठव्या स्थानावर आहे आणि फ्रान्सचा अलिरेझा फिरोज्झा (३) आणि उझबेकिस्तानचा नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्ह २.५ गुणांसह मागे आहे. इटालियन सलामीच्या सामन्यात प्रज्ञानंदने वेस्लीच्या टू नाईट्स डिफेन्सचा सामना केला. *(वृत्तसंस्था)*

# भारताच्या २०३० च्या राष्ट्रकुल स्पर्धेच्या आयोजनाच्या बोलीला मंत्रिमंडळाची मान्यता

◆ **नवी दिल्ली, २७ ऑगस्ट**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी २०३० च्या राष्ट्रकुल स्पर्धेच्या आयोजनाच्या भारताच्या बोलीला मान्यता दिली. अहमदाबादला 'जागतिक दर्जाचे स्टेडियम, अत्याधुनिक प्रशिक्षण सुविधा आणि उत्साही क्रीडा संस्कृती' यामुळे 'आदर्श' स्थळ म्हणून घोषित करण्यात आले.

भारतीय ऑलिम्पिक संघटनेने (आयओए) आवड व्यक्त सादर केल्यानंतर या हालचालीला मान्यता दिल्यानंतर काही दिवसांतच हा निर्णय घेण्यात आला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने २०३० च्या राष्ट्रकुल स्पर्धेसाठी बोली सादर करण्यासाठी युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाच्या प्रस्तावाला मान्यता दिली, असे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. 'संबंधित मंत्रालये, विभाग आणि अधिकाऱ्यांकडून आवश्यक हमींसह यजमान सहयोग करार (एचसीए) वर स्वाक्षरी करण्यास आणि बोली स्वीकारल्यास गुजरात सरकारला आवश्यक अनुदान देण्यास मान्यता देण्यासही मान्यता दिली, असे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. *(वृत्तसंस्था)*

# अनिश भानवालाने जिंकले रौप्यपदक

### आशियाई नेमबाजी स्पर्धा

◆ **श्यामकेंट, २७ ऑगस्ट**

कझाकस्तानच्या श्यामकेंटमध्ये आयोजित आशियाई नेमबाजी स्पर्धेत बुधवारी पुरुषांच्या २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूल प्रकारात भारतीय नेमबाज अनिश भानवालाने रौप्यपदक जिंकले.

२२ वर्षीय अनिशने एकूण ३५ गुणांसह अंतिम फेरी गाठली. तो चीनच्या सुवर्णपदक विजेत्या सु लियानबोफानपेक्षा केवळ एका गुणाने मागे राहिला. कोरियाच्या ली जेक्युनला कांस्यपदक मिळाले.



भारताने आतापर्यंत या स्पर्धेत ७२ पदके जिंकली आहेत, यात कनिष्ठ गटांच्या स्पर्धांचाही समावेश आहे. यापैकी ३९ पदके सुवर्णपदक आहेत. कनिष्ठ गटातील नेमबाजांच्या चमकदार कामगिरीमुळे ही संख्या मोठ्या प्रमाणात वाढली.

पहिल्या चार मालिकांनंतर भारतीय खेळाडूने एका गुणाची आघाडी घेतली होती, परंतु त्यानंतर ती मागे पडली.

मंगळवारी, ऑलिम्पिकपटू सिफ्ट कौर समराने वैयक्तिक महिला ५० मीटर रायफल ३ पोझिशनमध्ये सुवर्णपदक जिंकून अविश्वसनीय कामगिरी केली आणि देशाला सांघिक विजेतेपद मिळवून दिले. *(वृत्तसंस्था)*

# दुलीप करंडक क्रिकेट सामने आजपासून


◆ **बंगळुरू, २७ ऑगस्ट**

बीसीसीआयची प्रतिष्ठित दुलीप करंडक क्रिकेट स्पर्धा गुरुवारपासून प्रारंभ होत आहे. उद्यापासून येथे उत्तर विभाग आणि पूर्व विभाग यांच्यादरम्यान, तर मध्य विभाग आणि उत्तर-पूर्व विभाग यांच्यादरम्यान ऊपांत्यपूर्व सामना खेळला जाणार आहे.

लाल चेंडूची क्रिकेट स्पर्धा आपल्या पारंपारिक झोनल स्वरूपात परत येत असल्याने आणि भारताच्या देशांतर्गत क्रिकेट हंगामाची सुरुवात होत असल्यामुळे दुलीप करंडकाचा स्तर उंचावण्यासाठी काही इच्छुक खेळाडू प्रयत्न करतील.

शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील उत्तर विभाग आणि ईशान किशनच्या नेतृत्वाखालील पूर्व विभाग यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. जखमी ईशान किशनच्या अनुपस्थितीत अभिमन्यू ईश्वरन् पूर्व विभागाचे नेतृत्व करणार आहे. इंग्लंडमध्ये संघाच्या बाहेर राहिल्यानंतर ईश्वरन् धावा काढण्यास उत्सुक असेल. भारतीय संघाचा अनेक वेळा भाग असूनही, ईश्वरनला पदार्पण करता आलेले नाही. गोलंदाजी विभागात मोहम्मद शमीला दुखापतींमुळे कसोटी संघात स्थान गमावल्यानंतर त्याच्या तंदुरुस्तीचे मूल्यांकन केले जाईल.

तिकडे शुभमन गिलच्या अनुपस्थितीत अंकित कुमार नेतृत्व करेल अशी अपेक्षा आहे. गिलला उत्तर विभागाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी देण्यात आली होती पण आजारपणामुळे तो पहिल्या सामन्यासाठी उपलब्ध नाही. गिलच्या अनुपस्थितीत उपकर्णधार अंकित कुमार संघाचे नेतृत्व करेल अशी अपेक्षा आहे.



ध्रुव जुरेलच्या नेतृत्वाखाली मध्य विभागाचा संघ रोंगसेन जोनाथनच्या नेतृत्वाखालील उत्तर पूर्व विभागाविरुद्ध खेळणार आहे.

या दोन सामन्यातील विजयी संघ उपांत्य फेरीत ४ सप्टेंबरपासून दक्षिण विभाग आणि पश्चिम विभाग संघांविरुद्ध खेळतील. दक्षिण विभाग संघाचे नेतृत्व तिलक शर्मा करणार असून पश्चिम विभागाचे नेतृत्व शार्दुल ठाकूर करणार आहेत. अंतिम सामना ११ सप्टेंबरपासन खेळला जाणार आह.

**आजचे सामने**

उत्तर विभाग वि. पूर्व विभाग

मध्य विभाग वि. उत्तर-पूर्व विभाग

इंग्लंडमध्ये भारताच्या कसोटी संघाचा भाग असलेले शार्दुल ठाकूर, श्रेयस अय्यर, सर्फराज खान आणि यशस्वी जयस्वाल पश्चिम विभागीय संघाचे प्रतिनिधीत्व करतील. अय्यर धावांचा डोंगर रचण्याचा प्रयत्न करेल. अलिकडच्या इंग्लंड दौऱ्यात दुर्लक्षित झालेल्या सर्फराजसुद्धा अशाच काही प्रयत्नांत असेल. आशिया चषक टी-२० साठी निवड न झाल्याने अय्यरला अतिरिक्त प्रेरणा मिळेल. जयस्वाललाही त्याची स्वतःची कोणतीही चूक नसतानाही आशिया चषक संघातून दुर्लक्षित करण्यात आले.

तिलक वर्माच्या नेतृत्वाखाली दक्षिण विभागीय संघात, आर. साई किशोरवर लक्ष केंद्रित असेल. साई हाताच्या दुखापतीमुळे बुची बाबू स्पर्धेत खेळू शकला नाही. केएल राहुल आणि साई सुदर्शन या स्पर्धेत खेळत नाहीत.

देवदत्त पडिक्कल दुखापतीतून परतणार आहे आणि प्रभावी कामगिरी त्याला पुन्हा राष्ट्रीय संघात स्थान मिळवून देऊ शकते.

अर्शदीप सिंग व हर्षित राणा, आशिया चषक संघाचा भाग असलेले दोन वेगवान गोलंदाज कदाचित युएईला जाणाऱ्या टी-२० संघात सहभागी होण्यापूर्वी केवळ पहिल्या सामन्यात खेळतील.

ध्रुव जुरेल आणि रजत पाटीदार ही मध्य विभागाच्या संघातील उल्लेखनीय नावे आहेत. जुरेलच्या नेतृत्व कौशल्याचे या स्पर्धेत परीक्षण केले जाईल. *(वृत्तसंस्था)*

# १९९४ नंतर पहिल्यांदाच कझाकस्तान आशिया चषक हॉकी स्पर्धेत खेळणार



राजगीरमध्ये दाखल झालेला कझाकस्तानचा पुरुष हॉकी संघ

◆ **राजगीर, २७ ऑगस्ट**

आगामी २९ ऑगस्टपासून येथे सुरू होणाऱ्या आशिया चषकासाठी कझाकस्तानचा पुरुष हॉकी संघ येथे दाखल झाला आहे. १९९४ नंतर या खंडीय हॉकी स्पर्धेत कझाकस्तान संघाचा पहिलाच सहभाग आहे.

येर्केबुलान ड्युसेबेकोव्ह यांच्या नेतृत्वाखाली संघ मंगळवारी रात्री उतरला. भारतीय भूमीवर त्यांचा पहिलाच सहभाग असेल. कझाकस्तान संघाला १९९४ च्या हिरोशिमा येथील आशिया चषकामध्ये पाचव्या स्थानावर समाधान मानावे लागले होते. त्याच वर्षी, त्यांना आशियाई क्रीडा स्पर्धेतही सहाव्या स्थानावर समाधान मानावे लागले.

सध्या एफआयएच जागतिक क्रमवारीत ८१ व्या स्थानावर असलेले कझाकस्तान गट अ मध्ये यजमान भारत, जपान आणि चीनसह आहे.

ते २९ ऑगस्ट रोजी जपानविरुद्ध त्यांच्या मोहिमेची सुरुवात करतील, त्यानंतर ३१ ऑगस्ट रोजी चीनविरुद्ध लढतील आणि त्यानंतर १ सप्टेंबर रोजी भारताविरुद्धच्या सामन्याने गट फेरीचा शेवट करतील.

आम्हाला पहिल्यांदाच भारतात येण्याचा खूप आनंद आहे. हा देश हॉकीचा केंद्रबिंदू म्हणून ओळखला जातो आणि अशा वातावरणात खेळणे ही आमच्यासाठी एक खास संधी आहे, असे ड्युसेबेकोव्हने म्हटले आहे.

आमचा संघ खूपच तरुण आहे आणि गत काही महिन्यांपासून आमची तयारी या खेळाडूंना आत्मविश्वास आणि उच्च पातळीवर अनुभव देण्याबाबत आहे. गटातील ऊर्जा आणि उत्साह विलक्षण आहे आणि आम्ही प्रत्येक सामन्यात शिकण्यास आणि वाढण्यास उत्सुक आहोत, असे तो म्हणाला.

आमच्या संघाला कठोर संघर्ष करावा लागेल, कारण भारत, जपान आणि चीनसह गटात स्थान मिळवणे हे एक कठीण आव्हान असेल, परंतु आशियातील काही सर्वोत्तम संघांविरुद्ध स्वतःची चाचणी घेण्याची ही एक उत्तम संधी म्हणून आम्ही पाहतो, असेही तो म्हणाला. *(वृत्तसंस्था)*

# ध्रुव कपिला, तनिषा क्रॅस्टो उप-उपांत्यपूर्व फेरीत



ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो

### बीडब्ल्यूएफ जागतिक बॅडमिंटन

◆ **पॅरिस, २७ ऑगस्ट**

येथे सुरु असलेल्या बीडब्ल्यूएफ जागतिक बॅडमिंटनअजिंक्यपद स्पर्धेत बुधवारी झालेल्या मिश्र दुहेरीच्या सामन्यात ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो या भारतीय जोडीने आयर्लण्डिच्या जोशुआ मॅगी आणि मोया रायन या जोडीवर सरळ गेममध्ये विजय मिळवत उप-उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

१६ व्या मानांकित ध्रुव व तनिषाने केवळ ३५ मिनिटांत आयर्लण्डच्या जोडीला २१-११, २१-१६ असे हरवून वर्चस्व गाजवले. उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळविण्यासाठी भारतीय जोडीचा पुढील सामना हाँगकाँगच्या पाचव्या मानांकित तांग चुन मान आणि त्से यिंग सुएट या जोडीशी होईल.

ध्रुव व तनिषाने सुरुवातीपासूनच नियंत्रण मिळवले व ६-२ अशी आघाडी घेतली. ब्रेकपर्यंत ती आघाडी ११-६ अशी वाढवली व पहिला गेम आरामात जिंकला. दुसऱ्या गेममध्येही भारतीय जोडीने ७-२ अशी आघाडी घेतली आणि जास्त अडचणीशिवाय सामना संपवला. *(वृत्तसंस्था)*

### नीरज चोप्राचे पुन्हा ९० मीटर थ्रोचे लक्ष्य

**इयुरिच** : दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेता नीरज चोप्रा गुरुवारी येथे संपत असताना आपल्या हंगामातील ९० मीटर प्रदर्शनाची पुनरावृत्ती करून डायमंड लीग ट्रॉफी पुन्हा मिळवण्यास सज्ज असल्याचे दिसून येते. पुरुषांच्या भालाफेकीत चार डायमंड लीग सामने झाले आणि चोप्रा केवळ दोनमध्येच सहभागी झाले आणि १५ गुणांसह चौथ्या स्थानावर राहून अंतिम फेरीसाठी पात्र ठरला. ■

# गॉफचा टॉमलजानोविचवर विजय; इगा, सिनरचा सहज विजय

### अमेरिकन ओपन टेनिस

◆ **न्यू यॉर्क, २७ ऑगस्ट**

माजी विजेत्या कोको गॉफने पहिल्या फेरीत बिगरमानांकित अजला टॉमलजानोविचवर ६-४, ६-७(२), ७-५ असा विजय मिळवून अमेरिकन ओपन टेनिस मोहिमेची सुरुवात केली. वर्षाच्या शेवटच्या ग्रॅण्ड स्लॅमपूर्वी प्रशिक्षणामध्ये उशिरा झालेल्या बदलानंतर अमेरिकन खेळाडूला मोठी परीक्षा द्यावी लागली.

मार्गदर्शक मॅट डेलीशी संबंध तोडल्यानंतर आणि तिच्या कायमच्या सर्व्हिस समस्या सोडवण्यासाठी बायोमेकॅनिक्स तज्ज्ञ गॅव्हिन मॅकमिलनला नियुक्त केल्यानंतर न्यू यॉर्कमध्ये आलेल्या कोको गॉफने आर्थर ॲश स्टेडियमवर डळमळीत सुरुवात केली.

२०२३ च्या विजेत्याने आपल्या चेंडूवर सुरुवातीचा गेम सोडला आणि अखेर निर्णायक ब्रेकसह पहिला सेट जिंकला.

आर्थर ॲश स्टेडियमवर माजी विजेत्या इगा स्वियातेक व जॅनिक सिनरने आपल्या अमेरिकन ओपनच्या पहिल्या फेरीतील प्रतिस्पर्ध्यांवर मात केली.

विम्बल्डन विजेत्या पोलंडच्या इगा स्वियातेकने सिनसिनाटी ट्यून-अप स्पर्धेत ट्रॉफी उंचावल्यानंतर न्यू यॉर्कमध्ये उत्कृष्ट फॉर्ममध्ये आगमन केले आणि एका तासात एमिलियाना अरांगोचा ६-१, ६-२ असा पराभव केला. २०२२ च्या विजेत्याचा पुढील सामना नेदरलॅण्डच्या सुझान लॅमेन्सशी होणार आहे.



प्रतिस्पर्धीचा फटका परतविताना कोको गॉफ

**नाओमी ओसाकाची घोडदौड**

नाओमी ओसाकाने चमकदार लाल रंगाच्या नायकेच्या पोशाखात कोर्टवर पाऊल ठेवत बेल्जियमच्या ग्रीट मिनेनला ६-३, ६-४ असे पराभूत केले आणि दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.

१०६ व्या क्रमांकावर असलेल्या मिनेनला ओसाकाच्या अथक बेसलाइन पॉवरविरुद्ध ३० अनफोर्स्ड चुकांमुळे अखेर पराभूत करण्यात आले. 'मला वाटते की ती माझ्या अपेक्षेपेक्षा जास्त आक्रमक होती. कधीकधी मी थोडीशी भारावून जायची, परंतु मी तिला आणखी एक शॉट खेळत राहण्यासाठी भाग पाडण्याचा प्रयत्न केला, असे ओसाका म्हणाली.

**सिनरचची विट कोप्रिव्हावर मात**

अव्वल क्रमांकाच्या गतविजेत्या इटलीच्या जॅनिक सिनेरने त्याचा झेक प्रजासत्ताकचा प्रतिस्पर्धी विट कोप्रिव्हा याचा ६-१, ६-१, ६-२ असा पराभव केला. त्यानंतर त्याची गाठ ऑस्ट्रेलियन ॲलेक्सी पोपिरिनशी पडेल. ॲलेक्सने फिन एमिल रुसुवुओरीला ६-३, ६-४, ७-६(३) असा पराभव केला.

चार वेळचा ग्रॅण्ड स्लॅम विजेता सिनर या महिन्याच्या सुरुवातीला आजारपणामुळे यूएस ओपन ट्यून-अप स्पर्धेतून निवृत्त झाला होता परंतु आर्थर ॲशे स्टेडियमवर त्याला सात एसेस मारण्यात कोणतीही अडचण आली नाही.

मी पुन्हा निरोगी आहे याचा खूप आनंद आहे, आम्ही येथे सर्वोत्तम स्थितीत राहण्यासाठी आमचे सर्वोत्तम प्रयत्न केले, असे सिनर म्हणाला. *(वृत्तसंस्था)*

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### माजी नगरसेविका चव्हाण यांचे पालकमंत्र्यांना निवेदन; प्रभागास निधी देण्याचे दिले आश्वासन

सोलापूर, दि.२७ ऑगस्ट-

प्रभाग क्रमांक २६ मध्ये हद्दवाढ परिसर अधिक आहे. येथे सुमारे २५ ते ३० वर्षापासून विकास कोसोदूर आहे. अनेक नगरे विकासापासून वंचित आहेत. त्यामुळे येथील विकासासाठी निधी देण्याबाबतचे निवेदन माजी नगरसेविका राजश्री चव्हाण यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांना दिले आहे. नगरसेविकपदाच्या कार्यकाळात चव्हाण यांनी अनेक नगरातील विकासाला गती दिली मात्र कार्यकाल कमी पडल्याने अनेक कामे राहिली आहेत. त्यामुळे पालकमंत्री गोरे यांनी विशेष बाब म्हणून या प्रभागाकडे लक्ष देण्याची मागणी या निवेदनातून चव्हाण यांनी केली आहे. हे निवेदन देण्यासाठी माजी नगरसेविका चव्हाण पालकमंत्री गोरे यांच्या गावी माण-खटाव येथे समक्ष जाऊन त्यांची भेट घेतली. यावेळी पालकमंत्री गोरे यांनी जनतेसाठी झटणारे नगरसेवक व ग्राउंड लेव्हलचे कार्यकर्ते पाठपुरावा करून जनतेच्या समस्या सोडवीत असल्यामुळेच भाजप पक्ष देशात नव्हे तर जगात एक नंबर झाला असून तुम्ही दिलेल्या निवेदनातील नगराला प्राधान्याने निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे ठोस आश्वासन दिल्याचे चव्हाण यांनी सांगितले. त्यामुळे प्रभाग क्रमांक २६ मधील खालील नगरांचा खुंटलेला विकास होणार आहे त्यात कोरे वस्ती, राऊत वस्ती, विराट नगर, ए. जी. पाटील नगर, जय महालक्ष्मी नगर, समर्थ नगर, कल्याण नगर भाग १ व २, वास्तु विहार नगर, ज्योती नगर, मीना नगर, गुरुदेव दत्त नगर भाग १ ते ६, रत्नमंजिरी नगर, सुभाष शहा नगर, पाटलीपुत्र नगर, उद्धव नगर भाग १ व २, रेणुका नगर, रजनीश रेसिडेन्सी पार्क, पंढरी नगर (शिक्षक सोसायटी), आदित्य नगर, आर्यन रेसिडेन्सी पार्क, पंचवटी नगर, अश्विनी सोसायटी, एस.आर.पी. कॅम्प, गजानन नगर, रक्षक सोसायटी, प्रल्हाद नगर, प्रियांका नगर, रेशमा नगर, हरी ओम नगर, समर्थ सोसायटी, रोहिणी नगर भाग १, सहारा सोसायटी, अण्णा कॉलनी, रामनारायण चंडक विहार, अमर नगर सोरेगाव, अक्षय सोसायटी, कृष्णा कॉलनी, तसेच बँक कॉलनी आदी नगरात अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा लाईन, ड्रेनेज लाईन, स्ट्रीटलाईट आदी कामासाठी लक्ष घालण्याचे निवेदनात म्हटले आहे.

### स्क्रीन वॉर्ड्स भारतीय सिनेमाचा सर्वात प्रतिष्ठित उत्सव

सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-

इंडियन एक्सप्रेस ग्रुप अभिमानाने यूट्यूबवर स्क्रीन वॉर्ड्स २०२५ चा नवा अविष्कार सादर करत आहे. स्क्रीन वॉर्ड्स हा भारतीय सिनेमाच्या आणि कथाकथनाच्या सर्वात प्रतिष्ठित उत्सवांपैकी एक आहे.हा फक्त आणखी एक वॉर्ड शो नाही. स्क्रीन वॉर्ड्स २०२५ हा संपादकीय विश्वासार्हता, सांस्कृतिक वारसा आणि डिजिटल पोहोच यांचा शक्तिशाली संगम आहे. इंडियन एक्सप्रेस ग्रुप च्या पत्रकारिता प्रथम (जर्नलिझम-फर्स्ट) तत्त्वज्ञानावर आधारित हे पुरस्कार प्रामाणिकपणा आणि गुणवत्तेचे द्योतक आहेत. इंडियन एक्सप्रेस ग्रुपचे कार्यकारी संचालक अनंत गोयंका म्हणाले, जिथे केवळ कलेक्शनपेक्षा सर्जनशीलतेचा अधिक उत्सव साजरा केला जातो असे व्यासपीठ भारतीय सिनेमाला हवेच आहे. हा वॉर्ड, हे पुरस्कार त्या भावनेला सन्मान देईल आणि भारताच्या सर्वात घाडसी, मूळ प्रतिभेवर प्रकाश टाकेल. डिजिटल-फर्स्ट दृष्टीकोनातून आशय आणि फॉरमॅट-प्रकार हाताळत स्क्रीन वॉर्ड्स यूट्यूबवर सादर होतील.



### अक्कलकोटमध्ये नूतन पोलीस निरीक्षक भिताडे यांचे स्वागत तर बदलीबद्दल टाकणेंना निरोप

अक्कलकोट, दि.२७ ऑगस्ट-

महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील संघटना अक्कलकोटच्या वतीने उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांची बढती होऊन बदली झाल्याने निरोप समारंभात सत्कार करण्यात आला. तर अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्याचे नूतन पोलीस निरीक्षक दीपक भिताडे यांचे स्वागत सत्काराने करण्यात आले. यावेळी मंचावर अक्कलकोटचे उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावर, अक्कलकोटचे तहसीलदार विनायक मगर, अक्कलकोटचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते. यावेळी अक्कलकोट तालुका पोलीस पाटील संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. तालुकाध्यक्ष रहिमान अत्तार, उपाध्यक्ष महादेव पाटील, भिमण्णा म्हेत्रे, विजय बावकर, महिला तालुका उपाध्यक्ष वैशाली मोरे, अक्कलकोट बीट प्रमुख दिगंबर सोनकांबळे, मोहन वाघमोडे, हुसेन कारंजे, जिल्हा कार्यकारणी सदस्या सुप्रिया गायकवाड, लालबी हन्नुरे, सुमित्रा सुरवसे, प्रदीप वडगाव, संतोष गुजा, तालुका कार्याध्यक्ष महेश कोतले, कोषाध्यक्ष संतोष बनसोडे, सुरेश कोळी, शिवानंद बिराजदार, योगेश जाधव, जिल्हा सहसचिव श्रीशैल बिराजदार, शिवाजी जाधव, श्री. पोतदार, हुसेनी बेलमे, सैपर फकीर आदी पोलीस पाटील उपस्थित होते.

## निधन वृत्त...



### बलभीम वाघमारे

सोलापूर, दि. २७

स्टेट बँक ऑफ इंडिया मधील सेवानिवृत्त अधिकारी बलभीम भागण्णा वाघमारे (८१, रा. विष्णुप्रिया अपार्टमेंट, नवीन आरटीओ कार्यालयाजवळ, सोलापूर) यांचे बुधवारी दुपारी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा गुरुवार २८ ऑगस्ट रोजी दुपारी तीन वाजता निघून अक्कलकोट रोड स्मशानभूमी येथे अंतिम संस्कार होणार आहेत. त्यांच्या पश्चात चार मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. माहिती व जनसंपर्क विभागातील वरिष्ठ सहाय्यक संचालक नंदकुमार वाघमारे यांचे ते वडील होत.

# डोणज येथे एकाच रात्री तीन चोऱ्या; मंदिरातील दानपेटी लंपास

तभा वृत्तसेवा,
मंगळवेढा, दि. २७ ऑगस्ट-

डोणज येथील श्री महासिद्ध मंदिराचे लोखंडी ग्रीलचे कुलुप तोडून मंदिरात प्रवेश करून दानपेटी मधील ५ हजार रूपये चोरट्याने चोरून नेले आहेत. तसेच अन्य दोन ठिकाणी पतसंस्थेचे शटर व पोस्ट कार्यालयातील शटर उचकटून चोरीचा प्रयत्न केल्याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरूद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिस सूत्रांनी दिलेली माहिती अशी, दि.२६ ऑगस्ट रोजी पहाटे ३.३० वाजता यातील फिर्यादी प्रविणकुमार जतकर यांना गावातील प्रविण बाळगे यांचा कॉल आला. तुमच्या पतसंस्थेचे शटर कोणीतरी उचकटले आहे. लागलीच फिर्यादी शेतातून मोटरसायकलवर गावात आल्यानंतर त्यांना महासिद्ध मंदिराच्या समोरील लोखंडी ग्रील चे कुलूप खाली पडलेले दिसले. त्यावेळी फिर्यादीने मंदिरात जावून पाहिले असता देवाची स्टीलची दान पेटी दिसून आली नाही. याबाबत देवाचे पुजारी यांना कळवले. पुजारी यांनी मंदिरात येवून पाहिले असता दान पेटीमधील ५ हजार रूपये चोरट्याने चोरून नेल्याचे निदर्शनास आले. तदनंतर फिर्यादी हे त्यांच्या पतसंस्थेकडे गेल्यावर त्यांना शटर फक्त एका बाजूने उचकटलेले दिसले. यावेळी गावातील प्रमोद आनंदपुरे, बाबुलाल शेख, यशवंत छापछडी, शिवानंद आनंदपुरे व इतर लोक घटनास्थळी जमा झालेले होते. त्याचबरोबर पतसंस्थेजवळील पोस्ट ऑफिसचे देखील चोरट्याने दरवाजाचे कुलूप तोडल्याने दरवाजा उघडा दिसल्याने सदर ग्रामस्थानी आत जावून पाहिले असता खुर्च्या अस्ताव्यस्त पडलेले दिसल्या. दरम्यान मंदिरातील दान पेटीचा फिर्यादी व अन्य ग्रामस्थानी शोध घेतला असता मदिराच्या समोरील झाडाखाली स्टीलची दान पेटी पडलेली दिसली. पैसे मात्र त्यामध्ये मिळून आले नसल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान मंगळवेढा शहर व ग्रामीण भागात चोरट्यानी अनेक दिवसापासून धुमाकुळ घातला असून आतापर्यंत पोलिसांना एकही चोरी उघड करताही आली नाही. तसेच चोरही सापडला नसल्यामुळे पोलिस प्रशासनावर मोठी नामुष्कीची वेळ आली आहे. मागील दोन आठवड्यापूर्वी फिरावयास गेलेल्या एका वृद्ध महिलेला शहराजवळ असलेल्या बायपास रोडवर भर दिवसा ५ लाखाचे सोन्याचे दागिने लुटण्याचा प्रकार झाला. अद्यापही पोलिसांना चोरटा शोधण्यात यश आले नाही. ग्रामीण भागात एका खेडयामध्ये भिक्षेकरू बनून आलेल्या व्यक्तीने वस्तीवर राहिलेल्या महिलेस भिक्षा मागण्याचे ढोंग करत दागिने लुटण्याचा प्रकार घडला होता. मंगळवेढा शहरात अनेक घरफोड्या तसेच शहरात बसस्थानकात महिलांच्या गळयातील दागिने पळवण्याचा प्रकार घडला असून या सर्व घटनांची मंगळवेढा पोलिसात नोंद होऊनही चोरटे सापडत नसल्यामुळे नागरिकांचा जीव टांगणीला लागला आहे. चोरटे शोधण्यासाठी तपास अधिकारी तसदी घेत नसल्यामुळेच त्यांच्या कर्तव्यावर संशय व्यक्त नागरिक करीत आहेत. अशा बेजबाबदार अधिकाऱ्यांची उचलबांगडी करून कर्तव्यदक्ष अधिकारी नेमावेत अशी मंगळवेढेकरांची मागणी आहे.



# रोपळे (क) येथील शिबिरात १०१ जणांचे रक्तदान तर ५५ जणांची नेत्र तपासणी




### मा.आ. शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजन

तभा वृत्तसेवा,
कुर्डूवाडी,दि.२७ ऑगस्ट-

माढा तालुक्यातील रोपळे (क) येथे मा. आमदार बबनदादा शिंदे व करमाळा तालुक्याचे मा.आमदार संजयमामा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त १०१ जणांनी रक्तदान केले. तर २२५ जणांची तीर्थयात्रा झाली. यावेळी ५५ जणांची मोफत नेत्रतपासणी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन दि. २३, २४ व २५ ऑगस्ट रोजी करण्यात आले होते. २३ ऑगस्ट रोजी रक्तदान शिबिर व मोफत नेत्र तपासणी शिबिर झाले. उद्घाटन माजी सभापती विक्रम दादा शिंदे यांच्या हस्ते झाले. ५५ गरजू रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करून चष्मे वाटप करण्यात आले. २४ ऑगस्ट रोजी २२५ भाविकांना देवदर्शन घडवण्यात आले. देवदर्शनाला जाणाऱ्या गाड्यांचे पूजन निमगावचे सरपंच यशवंत भैय्या शिंदे यांच्या हस्ते झाले. श्री क्षेत्र रामलिंग, श्री येडेश्वरी, श्री दत्त मंदिर मलकापूर व चिंचगाव टेकडी येथील दर्शनाचा लाभ घेतला. २५ ऑगस्ट रोजी होम मिनिस्टर व संजयमामांचा नागरी सत्कार करण्यात आला. विविध स्पर्धेत प्रथम, द्वितिय व तृतीय क्रमांक मिळवलेल्या ९० विद्यार्थ्यांना प्रम णपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले. तसेच रोपळेतील एमबीबीएस, बीएचएमएस, बीएएमएसच्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व्यक्तींना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले. यावेळी अजिनाथ गोडगे, सरपंच लक्ष्मण लोंढे, उपसरपंच श्रीपाद दळवे आदि उपस्थित होते. होम मिनिस्टर कार्यक्रमात ७०० महिलांनी सहभाग घेतला. प्रथम पारितोषिक श्रीमती सविता गोडगे यांना मानाची पैठणी, वैशाली गोडगे यांचे तर्फे, द्वितीय पारितोषिक जयश्री वाळके यांना नाकातील सोन्याची नथ सीमाताई बाळासाहेब दास यांचे तर्फे व तृतीय पारितोषिक उज्वला पवार यांना चांदीचा करंडा माधुरी तानाजी दास यांचे तर्फे देण्यात आला. तसेच उत्तेजनार्थ बक्षीस शिवानी साळवे यांना देण्यात आले. महिलांना आयोजकांतर्फे श्री विठ्ठल रुक्मिणीची पितळेची मूर्ती गिफ्ट म्हणून देण्यात आली. सूत्रसंचालन तानाजी गोडगे यांनी केले. अजीनाथ गोडगे यांनी आभार मानले.

# नवचैतन्य बाल मंडळाचा 'श्रीगणेशा' वृक्षारोपणाने

तभा वृत्तसेवा
अक्कलकोट, दि २७ ऑगस्ट-

मैंदर्गी रस्ता समर्थ पार्क येथील नव चैतन्य गणेशोत्सव बाल मंडळाने यंदा पहिल्याच वर्षी गणेशोत्सवात वेगळा उपक्रम राबविला. हिराकांत जामदार, मेजर संदिप सलगरे, विश्वनाथ सुतार, सागर इंगळे आदिनी आंब्याच्या, नारळाच्या झाडाचे वृक्षारोपण केले.



यावेळी बाल मंडळ अध्यक्ष विश्वजित जाधव, उपाध्यक्ष शौर्य सुतार, सचिव ऋतुराज जामदार, खजिनदार प्रणव जाधव, कार्यकर्ते सुदर्शन बिराजदार, सुरज बिराजदार, अभिरूप इंगळे, हर्ष उत्सवाचा श्रीगणेशा वृक्षारोपणाने केला आहे. येथे महिलासंह नागरिकांनी वड, आंबा, नारळ या वृक्षांच्या रोपाची लागवड केली. मेजर संदीप सलगरे यांनी मंडळास वटवृक्षाचे रोप दिले. महिलांनी त्याचे रोपण करून हादवे, मंथन बिराजदार, श्रवण बिराजदार, शिवनेरी सलगरे, सुरज सलगरे, विश्वजित माळी, विराज माळी, रणवीर घाडगे, मल्लिनाथ लिंबीतोटे, आदर्श लोंढे, निरव पोतदार, आदेश लंगोटे आदिंनी यामध्ये सहभाग घेतला.




**आगमन जल्लोषात...**

सांगोला शहरासह तालुक्यात गणपती बाप्पाचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.

छायाचित्र- दिपक भाकरे, सांगोला

# पालकमंत्री गोरे यांच्या वक्तव्याचा कंत्राटदारांकडून निषेध

तभा वृत्तसेवा
अक्कलकोट दि.२७

राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी जलजीवन मिशनच्या कंत्राटदार यांचे देयका बाबत केलेल्या विधानाचा महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटना कडुन निषेध करण्यात आला आहे

महाराष्ट्रातील जलजीवन मिशन चे कामे केलेल्या कंत्राटदार यांचे जवळपास ९ महिन्यांपासून प्रलंबित देयके आहेत यासाठी एक छदाम निधी शासनाकडून वाटप केला नाही. एवढी गंभीर परीस्थिती असताना सदर कामे केलेल्या कंत्राटदारांच्या कामात अडचणी आहेत. अजुनही कामे बरोबर झाले नाही म्हणून आम्ही निधी उपलब्ध केला नाही असे सद्य परिस्थिती शी अक्षरक्ष विसंगत व चुकीचे वक्तव्य राज्याचे ग्रामविकास मंत्री सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापुरात केले आहे. राज्याची आर्थिक परीस्थिती गंभीर असून गेल्या नऊ महिन्यांपासून सदर योजनेस केंद्र व राज्य सरकार कडून निधी मिळत नाही. यामुळे राज्यात कामे पूर्ण केलेली जवळपास ३५ हजार कोटी ची देयके प्रलंबित आहेत , यासाठी सुशिक्षित अभियंता सांगलीत आत्म हत्या केली आहे.सोलापुरात जवळपास कामे पूर्ण करून सगळी संबंधित विभागाने तांत्रिक दृष्ट्या सक्षम आहे. हा लिखित स्वरुपात अहवाल तयार करून सगळ्या कामांचे होऊन तसा अहवाल लिखित स्वरूपात सादर होऊन ६५ कोटींची देयके निधी अभावी प्रलंबित आहेत. याचा सत्रधीत विभागाने सर्व केलेल्या कामांचे शासकीय मेजरमेंट बुक मध्ये लिखाण झाले आहे. हीखरी परीस्थिती असताना ग्राम विकास मंत्री यांचे वक्तव्य हे अत्यंत चुकीचे आहे. या धोरणाचा व वक्तव्याचा महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटना चे जिल्हा अध्यक्ष आनंद तोडकरी व जिल्हा सचिव विवेक राठोड यांनी निषेध व्यक्त केला आहे. सदर विसंगत वक्तव्याची गंभीर दखल घ्यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटना यांच्या मुख्य कार्यालय कडे व राज्य अध्यक्ष इंजि मिलिंद भोसले यांच्या कडे केली आहे.

# प्रतिभाताई परिचारक नगर, लक्ष्मी टाकळी येथे ओढ्याच्या कामाचे भूमीपूजन

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि. २७ ऑगस्ट-

कित्येक वर्षाच्या प्रतीक्षेनंतर तालुक्यातील लक्ष्मीटाकळी परिसरातील प्रतिभाताई परिचारक नगर येथे अखेर ओढ्याच्या कामाला सुरवात झाली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकारातून आणि शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष महेश साठे यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळेच सांडपाणी व्यवस्थापनातून या ओढ्याच्या कामासाठी तब्बल ६५ लाख रुपयांचा निधी मिळाल्याची माहिती सरपंच संजय साठे यांनी दिली.



ओढ्याच्या कामाच्या शुभारंभ सरपंच साठे यांच्या हस्ते झाला. यावेळी जिल्हाध्यक्ष महेश साठे, मा.जि.प.सदस्य रामदास ढोणे, उपसरपंच रुपाली करंडे, ग्रामपंचायत सदस्य औदुंबर ढोणे, सागर सोनवणे, नागरवाई साठे, आशाबाई देवकाते, रेश्मा साठे, रोहिणी साठे, विजयमाला वाळके, ग्रामसेवक जयंत खंडागळे, प्रशांत डोंगरे, पैगंबर शेख, रोंगे, प्रा.अनंत गिरवीकर कुलकर्णी, आबासाहेब खरात, ॲड. चंद्रशेखर पोरे, रमेश जाधव, मनोज लांबोरे, अथर्व लांबोरे, प्रवीण देशपांडे, दीपक देशपांडे, भानुदास शिंदे , अकबर आतार हुसेन तांबोळी, समाधान नवगिरे, दत्ता शेटे, श्याम देशपांडे, देवल, राजू पेंटर, राठोड, पांडुरंग जानकर, ज्ञानेश्वर चोरमुले, लखन आदमाने ,ओंकार कापसे गुरुजी, रमेश, लखन भोंडवे, शिवाजी खडतरे, हरिश्चंद्र कवडे उपस्थित होते. ओढा झाकणे व ९० टक्के सांडपाणी दुर्गंधी मुक्त करणे या कामात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांचे मोठे योगदान आहे. लक्ष्मीटाकळी ग्रामपंचायतीच्या इतिहासात प्रथमच लक्ष्मी टाकळीला आषाढी वारी तीर्थक्षेत्रात समाविष्ट करून ३०० टॉयलेट, ५०० बाथरूम आणि ३० वॉटर टँकर मिळाले. ठाकरे चौक - लक्ष्मी टाकळी चौक रेल्वे फ्लायओव्हर प्रकल्पासाठी ५८ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. समाजकल्याण विभागातून १ कोटींचा निधी मिळाला आहे.

# शालार्थ आयडी घोटाळा टाळण्यासाठी माध्यमिक शिक्षण विभागाचा निर्णय

### सात हजार शिक्षकांचे शालार्थ आयडी ऑनलाईन होणार

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-

जिल्ह्यातील माध्यमिक शाळांमधील जवळपास ७ हजार शिक्षकांचे शालार्थ आयडी लवकरच ऑनलाईन करण्यात येणार असल्याची माहिती माध्यमिकचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी दिली.

सध्या राज्यात नागपूर विभागातील शालार्थ आयडी घोटाळा गाजत आहे. या प्रकरणात शिक्षणाधिकारी व कर्मचाऱ्यांना अटक झाली आहे. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून राज्यभर शिक्षण विभाग अलर्ट झाला आहे. शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी हे प्रकरण खूपच गांभीर्याने घेतले आहे. राज्यातील शिक्षण अधिकाऱ्यांना त्यांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मान्यता व शालार्थ आयडीचे प्रकरण ऑनलाइन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यात माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत असणाऱ्या सात हजार शिक्षकांच्या शिक्षक मान्यता व शालार्थ आयडी तपासून त्या प्रकरणावरील सुनावणी ऑनलाईन करण्यात येणार आहे. शिक्षण उपसंचालक डॉ. मोरे यांनीही याबाबत मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. त्यामुळे लवकरच माध्यमिक शिक्षण विभागातर्फे ही मोहीम हाती घेण्यात येणार असल्याचे शिक्षणाधिकारी जगताप यांनी सांगितले. यापूर्वीच्या नियुक्त प्रभारी व इतर शिक्षणाधिकाऱ्यांनी दिलेल्या मान्यतेबाबत शिक्षक संघटनांनी तक्रारी केल्या आहेत. त्यामुळे या मान्यता प्रलंबित ठेवण्यात आल्या आहेत. यामुळे अनेक शिक्षकांचा जीव टांगणीला लागला आहे.



# संग्रामराजे प्रतिष्ठानचा दहीहंडी महोत्सव उत्साहात

तभा वृत्तसेवा,
पिलीव, दि. २७ ऑगस्ट -

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील संग्रामराजे प्रतिष्ठानच्यावतीने माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व खासदार धैर्यशील म हिते-पाटील, आमदार उत्तमराव जानकर यांच्या उपस्थितीत दहीहंडी सोहळा असंख्य प्रेक्षकांच्या प्रतिसादाने जल्लोषात व उत्साहात संपन्न झाला.

या दहीहंडी सोहळ्याचे उद्घाटन माजी सभापती संग्रामसिंह जहागिरदार, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सयाजीराजे मोहिते-पाटील, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाच्या महिला अध्यक्ष विनंतीताई कुलकर्णी व जिल्हाध्यक्ष वसंतराव देशमुख व माजी पंचायत समिती सदस्य शहाजी शेठ महाडिक यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून व फीत कापून प्रारंभ करण्यात आला. यावेळी न्यूत्यांगणा अभिनेत्री मंजू पुणेकर, गौरी पुणेकर, रोशनी पुणेकर व सर्व टीम तसेच रियल स्टार ऋषी देशमुख व अण्णा करगणीकर यांनी ही कॉमेडी, चढत्या चालीवर तालावरील बहारदार लावण्या, मराठी हिंदी चित्रपट गीते, गौळणी आदींचे सादरीकरण झाले. विविध राजकीय पुढारी, विविध पदाधिकारी, उपस्थित होते. अनेक खेळाडू सहभागी झाले होते. प्रतिष्ठानचे नानासाहेब मदने, अविनाश जेऊरकर, सम शेरसिंग राजपूत, सचिन मदने, प्रकाश जाधव, मोहसीन शेख, राजेंद्र करांडे, सोहेल बागवान, तानाजी लोखंडे, जुबेर पठाण, तुषार जाधव, किशोर लोखंडे व ऋषि भैस, सुरज करांडे, सारंग बनसोडे यांनी परिश्रम घेतले.



**सोलापूर : दैनिक तरुण भारत कार्यालयात दरवर्षीप्रमाणे यंदाही गणरायाची भक्तीभावात प्रतिष्ठापना करण्यात आली. मुर्ती आणताना व्यवस्थापक विनायक पुला व किरण सुतार.**

# अक्कलकोटमध्ये उत्साहात श्रींची स्थापना

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि २७ ऑगस्ट-**

अक्कलकोट शहर व तालुक्यात श्री गणेश उत्सवाचा प्रारंभ उत्साहात झाला. बाल मंडळापासून ते तरुण मंडळाने व घरोघरी मोठ्या उत्साहात श्रीची वाजत गाजत स्थापना झाली. अनेक गणेश मंडळानी टॅक्ट्रर, जीप टेम्पो, ओमीनी कार, छोटा हत्ती या वाहनात मिरवणुकद्वारे श्रीची स्थापना केली. घरोघरी श्रीची कुणी दुचाकीवरून तर कुणी चालत हातामध्ये श्रीची मुर्ती घेऊन विधीवत घरोघरी श्री ची स्थापना केली.

नवसाचा मारुती गणेशोत्सव मंडळाची श्री गणेशाची स्थापना वटवृक्ष मंदिराचे पुजारी मंदार महाराज पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. देशमुख गल्ली, राष्ट्रीय तरुण मंडळ बेडर गल्ली, गुरुमित्र मंडळ, शिवाजी नगर, बंजारा गणेशोत्सव मंडळ टिळक गल्ली, कुंभार गल्ली, फसके गल्ली, पागा चाळ, भारत गल्ली, डबरे गल्ली, राम गल्ली, मधला मारुती, जयजवान गल्ली, नवभारत नवशा गणपती, वेताळ चौक लायन्स क्लब, सुभाष गल्ली, आझाद गल्ली, माळी गल्ली, हन्नुर चौक, श्रीकृष्ण बालाजी, जय भवानी, संजय नगर, खासबाग, समता नगर, एसटी महामंडळ, विद्युत वितरण कंपनी, लोकमान्य, समाधी मठ, स्वामी समर्थ मंदिर, शर्मा विघ्नेश, गणेश मंदिर, कुंभार गल्ली, सिध्दीविनायक मंदिर, रिद्धी सिद्धी मंदिर, एवन चौक, गणेश मंदिर, नेहरु गल्ली गणेश मंदिर आदि ठिकाणी मोठया उत्साहात श्री गणेशाची स्थापना मोठ्या उत्साहात करण्यात आली.







# नू.म.वि. मराठी शाळेत श्री गणेशाची प्रतिष्ठापना



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

नू. म. वि. मराठी शाळेत श्री. गणेशाची प्रतिष्ठापना उत्साहाने करण्यात आली. यावेळी प्रभारी मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

षोडशोपचारे विधिवत पूजा करून गणपतीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. नंतर आरती, मंत्रपुष्पांजली झाली.

कोथमिरे, कनकी यांनी गणपतीचे गीत, पालकामधून गणेश भजन व अथर्वशीर्ष, विद्यार्थ्यांमधून गणपती स्तोत्र सादर करण्यात आले. लेझीम संघाने सुंदर सादरीकरण केले. यांना आशा गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. आळसंदे यांनी सूत्रसंचालन केले.

## शाळांमध्ये गणरायाचे आगमन...

### नाझरा विद्यामंदिर, सांगोला

सांगोला तालुक्यातील नाझरा विद्यामंदिर प्रशाला व ज्यु. कॉलेजमध्ये गणरायांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. गणपती बाप्पा मोरया मंगलमूर्ती मोरयाच्या घोषणा देत सर्व विद्यार्थ्यांनी नाझरा येथील मुख्य चौकातून गणरायाचे स्वागत केले. त्या ठिकाणी विधिवत



पूजा करून गणरायाला वाजत गाजत प्रशालेच्या प्रांगणात आणण्यात आले. प्रशालेमध्ये मुख्याध्यापक बिभिषण माने, पर्यवेक्षक विनायक पाटील, विद्यामंदिर इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका मंगल पाटील यांच्या उपस्थितीत गणरायाची विधीवत प्रतिष्ठापना करण्यात आली. त्यानंतर आरती व प्रसादाचे वाटप करण्यात आले. शुभांगी नागरसे यांच्याकडून गणरायाची मूर्ती देण्यात आली. पारंपारिक वेशभूषेतील विद्यार्थी व ढोल ताशांच्या गजरात गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली.



### सहस्त्रार्जुन शैक्षणिक संकुल

भवानी पेठ येथील सहस्त्रार्जुन शैक्षणिक संकुलात गणेशोत्सव साजरा करण्यात आला. 'गणपती बाप्पा मोरया'च्या गजरात, ढोल-ताशांच्या दणदणाटात व पारंपरिक पोशाखातील विद्यार्थ्यांच्या नृत्यगायनाच्या वातावरणात श्रींच्या मूर्तीचे आगमन झाले. प्रारंभी संस्थेचे अध्यक्ष राजुसा भूमकर व त्यांच्या पत्नी केशर यांच्या हस्ते श्रींची विधिवत पूजन करून गणपती बप्पा मोरयाच्या जयघोषत स्थापना करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष संजीवसा बिद्री, सचिव जयकुमारसा कोल्हापुरे, शैक्षणिक संस्थेचे सचिव गजाननसा गोयल, संस्थेचे सदस्य भरतकुमार शालगर, श्रीरामसा पवार, गणेशसा दामजी, सुरेशसा बिद्री, शिरीषसा कोल्हापुरे, शैक्षणिक संस्थेचे सदस्य तुकारामसा पवार यांच्यासह मुख्याध्यापक भगवंत उमदीकर, मुख्याध्यापिका मंजुषा काशीद, विजयालक्ष्मी बिराजदार आदी उपस्थित होते. सर्वांनी एकत्र येऊन पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा संकल्प केला.



### श्री मल्लिकार्जुन हायस्कूल

गेल्या ३५ वर्षांची परंपरा कायम राखत व श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालयाने फुलांची आरास असलेल्या सुंदर सजवलेल्या रथातून श्री गणरायाची मिरवणूक भारतमाता पासून सुरू होऊन होटगी रोड या मार्गाने हत्तुरे नगरातून मार्गक्रमण करत प्रशालेपर्यंत ही मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीच्या सुरुवातीला पोलीस उपायुक्त राजन माने, माजी प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे, औद्योगिक पोलीस चौकीचे अशोक तरंगे, हवालदार रामकृष्ण सुरवसे, मार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे, माजी नगरसेवक वैभव हत्तुरे, प्रभारी मुख्याध्यापक रमेश दिंडोरे, संतोष सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत श्रींचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथींचे मान्यवरांच्या हस्ते शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपायुक्त राजन माने यांनी मिरवणुकीत डीजे चा वापर करू नये व पारंपारिक वाद्याचा वापर करावा तसेच ढोल,टाळ व लाठी-काठी चे सादरीकरण पाहून विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी बाल गणेश व लोकमान्य टिळकांच्या वेशभूषेत बालचमू मिरवणुकीचे आकर्षण बिंदू ठरले होते. मिरवणूकीमध्ये प्राथ. मुख्याध्यापक सचिन जाधव, काशिनाथ मळेवाडी, सुधाकर कामशेट्टी, विनायक हत्तुरे, इरपाक्ष चिवरे, अण्णाराया तुप्पद, बसवराज कोरे,भारत राऊत, गुरुसिद्धप्पा पाटील, अनिता हौदे उपस्थित होते. मिरवणूक यशस्वी करण्यासाठी गंगाराम घोडके, परमेश्वर चांदोडे, प्राध्यापक लक्ष्मीकांत पनशेट्टी, गणेश कोरे, संतोष स्वामी, अमरनाथ कदारे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन मारुती माने यांनी केले तर आभार अनिलकुमार गावडे यांनी मानले.



**सोलापूर : सोन्या मारुती गणेशोत्सव मंडळाकडून प्रतिष्ठापनेनिमित्त निघालेल्या मिरवणुकीत तल्लीन होऊन लेझीम खेळत असताना कार्यकर्ते.** (छायाचित्र : केवल तिवारी)



# 'हरीभाई'मध्ये दरवर्षीप्रमाणे गणरायाचे आगमन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

हरीभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात सालाबादप्रमाणे श्री गणेशाचे आगमन ढोल, ताशा, लेझीम, टिपरी अशी पारंपारिक वाद्य वाजवून गणेशाचे मुळे हॉलमध्ये आगमन झाले. माजी विद्यार्थी प्रमोद जोशी यांच्या हस्ते गणेशाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

कार्यक्रमासाठी प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती दीपा फाटक, पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड, मारुती शहाणे, गणेश नेवरे, रणधीर तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक शांतप्पा कुंभार, भानुदास बनसोडे, आप्पासाहेब राऊत तसेच गणेशोत्सव विभाग प्रमुख अलका जगताप, निखिल बडवे, प्रशालेच्या कार्याध्यक्ष बोळकवठेकर, कनिष्ठ महाविद्यालयाचे कार्याध्यक्ष चंद्रकांत जाधव उपस्थित होते



**सोलापूर : पूर्व विभाग प्रमुख मानाचा ताता गणपती २०२५ श्रीं ची प्रतिष्ठापना मंडळाचे आधारस्तंभ मुरलीधर आरकाल व मंडळाचे विश्वस्त उमेश मामडयाल, राजेंद्र द्यावरकोंडा, श्रीनिवास मडुर, सत्यनारायण आरकाल, संदीप कन्ना, प्रेसिडेंट गिरीश श्रीगांधी, अध्यक्ष बालाजी आरकाल सचिव गोविंद केंची, रमेश आडम, विनायक धारा, संदीप संगा, नागेश भंडारी, गंगाधर बंडगर महेश कोंडले व सर्व सभासद उपस्थित होते.**




**सोलापूर : कर्णकर्कश डीजे डॉल्बीचा आपल्या भक्तांना होणारा असह्य त्रास पाहून गणपती बाप्पाने देखील मंडळांना सुचित केले आहे की डीजे डॉल्बी लावणार नाही म्हणालात म्हणून आलोय... डॉल्बीबंदीच्या पार्श्वभूमीवर गोडबोले परिवाराच्या लॉजिकल डी. एन. ए. कंपनीने केलेला बोलका संदेश देणारा हा एआय फोटो व्हायरल झाला आहे.**

# पुरस्कार म्हणजे प्रेरणा आणि बळ : माजी आ. राजेंद्र राऊत

**दलितमित्र पुरस्काराचा कौतुक सोहळा थाटात**

● तरुण भारतचे बार्शी प्रतिनिधी अरुण बळप यांना पत्रकारितेचा पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ ऑगस्ट-**

पुरस्कार म्हणजे चांगलं काम करणाऱ्यांना बळ देणे आणि चांगलं काम समाजासमोर मांडणे जेणेकरुन इतरांना प्रेरणा मिळेल, असे प्रतिपादन माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी केले. ते दलित महासंघाच्यावतीने डॉ. आण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त दलित मित्र गौरव पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलत होते.

यावेळी तहसीलदार आर. एफ. शेख, मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, खजिनदार जयकुमार शितोळे, वकील संघाचे अध्यक्ष ॲड रणजित गुंड, दलित महासंघाचे जिल्हाध्यक्ष सुनील अवघडे, शहर अध्यक्ष संदीप आलाट, भीम टायगरचे शंकर वाघमारे, काँग्रेसचे विजय साळुंखे, निलेश खुडे, संगीत शिंदे, अमोल कांबळे संतोष बगाडे हरिश्चंद्र कांबळे रमेश शेंडगे आदी उपस्थित होते.



यावेळी उद्योजक सुनील भराडिया, बार्शी न. प. चे मुख्याधिकारी तथा प्रशासक बाळासाहेब चव्हाण, सचिन मांजरे पाटील, डॉ. सारंगा बुरगुटे, प्रा.विशाल गरड, पंचायत समिती विस्तार अधिकारी नितीन वाघमारे, उद्योजक रामभाई डोंबे, माजी सरपंच दशरथ टेकाळे, जय शिवराय प्रतिष्ठान, श्रीधर कांबळे, सूर्यकांत (आण्णा) लोंढे, तरुण भारतचे पत्रकार अरुण बळप आणि पत्रकार संजय बारबोले यांना दलित मित्र गौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. यावेळी राऊत म्हणाले की, मी आमदार असताना अधिकारी आणताना अगोदर माहिती घ्यायचो म्हणून आपल्याला तहसीलदार, मुख्याधिकारीसारखे कामाचे अधिकारी मिळाले. दलित महासंघाचे हे पुरस्काराचे सलग अठरावे वर्ष असून हा पुरस्कार म्हणजे दलित महासंघाने सामाजिक उपाय राखण्याचे महत्वपूर्ण कार्य केले आहे.

यावेळी श्रीधर कांबळे, प्रा विशाल गरड यांनीही विचार मांडले. प्रास्ताविक सुनील अवघडे यांनी केले. सूत्रसंचालन नीता देव यांनी तर आभार संदीप आलाट यांनी मानले. यावेळी श्रीधर कांबळे लिखित व संजय कांबळे यांच्या संकल्पनेतून दलित महासंघाचे एंथम साँग एकच संघ दलित महासंघ हे गीत व शाहीर राजेश ननवरे यांनी गायलेले वालु आईचं पोर लय दिमाग बाज हे गीत उपस्थित मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.



# तीन दिवस बारापर्यंत स्पीकरला परवानगी द्या

● **जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्याकडे मध्यवर्तीची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

गणेशोत्सव काळात शेवटचे तीन दिवस सोलापूर शहरातील असलेल्या गणेश मंडळांना १२ वाजेपर्यंत स्पीकरला परवानगी देण्यात यावी अशी मागणी सार्वजनिक मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाच्या वतीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

शहरातील विविध मंडळाच्या वतीने प्रबोधनात्मक, सांस्कृतिक, सामाजिक, राष्ट्रीय, धार्मिक, किर्तन प्रवचन सादर केले जातात. यंदा राज्य शासनाने गणेशोत्सवास राज्योत्सव जाहीर केले आहे.त्या अनुषंगाने या मागणीचा विचार करण्यात यावा. देखाव्यांसाठी बारा वाजेपर्यंत वेळ देण्यात आली तर नागरिकांना वेगवेगळे प्रबोधनात्मक देखावे कार्यक्रम पाहण्यास मुभा मिळेल.

यावेळी सुनिल रसाळे, उत्सव अध्यक्ष सोमनाथ मेंडके, सचिव संजय शिंदे, गौरव जक्कापुरे, विजय पुकाळे, माजी उत्सव अध्यक्ष विनायक महिंद्रकर, विष्णू मुधोळकर, मल्लिनाथ याळगी, शिवानंद येरटे, दत्ता भोसले, अविनाश, दासरी, राजु हिबारे, देवेंद्र भंडारी, सागर शिंगे, रवि भोपळे, राकेश नंदाल यांची उपस्थिती होती.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






## ▶▶घरोघरी गणरायाचे स्वागत...















**सोलापूर : महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आपल्या निवास्थानी श्री गणरायाची मंगलमय वातावरणात मनोभावे प्राणप्रतिष्ठापना केली. सोलापुरातील मानाचा देशमुख वाड्यातील गणपतीसह घरोघरी गणपती बाप्पाचे बुधवारी उत्साहाने स्वागत करण्यात आले.**












# ‘मोरया’च्या गजरात कसबा गणपतीची मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

सनई चौघडा, पंचरंगी झेंडा, बैल व घोड्यांची जोडी, चारशे युवकांचे सुंदर लेझीम पथक, लोकमान्य टिळकांचा फलक, हलग्या आणि पालखी अशा डामडोलात श्री कसबा गणपतीची मोठ्या उत्साही वातावरणात मिरवणूक काढण्यात आली. श्रीमंत मानाचा कसबा गणपतीची प्रतिष्ठापना मिरवणूक बुधवारी मोठ्या भक्तीमय वातावरणात निघाली.

पार्क चौक, चार हुतात्मा पुतळा येथे सकाळी ११ वाजता सोलापूर महानगरपालिकेचे उपायुक्त संदीप कारंजे यांच्या हस्ते श्रीं ची महापूजा व आरती होऊन मिरवणुकीस प्रारंभ झाला. यावेळी लेझीम पथक हे मिरवणुकीचे आकर्षण ठरले. ही मिरवणूक मेकॅनिक चौक, नवी पेठ, दत्त चौक, माणिक चौक, मधला मारुती, लोखंड गल्ली, मंगळवार पेठ, चाटी गल्ली, बाळीवेस चौक मार्गे कसबा गणपती येथे उत्सव समितीच्या वतीने श्रीचे प्रतिष्ठापना करण्यात आली.

याप्रसंगी कसबा गणपती उत्सव समिती अध्यक्ष बाळासाहेब मुस्तारे ट्रस्टी अध्यक्ष सोमनाथ भोगडे उपाध्यक्ष प्रकाश वाले, ॲड.मिलिंद थोबडे, मल्लिनाथ मसरे, मल्लिनाथ खुने, केदार मेंगाणे, संजय दर्गोपाटील, शिवानंद बुगडे, रामचंद्र जोशी, गुरुलिंग समाणे, शिवशंकर कोळकुर, बिप्पीन धुम्मा, बाळासाहेब भोगडे, राहुल बुऱ्हाणपुरे, महेश हदरे, अभिजीत कुलकर्णी, आनंद मुस्तारे, पुष्कराज मेत्री, सिद्धेश्वर आळंद, सोमनाथ मेंगाणे, नागनाथ मेंगाणे, जगदीश हिरेहब्बू, चिदानंद मुस्तारे आदींची उपस्थिती होती.



सोलापूर : गणेशोत्सवा निमित्त शहरातील बाजारपेठांमध्ये विविध प्रकाराचे मोदक विक्रीसाठी उपलब्ध आहेत.



सोलापूर : घरगुती गणरायाची मूर्ती खरेदी करण्यासाठी बुधवारी सकाळपासून शहरातील टिळक चौकात झालेली गर्दी.

# इंडियन मॉडेल स्कूलमध्ये गणरायाचे जल्लोषात स्वागत







**गेली २४ वर्ष डीजेमुक्त, डॉल्बीचा वापर न करता फक्त पारंपारिक वाद्यांची मिरवणूक इंडियन मॉडेल स्कूलतर्फे उत्साहाने साजरी केली जाते. याद्वारे ध्वनी प्रदूषण करू नये हा संदेश विद्यार्थ्यांना दिला गेला.**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

गेल्या २३ वर्षांची परंपरा कायम राखत इंडियन मॉडेल ग्रुप ऑफ स्कूल्सने २४ व्या वर्षी गणरायाचे जल्लोषात स्वागत केले. घोडे असलेल्या व सुंदर सजवलेल्या रथातून श्री गणरायाची मिरवणूक दावत चौकापासून काढण्यात आली. पतंजली मार्ट, गोविंदश्री, डी-मार्ट या मार्गाने निघून, या मिरवणुकीचा समारोप झाला.

मिरवणुकीच्या सुरुवातीला आ. सुभाष देशमुख, पोलिस आयुक्त एम. राजकुमार, पोलिस उपायुक्त विजय कबाडे व इंडियन मॉडेल स्कूलचे अध्यक्ष ए.डी. जोशी, सचिव अमोल जोशी, सचिवा सायली जोशी, ईशा जोशी, आर्य जोशी यांच्या हस्ते श्रींचे पूजन करण्यात आले. उत्तम गुणवत्तापूर्ण आणि आधुनिक शिक्षण देण्याबरोबरचे आपल्या संस्कृतीचा वारसा पुढील पिढ्यांमध्ये रुजवण्याचे कार्य इंडियन मॉडेल ग्रुप ऑफ स्कूल्सने कायम ठेवले आहे. नऊवारी साडी, फेटा, महाराष्ट्रीयन साज घातलेल्या विद्यार्थिनींनी तसेच पारंपारिक वेशभूषा केलेल्या व फेटे बांधलेल्या विद्यार्थ्यांनी गपणती बाप्पा मोरयाच्या गजरात पुणेरी ढोल पथकाचे अप्रतिम सादरीकरण केले. इंडियन मॉडेल स्कूल सी.बी.एस.ई.मधील विद्यार्थ्यांनी कमळ, स्वस्तिक या आकारांमध्ये झांज व झेंडा सादरीकरण केले.

तसेच मॉडेल पब्लिक स्कूल व इंडियन मॉडेल स्कूल स्टेट बोर्डच्या विद्यार्थ्यांनी लेझीमच्या तालावर ठेका धरला. या मिरवणूकीमध्ये पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, पोलीस उपायुक्त अश्विनी पाटील, पोलिस उपायुक्त हसन गौहर, विजापूर नाका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गायकवाड या मान्यवरांनी मिरवणूक यात्रेमध्ये उपस्थिती लावून मिरवणुकीची शोभा वाढवली.

# सोलापूर विद्यापीठाच्या पहिल्या अहिल्यादेवी क्रीडा पुरस्कारांची घोषणा

- **तरुण भारतचे वृत्तसंपादक अजितकुमार संगवे क्रीडा पत्रकार पुरस्काराचे मानकरी**
- **डॉ. आनंद चव्हाण, संतोष खेंडे, श्रीकांत शेटे व शरणबसवेश्वर वांगी हेही अनुक्रमे शारीरीक शिक्षण संचालक, क्रीडा शिक्षक व प्रशिक्षक पुरस्काराचे मानकरी**


अजितकुमार संगवे


डॉ. आनंद चव्हाण


संतोष खेंडे


श्रीकांत शेटे


शरणबसवेश्वर वांगी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून यंदाच्या वर्षापासून क्रीडा, शारीरिक शिक्षण, खेळ व व्यायाम या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना अहिल्यादेवी क्रीडा पुरस्कार देण्यात येणार असून पुरस्कार प्राप्त मान्यवरांची घोषणा कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी पत्रकार परिषदेत केली. उत्कृष्ट शारीरिक शिक्षण अध्यापक व संचालक पुरस्काराचे मानकरी संगमेश्वर कॉलेजमधील डॉ. आनंद बाळासाहेब चव्हाण हे ठरले आहेत.

उत्कृष्ट क्रीडा शिक्षक पुरस्कार संगमेश्वर जुनिअर कॉलेजचे संतोष धर्मा खेंडे यांना प्राप्त झाला आहे. उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शकाचा पुरस्कार जलतरण व डायव्हिंगमधील श्रीकांत गंगाधर शेटे व हँडबॉलमधील शरणबसवेश्वर सिद्धाराम वांगी यांना संयुक्तपणे देण्यात येणार आहे तर अहिल्यादेवी उत्कृष्ट क्रीडा पत्रकारितेचा पुरस्कार दैनिक तरुण भारतचे वृत्तसंपादक अजितकुमार बापूराव संगवे यांना जाहीर झाल्याचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी सांगितले. मानपत्र, सन्मानचिन्ह, अहिल्यादेवींची मूर्ती असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या विविध पुरस्कारांसाठी प्रस्ताव मागविण्यात आले होते. प्राप्त प्रस्तावांची छाननी करून समितीने पुरस्कर्त्यांची निवड केली आहे.

या कार्यक्रमास खेळाडू, क्रीडा शिक्षक, क्रीडा प्रेमी नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा क्रीडा विभागाचे संचालक डॉ. अतुल लकडे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी राहुल वंजारे, प्रा. डॉ. अंबादास भास्के, शिवानंद मैलारी आदी उपस्थित होते.




### उद्या पुरस्कार वितरण सोहळा

हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनानिमित्त साजरा होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त या पुरस्काराचे वितरण शुक्रवार २९ ऑगस्ट रोजी दुपारी चार वाजता विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात मान्यवरांच्या हस्ते होईल. याच कार्यक्रमात सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षांमध्ये विद्यापीठातील ज्या खेळाडूंनी ऑल इंडिया, साऊथ वेस्ट झोन आणि क्रीडा महोत्सवात उल्लेखनीय कामगिरी केली आहे, अशा खेळाडूंचा रोख रक्कम व पारितोषिक देऊन त्यांचा सन्मान केला जाणार आहे. याचबरोबर क्रीडा शिक्षक व मार्गदर्शकांचा देखील यावेळी सन्मान होईल.

# पर्यावरणपूरक आजोबा गणपतीला १४० वर्षे पूर्ण

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

१४० वर्ष पूर्ण करणारा देशातील पहिला सार्वजनिक स्वरूपात गणेशोत्सव साजरा करणारा व सोलापूराचा मानाचा पर्यावरण पूरक आजोबा गणपती प्रतिष्ठापनेची मानाची पूजा ट्रस्टी अध्यक्ष आ. विजयकुमार देशमुख व उपाध्यक्ष काकासाहेब मेंडकेंच्या हस्ते करण्यात आली.

या पर्यावरणपूरक आजोबा गणपतीची पूजा पारंपारिक पध्दतीने रुद्रपठण, रुद्राभिषेक, गणेश १००० नामावली व अथर्वशीर्ष पठण करुन वेदमूर्ती स्वामी महाराज पौराहित्य केले. गुरुवार दि. २८ ऑगस्ट रोजी पहाटे ६ वाजता आजोबा गणपती ट्रस्ट तर्फे ‘‘सामूहिक अथर्वशीर्ष पठण ‘‘ होणार आहे. सर्व गणेशभक्तांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन आजोबा गणपती ट्रस्टच्या वतीने करण्यात आले. यावेळी चंद्रकांत कळमणकर, अनिल नंदीमठ, अनिल सावंत, कमलाकर करमाळकर, इरण्णा मेंडके, सिध्दारुढ निंबाळे, सुनिल जवळकर, काका मेंडके, विकास भास्कर, सुरेश हचडे, रविकिरण सूत्रावे, सातलिंगप्पा दुधनीकर, राहूल कुमणे, अमर वनारोटे, गंगाधर गवसणे, राजकुमार कत्ते, बसवराज मेंडके, अप्पासाहेब जेऊरे, विश्वनाथ गोयल, अनिल रेळेकर आदि मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते.



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी - ११९१

**करावें गोमटें ।**
**बाळा मातें तें उमटे ।।**

एक दुसऱ्याचे चांगले इच्छिणाऱ्यांपेक्षा एक दुसऱ्यांचे वाईट इच्छिणाऱ्यांची संख्या समाजात जास्त आहे. जवळपास प्रत्येकजण आयुष्यात थोड्याफार प्रमाणात का असेना किंवा प्रसंगानुरुप का असेना पण एखाद्याचे तरी वाईट व्हावे अशी अपेक्षा करतो. पण आई ही एक अशी व्यक्ती या जगाच्या पाठीवर आहे की जी, कोणत्याही प्रसंगी आपल्या मुलाचे वाईट व्हावे असे स्वप्नातही कल्पीत नाही.



आपल्या मुलाला चांगले करण्यासाठी वाट्टेल ते करण्याची ती मानसिकता जोपासते. आपले मूल चांगले व्हावे यासाठी तिला विशेष प्रयत्न करुन भावनांची निर्मिती करावी लागत नाही. मुलाच्या चांगुलपणा विषयीच्या भावना तिच्या हृदयात आपोआप निर्माण होत असतात. तिला स्वत:च्या जीवापेक्षा तिचे मूल जास्त प्रिय असते. जिवापाड प्रेम करणारी ही माता आपल्या मुलाच्या चांगलेपणासाठी सदैव प्रयत्नशील रहाते. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**करावे गोमटें । बाळा मातें ते उमटें ।।**
**आपुलीया जीवाहूनी । असे वाल्हें ते जननीं ।।**

मुलाच्या भल्यासाठी काबाड-कष्ट करणारी माता किंवा मुलावर जीवापाड प्रेम करणारी ही माता जेव्हा वृध्द होते, तेव्हा तिचे हे मूल बऱ्याचवेळा तिच्याकडे दूर्लक्ष करते. आईला मूल नेहमी लहानच वाटते.पण या मुलाला मात्र त्याचे तारुण्य लहानपणाची आठवण येऊ देत नाही. क्षणभरही आईपासून दूर जाऊ न इच्छिणारे हे मूल तरुणपणी आईजवळ जाऊ इच्छित नाही. आईच्या वृध्दपणी आईला तिच्याच घराबाहेर काढणारी, आईच्या शब्दाकडे दूर्लक्ष करणारी, जन्मदात्रीला मारहाण करणारी, तिचा पावलो-पावली अवमान करणारी, किंवा तिला सोडून स्वतंत्र राहणारी मूलं समाजात आहेत. अशा मुलांवरही ती माता क्रोधीत होत नाही. अशा कोणत्याही प्रसंगात मुलावर प्रेम करणारी माता तारुण्याच्या मस्तीत उड्या मरणाऱ्यांना खऱ्या अर्थाने समजली असती तर वृध्दाश्रम काढण्याची वेळ शासनावर आली नसती. आईची सेवा करायला भाग्य लागतं. अनेकांना इच्छा असूनही दूर्दैवाने त्यांना आईची सेवा करायला मिळत नाही. पण ज्यांना कोणाला आईच्या सेवेची संधी आहे, त्यांनी ही संधी दवडूच नये. आईची सेवा करणाऱ्यांना ईश्वरभक्तीसाठी वेगळे कांही करावे लागत नाही. आई हेच खरे चालते-बोलते ईश्वरी स्वरुप असते. या ईश्वरी स्वरुपाला लाथाडून पंढरपुरच्या श्री विठ्ठलाचे चरण धरले तरी कांही साध्य होत नाही. पंढरीच्या विठ्ठलाला न भेटणारा पण आईची सेवा करणारा असेल तर हा पांडूरंग त्याला भेटायला येतो. अर्थात, आईची सेवा करणारा आपलीच सेवा करीत आहे, असे पांडूरंग मानतो, असे संत-महात्म्यांनी म्हटले आहे. आई-वडीलांशी नीट न वागणाऱ्याला समाजात कितीही मान असला तरी तो खऱ्या अर्थाने पूर्णत: व्यर्थ आहे. अशा मुर्खाचे तोंडसुध्दा पहायला मिळू नये, असेही संतांनी म्हटले आहे. संतांच्या वचनाप्रमाणे आई हीच गुरु, आई हाच भगवंत मानून आपण वागू या. जय जय राम कृष्ण हरी।.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. २८ ऑगस्ट २०२५ | श्री गजानन महाराज पुण्यतिथी |
| विक्रम संवत् २०८२ | शेगाव, ऋषि पंचमी |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - भाद्रपद | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. पंचमी (१७.५६) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - चित्रा (०८.४२) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - शुक्ल (१३.१७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - कौलव (अहोरात्र) | शनिवार : स. ९ ते १०.३० |




## बार्शी उपविभागीय निर्भया पोलीस पथकाची वखारिया विद्यालयास भेट

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ ऑगस्ट-**

तालुक्यातील उपळे दुमाला येथील श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित वखारिया विद्यालयास मंगळवार दि. २६ ऑगस्ट रोजी विद्यार्थी सुरक्षा अंतर्गत महिला पोलीस उपनिरीक्षक सोनम जगताप, निर्भया पोलीस पथक बार्शी, उपविभाग बार्शी यांनी भेट देवून मार्गदर्शन केले. यावेळी स्वतंत्रपणे मुलींच्या अडचणी,समस्या ऐकून घेत,रोडरोमिओपासून होणारा त्रास, महिलांवरील अन्याय अत्याचार यांचा सामना कसा करायचा, सोशल मिडियाचा वापर योग्य प्रकारे कसा करावा, गुड टच आणि बॅड टचमधील फरक कसा ओळखायचा, सायबर क्राईमचे वाढते प्रमाण याविषयी मार्गदर्शन केले. तसेच मुला-मुलींनी आपल्या आई-वडीलची मान समाजात खाली जाईल असे वर्तन करु नये, असा सल्ला ही दिला. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांनी महिला पोलीस उपनिरीक्षक सोनम जगताप यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार केला. यावेळी त्यांचे सोबत पो.हे.कॉ. बाबासाहेब घाडगे, महिला पो.कॉ. नम्रता गटकुळ, पो.कॉ.भाऊसाहेब महानोर उपस्थित होते.

# गुलाबी ई-रिक्षाचा रंग अजून फिकाच

## महिलांकडून प्रतिसाद कमी; केवळ ४४ महिला प्रशिक्षणास तयार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

शहरातील महिलांना रोजगार उपलब्ध व्हावे यासाठी गेल्या आर्थिक वर्षात गुलाबी ई-रिक्षा ही योजना राज्य सरकारने जाहीर केली. जिल्ह्याला ४७० रिक्षांचे उद्दिष्टही शासनाकडून दिले होते. यासाठी शहरातील गुलाबी रिक्षा चालवू इच्छिणारे महिला व बालविकास विभागाच्या जिल्हा कार्यालयाकडे ६९३ महिलांनी अर्ज सादर केले. मात्र अद्यापपर्यंत शहरातील रस्त्यावरून एकही गुलाबी रिक्षा धावली नाही.



राज्यातील आठ जिल्ह्यांसाठी ही योजना जाहीर करण्यात आली आहे . यात सोलापूरचाही समावेश केला आहे. ११ तालुक्यातून उद्दिष्टांपेक्षा अर्जाची संख्या अधिक आहे.

### रिक्षाची किंमत पावणेचार लाख

पंढरपुरातील १० महिलांना रिक्षा चालवण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. येथील शहरात ४४ महिलांनी प्रशिक्षणाची तयारी दाखवली. एका रिक्षाची किंमत ही ३.७३ लाख रुपये इतकी आहे. यात लाभार्थ्याला २० टक्के सवलत असून १० टक्के स्वतःचे गुंतवणूक असून उर्वरित ७० टक्के रक्कम ही बँकेकडून कर्ज स्वरूपात दिली जाणार आहे . सध्या १० टक्के रक्कम संबंधित रिक्षाची कंपनी भरणार आहे. ज्यांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख आहे. अशानांच याचा लाभ घेता येणार आहे.

> महिलांसाठी असलेली ही योजना चांगली आहे. या योजनेसाठी कार्यालयाला अर्ज प्राप्त झालेले आहेत, प्रशिक्षणासाठी प्रतिसादही गरजेची आहे. गरजू व इच्छुक महिला या कार्यालयाकडे अर्ज करू शकतात. मात्र या कार्यालयाकडे ४४ महिलांनीच प्रशिक्षणाची तयारी दाखवली आहे. या महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.
>
> **- रमेश काटकर,**
> **जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, सोलापूर**

## मारहाणीमध्ये मंद्रुपच्या वृध्दाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

गोपाळ बाबु चव्हाण यांनी घरासमोर राहणार्या रतन धारु चव्हाण वय ७५ वर्षे यांना काठीने, डोक्यात उजवे हातावर व सर्वांगावर विनाकारण मारुन गंभीर जखमी केले होते.




जखमी रतन चव्हाण यांना सोलापूरच्या शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. मंगळवारी त्यांचे उपचारादरम्यान मृत्यू झाले. याबाबत मल्हारी रतन चव्हाण वय- ४५ वर्षे राहणार नाईक नगर तांडा यांनी गोपाळ बाबु चव्हाण रा मंद्रुप (ता. द. सोलापूर) यांच्या विरुद्द मंद्रुप पोलीस ठाणेत फिर्याद दिली आहे. पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे तपास करीत आहेत. आरोपीच्या शोधासाठी पोलीसांची पथके पाठविण्यात आल्याचे पोलीसांकडून सांगण्यात आले.

## तांत्रिक चुकीमुळे अनेक शिक्षक अतिरिक्त; वेतन थांबणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. २७ ऑगस्ट-**

जिल्हांतर्गत बदली प्रक्रियेत जिल्हा परिषदेचे बरेच प्राथमिक शिक्षक तांत्रिक चुकीमुळे अतिरिक्त झाले आहेत. त्या शिक्षकांचे वेतन थांबणार आहे. मात्र, चूक शिक्षकांची नसल्याने त्यातून मार्ग काढून अतिरिक्त शिक्षकांचे वेतन करावे, अशी मागणी शिक्षक समितीने प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्याकडे केली आहे. गेल्या महिन्यांपासून राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाकडून विन्सेस सॉफ्टवेअर कंपनीद्वारे जिल्हांतर्गत प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

सन २०२४-२५ च्या संच मान्यतेनुसार अनेक शाळांतील शिक्षकांची पदे अतिरिक्त ठरलेली आहेत. मात्र बदलीसाठी पसंतीक्रम देताना याची दखल न घेता पदे दाखविण्यात आल्याने अनेक शाळांमध्ये पद रिक्त नसतानाही बदलीने पदस्थापना देण्यात आली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये अतिरिक्त शिक्षक झाले असून, त्यांच्या वेतनाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

### रिक्त ठिकाणी अतिरिक्त शिक्षक पाठवा

जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये विषय शिक्षक, पदवीधर शिक्षक तसेच सहाय्यक शिक्षकांची पदे अतिरिक्त ठरलेली आहेत. तर काही शाळांमध्ये पुरेशा प्रमाणात शिक्षक उपलब्ध नाहीत, अशी विसंगती असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी रिक्त ठिकाणी अतिरिक्त शिक्षकांची नियुक्ती करणे गरजेचे असल्याचे मत शिक्षक व्यक्त करत आहेत.

## श्री हनुमान मंदिर, वांगी येथे शिखर कळसारोहण व अडुपालखी महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

वांगी (ता. द. सोलापूर) : गावातील श्री हनुमान मंदिराचा शिखर कळसारोहण सोहळा गुरुवारी भक्तिमय वातावरणात संपन्न होणार आहे.



या वेळी श्री श्री श्री १००८ डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महा स्वामीजी (काशी) यांचे पावन सानिध्य लाभणार असून, त्यांची अडुपालखी सकाळी ९.३० ते ११.३० या वेळेत भक्तिपूर्वक काढण्यात येणार आहे. त्यानंतर श्री हनुमान मंदिराचा शिखर कळसारोहण सोहळा पार पडणार असून, भाविकांना दिव्य सानिध्य व आशीर्वादाचा लाभ मिळणार आहे.

## सद्भावना युक्त क्षमा हवी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७**

एखाद्याला क्षमा करायची असेल तर ती क्षमा सद्धावना युक्त असावी.ज्याला आपण क्षमा करतो त्या व्यक्तीबद्दल आपल्या मनात दुर्भावना नसावी.आपण देत असलेल्या क्षमेमध्ये सद्धावना,प्रेम आणि आशीर्वाद असावे असे प्रतिपादन स्वाध्याई तृप्ती जैन (बेंगलोर) यांनी केले. श्री.जैन श्वेतांबर स्थानकवासी संस्कृती रक्षक संघातर्फे पर्युषण महापर्वानिमित्त बलिदान चौक येथील जैन स्थानकात आयोजित प्रवचनात त्या बोलत होत्या.यावेळी अक्षता कोठारी (मिरजगांव), सोनल चंगेडिया ( सोनाई ) या स्वाध्यायी भगिनी उपस्थित होते.



पर्युषण महापर्व विशेष
तृप्ती जैन

यावेळी बोलताना त्या म्हणाल्या,क्षमा ही फक्त माणसांपूर्तीच नव्हे तर सर्व प्राणीमात्रांप्रती क्षमा भाव हवे. ज्या ज्या चुकीसाठी क्षमा मिळते त्या चुकांची पुनरावृत्ती होऊ नये याची काळजी घ्या.प्रत्येकाने जीवनात क्षमा भाव गंभीरतेने स्वीकारले पाहिजे. वाणी, क्रोध या गोष्टींचा योग्य वापर केला तर क्षमा मागायची वेळ येणार नाही.उच्च विचारांची कास धरल्यास जीवनात प्रगती होईल. माणूस बोलायला लवकर शिकतो. काय बोलावे यापेक्षा काय बोलू नये हे शिकणे महत्त्वाचे असते. बोलताना ७ कची काळजी घेणे महत्त्वाचे असते. बोलताना काय बोलावे, कधी बोलावे, कुठे बोलावे,, कसे बोलावे ,किती बोलावे, कोणाशी बोलावे आणि काय बोलू नये याविषयी आत्मचिंतन करावे. यावेळी संवत्सरी महापर्वात उपवास केलेल्या जैनिल शहा (३० उपवास) तसेच श्रद्धा गांधी, हेतल अवलाणी, मानसी खाबिया, लितीश सुकलेचा,किशोर गांधी, दिवीत शहा उत्सवी अवलाणी,चेतनाबेन पांचाल या तपस्वींचा सत्कार करण्यात आला. सालेचा परिवारातर्फे अन्नदान करण्यात आले.संघाचे अध्यक्ष पदम राका व गौतमचंद संचेती यांनीही विचार व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जितू बलदोटा यांनी केले.

## अष्टविनायक गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी उमाशंकर रावत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट**

मंद्रुप येथील श्री अष्टविनायक गणेश तरुण मंडळाच्या अध्यक्षपदी प्रा. उमाशंकर रावत यांची निवड करण्यात आली.पदाधिकारी - कार्याध्यक्ष .. अभिषेक बगले, उपाध्यक्ष -. राहुल उंबरजे,



चंद्राम बिराजदार, सचिव - अमोल बगले, सांस्कृतिक प्रमुख - पंचाक्षरी स्वामी, खजिनदार - विश्वनाथ सिंदखेडे, साऊंड व लाईट प्रमुख -अतुल केवटे, अविनाश बगले,पूजा नियोजन- शिवानंद केवटे, मिरवणूक प्रमुख - कपिल सिंदखेडे.

## वीरशैव विद्या संवर्धिनी मंडळातर्फे तीन दिवसीय व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ ऑगस्ट-**

समाजप्रबोधन करण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या वीरशैव विद्या संवर्धिनी मंडळ, बार्शी तर्फे यावर्षीही भव्य तीन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संचालक रावसाहेब मनगिरे यांनी दिली. यावेळी संस्थेचे सचिव शिवलींग मठपती संचालक प्रभुलिंग स्वामी, गिरीश बरिदे, विवेक देवणे, मनिष सावळे आदी उपस्थित होते.

यावेळी मनगिरे म्हणाले, व्याख्यानमालेच्या माध्यमातून वक्ता व श्रोता यांच्यामध्ये सुसंवाद साधण्याचे काम संस्था करीत आहे. यापूर्वी अनेक नामवंत वक्त्यांनी या व्याख्यानमालेत आपले विचार व्यक्त केलेले आहेत. समाजातील रसिक श्रोत्यांच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन मंडळाने नामवंत वक्ते आणि आकर्षक विषय यांची जुळवाजुळव केली आहे. या व्याख्यानमालेचा मंगळवार, दि. ९ सप्टेंबर २०२५ रोजी व्याख्यानमालेचा शुभारंभ होणार असून पहिल्या दिवसाचे वक्ते असतील संवेदनशील अभिनेता श्री. संकर्षण कऱ्हाडे. ते नाट्य आणि कवितेचा प्रवास या विषयावर आपले





विचार मांडणार आहेत.

बुधवार, दि. १० सप्टेंबर रोजी प्रसिद्ध साहित्यिक व मिस्कील वक्ते जयवंत आवटे यांचे व्याख्यान होणार आहे. ते विनोदी कथाकथन आणि बरंच काही या विषयावर रसिक श्रोत्यांचे मनोरंजन व प्रबोधन करणार आहेत. गुरुवार, दि. ११ सप्टेंबर रोजी या व्याख्यानमालेचा समारोप प्रसिद्ध अभिनेते व लेखक शरद पोंक्षे यांच्या व्याख्यानाने होणार आहे. ते भारत काल आज आणि उद्या या महत्वाच्या विषयावर आपले विचार मांडतील.

ही व्याख्यानमाला वीरशैव विद्या संवर्धिनी मंडळ, लिंगायत बोर्डिंग, बार्शी येथे दररोज सायंकाळी ६ वाजता होणार असून प्रवेश सर्वांसाठी विनामूल्य ठेवण्यात आला आहे.

कार्यक्रम वेळेत सुरु होतील, याची श्रोत्यांनी नोंद घ्यावी, तरी नागरिकांनी मोठ्या संख्येंनी उपस्थित राहण्याचे आवाहन मंडळाचे अध्यक्ष बाबासाहेब मनगिरे व संचालकांनी केले आहे.

## प्रशासक नेमण्यासाठी कोठे नव्हे तर समाज आग्रही

### मराठा समाजातील नेत्यांचे पत्रकार परिषदेत स्पष्टीकरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

मराठा समाज सेवा मंडळावर प्रशासक नेमण्याची मागणी आ. देवेंद्र कोठे यांनी नव्हे तर मराठा समाजाच्या वतीनेच आम्ही समाजाची ही संस्था वाचविण्याची विनंती आ. कोठे यांच्याकडे केली होती. माजी महापौर मनोहर सपाटे यांनी केलेले आरोप बिनबुडाचे आहेत. आ. देवेंद्र कोठे यांच्या सहकार्याने या संस्थेवर प्रशासक आला तर मराठा समाज त्यांना दुवाच देणार आहे. समाजाचा रोष वाढण्यापूर्वी सपाटे यांनी स्वतःहून मराठा समाज सेवा मंडळाच्या सदस्यत्वाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी मराठा समाजातील प्रमुख नेत्यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.

मराठा समाज सेवा मंडळावर सूडबुद्धीतून प्रशासक नेमण्याचा घाट आ. देवेंद्र कोठे हे करीत असल्याचा आरोप पत्रकार परिषदेत संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांनी काल पत्रकार परिषदेत केला होता. त्यानंतर आज मराठा समाजातील प्रमुख नेत्यांनी पत्रकार परिषदेत घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली. यावेळी माजी उपमहापौर पद्माकर काळे, दिलीप कोल्हे, पुरुषोत्तम बरडे, राजन जाधव, श्रीकांत डांगे, योगेश पवार, सुनील रसाळे, नाना मस्के यांच्यासह प्रमुख नेते व माजी कर्मचाऱ्यांनी आपली मते मांडली.

संभाजीराव शिंदे प्रशालेला घरघर लागल्यामुळे छत्रपती शिवाजी शाळा बंद करण्यासाठी प्रयत्न करत असल्याचा आरोप तर हास्यास्पद आहे. छत्रपती शिवाजी प्रशाला ही सपाटे यांच्या चुकीच्या वर्तणुकीमुळे बंद पडण्याच्या मार्गावर आहे. त्यांच्या जोखडातून ही संस्था मुक्त केली नाही तर मराठा समाजाचे कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. हे वैभव वाचविण्यासाठी आम्ही सर्वांनी पुढाकार घेतला आहे. सपाटे यांनी स्वतः मराठा समाज सेवा मंडळाचा अध्यक्ष असताना तीन किलोमीटरच्या परिघातच मराठा बहुल भागात शरदचंद्र पवार शाळेची निर्मिती करून समाजाचा विश्वासघात केला आहे, असा करत आ. देवेंद्र कोठे यांच्या सर्व समावेशक नेतृत्वामुळेच मराठा बहुल भागात समाजाने त्यांना नगरसेवक म्हणून निवडून दिले आहे, असे नेत्यांनी स्पष्ट केले आहे.

मनोहर सपाटे यांनीच राजकीय सत्तेचा गैरवापर करून या संस्थेचा ताबा घेतला आहे. संस्था स्थापन करण्यात योगदान असलेल्या जुन्या जाणत्या सभासदांना संस्थेतून बेकायदेशीरपणे काढून आपल्या मर्जीतील नातेवाईक, कर्मचारी यांना संस्थेचे सभासद केले आहे. सपाटे यांनी समाजातीलच महिला आणि इतरांवर त्यांनी अन्याय, अत्याचार केला असल्याचा आरोप यावेळी उपस्थित नेत्यांनी केला.

# बनावट दिव्यांग प्रमाणपत्र देणाऱ्या ४२ शिक्षकांची मुंबईमध्ये तपासणी

### सीईओंचा प्रमाणपत्र सादर करणाऱ्या शिक्षकांना दणका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट -**

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागातील ४२ शिक्षकांनी स्वतः किंवा कुटुंबातील सदस्य दिव्यांग असल्याचे प्रमाणपत्र सादर करून प्रशासकीय बदली, शासकीय कामांतून सवलत मिळवली आहे. त्या शिक्षकांची वैद्यकीय तपासणी करून अहवाल, प्रमाणपत्र देण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी मुंबईच्या जे. जे. रुग्णालयाकडे पत्रव्यवहार केला आहे. प्रशासनाने दिव्यंगत्वाची तपासणीचा आदेश दिल्याने बनावट प्रमाणपत्र सादर केलेल्या शिक्षक व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे धाबे दणाणले आहे.



राज्यभरात सध्या बनावट शालार्थ आयडी मधील गैरप्रकारांचे प्रकरण समोर आले आहे. त्यासोबत आता दिव्यांग असल्याचे बनावट प्रमाणपत्र सादर करून काही शिक्षकांनी बदली व इतर सवलतींचा लाभ उठवल्याचे प्रकरण समोर आले आहे. बीड, सातारा, पुणे या जिल्ह्यातील ८० पेक्षा अधिक दिव्यांग शिक्षकांची शारीरीक तपासणी करून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्याकडे तक्रारदार अनिल देशपांडे यांनी आतापर्यंत केलेल्या पाठपुरावाची माहिती दिली. त्यांवरून जंगम यांनी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयास पत्र देऊन दिव्यांग - शिक्षकांच्या प्रमाणपत्राची चौकशी करून घेतली. पण, त्यामध्ये फारसे तथ्य समोर न आल्याने तक्रारदारांनी प्रमाणपत्र ऐवजी संबंधित व्यक्तींची वैद्यकीय तपासणी करण्याबाबत पत्र दिले. त्याची त्वरीत दखल घेत जंमग यांनी मुंबईच्या जे. जे. रुग्णालयास ४२ लोकांच्या नावांची यादी पाठवून त्या व्यक्तींची वैद्यकीय तपासणी करून अहवाल देण्याचे पत्र काढले आहे. प्रमाणपत्र ऐवजी व्यक्तींची तपासणी होणार असल्यामुळे बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर केलेल्या लोकांची धावपळ सुरु झाली आहे. काहींनी लोकप्रतिनिंकडे मदतीसाठी धाव घेत प्रकरण दडपण्यासाठी विनंती सुरू केल्याचे चित्र आहे.

### बनावटगिरी करणाऱ्यांवर कारवाई करावी

दिव्यांग असल्याचे बनावट प्रमाणपत्र सादर करून खऱ्या दिव्यांग शिक्षकांवर अन्याय केला आहे. त्याबाबत दिव्यांग कर्मचारी संघटनांतर्फे सातत्याने निवेदन, पत्रव्यवहार केला आहे. पण, संबंधित यंत्रणांनी त्याची दखल घेतली नाही . बनावटगिरी करणाऱ्यांवर कारवाई करून खरे दिव्यांग लोकांना न्याय द्यावा. अशी मागणी करण्यात येत आहे.

### जिल्ह्यात ३५० पेक्षा अधिक शिक्षकांचे प्रमाणपत्र बनावट असल्याची तक्रार

सोलापूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक अनिल देशपांडे, संजय पाटील यांनी सन २०२१-२२ पासून जिल्हा परिषद शिक्षण विभाग, प्रशासनाकडे पाठपुरावा केला. पण, प्रशासनाने जुजबी कार्यवाही करून बनावट प्रमाणपत्र सादर करणाऱ्यांची पाठराखण केली. जिल्ह्यात ३५० पेक्षा अधिक जणांनी दिव्यांग असल्याचे बनावट प्रमाणपत्र सादर करून बदलीसाठी सवलत मिळवल्या आहेत. देशपांडे व पाटील यांनी राज्य शिक्षण विभागाकडे त्याबाबत पाठपुरावा केला असून त्यांच्या तक्रार अर्जाची दखल घेऊन बीड, पुणे, सातारा जिल्हा परिषदेने बनावट दिव्यांग शिक्षकांवर कारवाई केली आहे. पण, सोलापूर जिल्ह्यात मात्र आतापर्यंत पाठराखण झाली आहे.

तक्रारदार अनिल देशपांडे म्हणाले, सोलापुरात ३५० पेक्षा अधिक शिक्षकांनी स्वतः सह कुटुंबातील सदस्य दिव्यांग असल्याचे खोटे प्रमाणपत्र सादर करून बदली, शासकीय सवलतींचा लाभ उठवला आहे. बार्शी तालुक्यातील एक शिक्षक धडधाकट आहे. पण, त्याने पक्षाघात (पॅरालिसीस) झाल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. तर, एका शिक्षिकेने त्यांचा मुलगा दहावी, बारावीच्या परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेला असतानाही तो 'विशेष पाल्य' असल्याचे बनावट प्रमाणपत्र दिले आहे. बदलीमधून सवलत, निवडणूक कामांची जबाबदारी, सर्वेक्षण आदी कामांतून सुटका मिळवण्यासाठी खोटे प्रमाणपत्र मिळवले आहे. त्याविरोधात मागील तीन-चार वर्षांपासून सातत्याने संघर्ष सुरु आहे. याप्रकरणातील गांभीर्य ओळखून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी त्याची दखल घेतली आहे. ज्यांनी दुर्लक्ष करीत प्रकरण दडपडण्याचा प्रयत्न केला, त्यांच्यावर कारवाईसाठी पाठपुरावा करणार आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पात जिल्ह्यातील २९ शाळा बाधित

■ 13 शाळांसाठी जिल्हा परिषदेला ४ कोटी ६६ लाखांची नुकसानभरपाई

**तभा वृत्तसेवा,**
**वाळूज,दि२७ ऑगस्ट-**

राष्ट्रीय महामार्ग बांधणी प्रकल्पामध्ये जिल्ह्यातील बाधीत १३ शाळांच्या नुकसान भरपाईपोटी राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प संचालकाकडून जिल्हा परिषदेला ४ कोटी ६६ लाख ४३ हजार ११ रुपये नुकसान भरपाई प्राप्त झाली आहे. जिल्ह्यातील आठ तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या २९ प्राथमिक शाळा बाधित झाल्या होत्या. यापैकी सात शाळांच्या जागा राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प संचालक



यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आल्याची माहिती प्राथमिकचे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी दिली. मोहोळ तालुक्यातील पोखरापूर, माळशिरस तालुक्यातील धर्मापुरी, जाधववस्ती, सावंतवाडी (दसुर), उत्तर सोलापूर तालुक्यातील तिऱ्हे या शाळांचे मोठे नुकसान झाले आहे, तर उर्वरित शाळांचे किरकोळ व मध्यम स्वरूपाचे झाले आहे.जिल्ह्यातील सदरच्या १३ शाळांच्या नुकसान भरपाईपोटी राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प संचालकाकडून जिल्हा परिषदेला ४ कोटी ६६ लाख ४३ हजार ११ रुपये इतकी नुकसान भरपाई प्राप्त झाली आहे. नुकसान भरपाई संदर्भातील दोन शाळांचे फेर मूल्यांकन प्रलंबित आहे. तर सहा शाळांची नुकसान भरपाई राष्ट्रीय महामार्ग संचालकाकडून अद्याप प्राप्त झालेली नाही.

**बाधित शाळांची नव्याने उभारणी**

महामार्ग बांधणीत सोलापूर जिल्हा परिषदेच्या २९ बाधित शाळांच्या संदर्भातील प्रलंबित कामांचा सर्व वृत्तांत मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्याकडे सादर केला आहे. जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून राष्ट्रीय महामार्ग संचालकांना पत्र व्यवहार केला असल्याचे श्री. शेख यांनी सांगितले.

### ८ शाळा उभारणीचे काम

जिल्ह्यातील २९ बाधित शाळापैकी आठ शाळांचे काम राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून करण्यात येत आहे. यापैकी पाच शाळांचे काम पूर्ण झाले, असून तीन शाळांचे काम प्रलंबित आहे. राष्ट्रीय महामार्गात ज्या शाळांचे किरकोळ नुकसान झाले आहे. त्या शाळांची दुरुस्ती जिल्हा परिषदेकडून करण्यात महामार्ग कामात बाधित झालेली पोखरापूर येथील प्राथमिक शाळा नव्याने उभारण्यात आली आहे.

### बाधित शाळा (तालुका निहाय)

**मोहोळ** - पोखरापूर, इचगाव, इंदिरानगर बेगमपूर **मंगळवेढा** - गणेशवाडी, धरणगाव(आंधळगाव), ब्रह्मपुरी **पंढरपूर** - खांडेकर चौगुले वस्ती (ईश्वर वठार), भंडीशेगाव **सांगोला** - श्रीराम वस्ती हत्तीद, गोडसे वस्ती कमलापूर, शिंदे वस्ती वाटंबरे, दिघेवाडी, कमलापूर **उत्तर सोलापूर** - तिऱ्हे, हगलूर, बसवेश्वर नगर, देगाव **माळशिरस** - सावंतवाडी (दसूर), जाधव वस्ती धर्मपुरी, वेळापूर, पुरंदावडे, घुलेवस्ती (पानीव) **अक्कलकोट** - कर्जाळ **दक्षिण सोलापूर** - वळसंग, कन्नड मुले, वळसंग कन्नड मुली, कुंभारी- मुले, लिंबीचिंचोळी.

## महत्वाचे...



## सुनिल भोसले यांचा सेवापूर्ती निमित्त सत्कार

**वैराग दि. २७ ऑगस्ट-**

श्री नर्मदेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ मळेगाव संचलित यशवंतराव चव्हाण प्रशाला तडवळे येथील मुख्याध्यापक भोसले एस. डी. यांचा सेवापूर्ती सोहळा यशस्वीरित्या पार पडला. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून संस्थेचे जेष्ठ संचालक एल वाय पाटील होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून श्री नर्मदेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ मळेगाव संस्थेचे सहसचिव हेमंत गडसिंग, उपाध्यक्ष प्रमोद जगताप, विलास मिरगणे, के. व्ही. जाधव, ना.मा. गडसिंग, गुरुजी मित्र विद्यालय मळेगावचे प्राचार्य विकास बोराडे, तुळशीदास जाधव माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेचे प्राचार्य सतीश चव्हाण, साकत प्रशाला साकतचे मुख्याध्यापक सोमनाथ कळसाईत, जनाबाई जाधव प्रशालेचे मुख्याध्यापक विलास गडसिंग तसेच बार्शीचे पंचायत समिती विस्ताराधिकारी ज्ञानेश्वर जाधव, अनिल गुंड उपस्थित होते. याप्रसंगी प्रशालेतील विद्यार्थ्यांनी आपले मनोगते व्यक्त केली. याप्रसंगी मुख्याध्यापक सुनील भोसले यांचा सत्कार प्रशालेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व संस्थेची पदाधिकारी यांच्यासमवेत करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष प्रमोद जगताप, संस्थेचे संचालक विलास मिरगणे, हरिश्चंद्र भोसले, एस.आर. जाधव, प्राध्यापक एम.डी. जाधव, विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर जाधव व सत्कारमूर्ती सुनिल भोसले यांनी मनोगत व्यक्त केली. प्रस्ताविक जयवंत घोंगाणे यांनी केले. सूत्रसंचालन दीपक गायकवाड यांनी केले आणि आभार दादासाहेब जाधव यांनी मानले. कार्यक्रम संपल्यानंतर मुख्याध्यापक सुनील भोसले यांच्या वतीने सर्वांना स्नेहभोजन देण्यात आले.

## अध्यापिका विद्यालयामध्ये नवप्रवेशित विद्यार्थिनींचा स्वागत समारंभ

**बार्शी, दि. २७ ऑगस्ट-**

बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यापिका विद्यालयामध्ये डीएलएड प्रथम वर्षाच्या नवीन प्रवेशित विद्यार्थिनींच्या स्वागत



समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य जीवन लोखंडे तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सोमनाथ देंडे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर दिपाली भिसे, मानसी गिराम, श्रद्धा सुदामे व ऋतुजा कागदे यांनी स्वागत गीताने उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक मोनिका पाटील यांनी केले. जून २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या डीएलएड परीक्षांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार गुलाब पुष्प व भेटवस्तू देवून करण्यात आला. त्यामध्ये प्रथम वर्षामध्ये प्रथम पाच क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थिनी अनुक्रमे अर्पिता कोकाटे (९०.१० टक्के), दिव्या क्षीरसागर (८७.६०%), रिया चौधरी (८७.५० टक्के), स्वप्नाली धावारे (८६.३० टक्के) व प्रतीक्षा भोगे (८५.८० टक्के) तर द्वितीय वर्षामध्ये प्रथम पाच क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थिनी अनुक्रमे साक्षी गरड (८५.४० टक्के), प्रतीक्षा देशमुख (८४.८० टक्के), नम्रता उकिरडे (८४.३० टक्के), संजीवनी बारंगुळे (८३.७५ टक्के) व सानिका डोके (८३.३०%) यांचा समावेश होता. यावेळी अर्पिता कोकाटे, प्रतीक्षा देशमुख, सानिका डोके, प्रियंका सुरवसे, योगिता शिंदे या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. उपस्थित विद्यार्थ्यांना प्रा. सोमनाथ देंडे व प्राचार्य जीवन लोखंडे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. सुभाष माळी, प्रा. अशोक घुले, प्रा. प्रमोद मांडे व प्रा. रतिकांत हामणे उपस्थित होत्या. सूत्रसंचालन सानिका अवताडे व ऋतुजा अवताडे यांनी तर आभार अमृता पाटोळे हिने मानले.




## लहुजी शक्ती सेनेच्या फलकाचे अनावरण

**अक्कलकोट, दि. २७ ऑगस्ट-**

काझीकणबस (ता.अक्कलकोट) येथे लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीचे अवचित साधून लहुजी शक्ती सेनेच्या शाखेच्या फलकअनावरण, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष महादेव महाराज भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली वसंत देडे जिल्हा संपर्कप्रमुख, नागेश जाधव जिल्हाध्यक्ष, तालुध्यक्ष बाबाजी कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. लोकशाहीर साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त काझी कणबस येथे शाखेच्या नव पदाधिकाऱ्यांनी सामाजिक उपक्रम राबवावेत असे, आवाहन जिल्हा संपर्क प्रमुख वसंत देडे यांनी यावेळी बोलताना केले. याप्रसंगी सरपंच नारायण बंदीछोडे, उपसरपंच दत्तात्रय मुनाळे, पोलीस पाटील दीपक मंठाळे, तंटामुक्त अध्यक्ष अभयकुमार वाले, लहुजी शक्ती सेनेचे अक्कलकोट शहराध्यक्ष अमर लोखंडे, शाखाध्यक्ष शत्रुघ्न उकरंडे, उपाध्यक्ष नागराज देडे, तालुका सचिव गंगाराम देडे, सदस्य पांडुरंग देडे, भारत उकरंडे, बालाजी उकरंडे, रवी मोरे उपस्थित होते.

## युवक पँथरच्या दक्षिण सोलापूर अध्यक्षपदी विकास सोनवणे

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

युवक पँथर दक्षिण सोलापूर अध्यक्षपदी विकास सोनवणे यांची एकमताने निवड करण्यात आली. जगजीवनराम वस्ती मोदी सोलापूर



युवक पँथर प्रदेश अध्यक्ष कार्यालय याठिकाणी बैठक आयोजित करण्यात आली होती. युवक पँथरचे अध्यक्ष सुरेश अंभोरे यांच्या आदेशानुसार युवक पँथरचे प्रदेश अध्यक्ष दीपक गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली विकास सोनवणे यांची दक्षिण सोलापूर अध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी सोलापूर जिल्हा अध्यक्ष अतिश विश्वस्त, सुजित उपालकर, राहुल सोनवणे, विशाल सोनवणे, अजय कांबळे, ईश्वर कांबळे, आवि शिंदे, मंथन जाणवेकर उपस्थित होते.

## गणेशोत्सव, पैगंबर जयंतीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा पिलीव येथे रूट मार्च

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि २७ ऑगस्ट -**

गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद (पैगंबर जयंती) या दोन्ही उत्सवात सामाजिक सलोखा राखून, समाजामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी व सर्व सण उत्सव एकत्रितपणे शांततेच्या वातावरणात साजरे करण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी सोलापूर जिल्हा ग्रामीण विभागाचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी , अकलूज विभागाचे पोलीस उपाधीक्षक वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली व माळशिरस तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विकास दिंडोरे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस दूर क्षेत्रातील पिलीव मुख्य पेठेतून काठ्या व संरक्षक ढाल हाती घेउन रूट मार्च काढण्यात आला. या रूट मार्चचे नेतृत्व पोलीस निरीक्षक



विकास दिंडोरे यांनी केले. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील जानकर, महिला पोलीस निरीक्षक श्रीमती स्वाती पाटील, पोलीस हवालदार पंडित मिसाळ, हवालदार स्वरूपचंद शिंदे, धनाजी झगडे, राहुल वाघ, सोलापूर ग्रामीण विभागाचे आरसीपी पथक, माळशिरस पोलीस ठाण्याचा पोलीस स्टाफ, होमगार्ड सहभागी झाले होते. यावेळी सायरन वाजवणारी गाडी व ग्रामीण पोलीस विभागाची मोठी गाडी तैनात करण्यात आली होती. या रूटमार्च कडे नागरिक ग्रामस्थ उत्सुकतेने पाहताना दिसत होते. रूटमार्च पाहण्यासाठी नागरिकांची दुतर्फा गर्दी झाली होती.

## सी.बी. खेडगी महाविद्यालयात आजपासून बौद्धिक व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२७ ऑगस्ट**

अक्कलकोट एज्युकेशन सोसायटी संचलित सी. बी. खेडगी महाविद्यालय व अक्कलकोट महाविद्यालय सेवकांची सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने श्री गणेश उत्सवानिमित्त यंदाच्या पहिल्या वर्षी आयोजित गुरुवार दि. २८ ऑगस्ट ते दि.५ सप्टेंबर या कालावधीत दररोज सकाळी ११ वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात 'बौद्धिक व्याख्यानमाला' चे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. गुरुलिंगप्पा धबाले व सेवक पतसंस्थेचे अध्यक्ष प्रा. श्रीकांत जिड्डीमनी यांनी दिली.

व्याख्यानमालेचे पहिले पुष्प (दि.२८) प्रवचनकार तथा लायन्स क्लब ऑफ सोलापूर सेंट्रल चे अध्यक्ष प्रा. स्वामीनाथ कलशेट्टी ( सोलापूर) यांचे 'चला जगूया आनंदी जीवन' या विषयावर व्याख्यान होणार आहे. माजी नगराध्यक्षा शोभा खेडगी यांच्या हस्ते व्याख्यानमालेचे उद्घाटन होणार आहे. अध्यक्षस्थानी अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी हे भूषविणार आहेत. यावेळी उपप्राचार्या वैदेही वैद्य, पर्यवेक्षक संजय कलशेट्टी, पतसंस्थेचे उपाध्यक्ष श्रीमंत बुक्कानुरे, सचिव दत्तात्रय होटकर, संचालक मंडळ, विविध क्षेत्रातील मान्यवर, पालक वर्ग, कार्यालय प्रमुख सुहास होटकर, सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित राहणार आहेत.

दुसरे पुष्प दि. २९) महाराष्ट्र राज्य महिला पतंजली योग समिती हरिद्वारच्या वरिष्ठ प्रभारी सुधाताई अळ्ळीमोरे यांचे 'व्यक्तिमत्व विकास आणि आरोग्य' या विषयावर व्याख्यान होणार आहे. तिसरे पुष्प ( दि.३०) सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव तथा मराठी भाषा दक्षता अधिकारी डॉ. शिवाजी शिंदे यांचे 'आजच्या तरुणाईची दशा व दिशा' या विषयांवर व्याख्यान होणार आहे. यावेळी मंगरुळे प्रशालेतील सेट नेट परीक्षेचे विक्रमवीर डॉ. धानय्या कवटगीमठ उपस्थित राहणार आहेत. चौथे पुष्प (दि.३) सकाळी ११ वाजता संग्रहक विजय शिंदे यांच्या जुन्या काळातील नाणे, नोटा, पोस्ट तिकीट प्रदर्शन कार्यक्रम होणार आहे. पाचवे पुष्प गुरुवारी (दि. ४ ) सकाळी ११ वाजता विद्यार्थिनींच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून भव्य रांगोळी स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेत कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनी सहभागी होणार आहेत. सहावे पुष्प ( दि ५) चपळगावच्या ग्रामीण विद्या विकास प्रशालेतील कला शिक्षक एच. एम. वन्यालोळ्ळू यांचे 'चित्रकलेचे महत्व व फलक लेखनातून गणेश दर्शन' या विषयावर व्याख्यान होणार आहे. हे व्याख्यानमाला महाविद्यालयाच्या सभागृहात होईल. विद्यार्थी विद्यार्थिनीसह पालक व नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## प्रा. तस्नीमबानो वड्डो यांना पीएच.डी. पदवी प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

सोलापूर सोशल असोसिएशन आर्टस् ॲण्ड कॉमर्स महाविद्यालयातील उर्दू रिसर्च सेंटरची विद्यार्थिनी प्रा. तस्नीमबानो मुर्तुजा वड्डो यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातर्फे पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. प्रा. वड्डो यांनी अनीस



चिश्ती: फन और शख्सियत या विषयावर प्रा. डॉ. गौसअहमद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंध सादर केला. पीएच.डी. मौखिक परीक्षा मानवविद्याचे अधिष्ठाता प्रा. डॉ. वसंत कोरे यांच्या अध्यक्षतेखाली तर बहिस्थ परीक्षक प्रा. डॉ. सरदार पाशा यांच्या उपस्थित पार पडले. प्रास्ताविक प्रा. डॉ. गौसअहमद शेख यांनी केले. प्राचार्य प्रा. डॉ. इक्बाल तांबोळी यांनी त्यांचे अभिनंदन केले संशोधन मार्गदर्शक प्रा. डॉ. गौसअहमद शेख यांनी आभार मानले.



## नाट्यपरिषद करंडक स्पर्धेत 'खिच्याक' केंद्रात प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती, मुंबई आयोजित 'नाट्य परिषद करंडक२०२५' या एकांकिका स्पर्धेची प्राथमिक फेरी सोलापूर केंद्रावर दि.२३ व २४ ऑगस्ट रोजी संपन्न झाली. या स्पर्धेचा निकाल अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती शाखा मुंबईचे अध्यक्ष नाट्य व सीने अभिनेते प्रशांत दामले यांनी नुकताच जाहीर केला.

सोलापूर केंद्रावर झालेल्या प्राथमिक फेरीत थिएटरकर, सोलापूर या संस्थेची एकांकिका खिच्याक ही सर्वोत्कृष्ट ठरली. या एकांकिकेचे लेखन आणि दिग्दर्शन अभिजीत केंगार या नवोदित कलावंताने केले. अत्यंत कलात्मक व आगळ्यावेगळ्या विषयाने नटलेल्या या एकांकिकेचे सोलापूरकरांनीही भरभरून कौतुक केले होते. या एकांकिकेचे संगीत संयोजन गुरू जाधव यांनी केले तर अण्णा- कौस्तुभ चित्रावकर,तात्या- चिदंबर अक्कल, सुधाकर-अनुद सरदेशमुख,दिनकर-प्रतिक तांदळे, सुमन-सावनी देशपांडे, कमल-खुशी खडलोया, आप्पा-प्रज्योत म्हेत्रे,अक्का/शांता-सायली माने, गण्या-वेदांत पावटे, परश्या-अभिषेक बोल्ली,मॉडेल -प्रिया नराल, फोटोग्राफर-अभिजीत केंगार या कलावंतांनी भूमिका साकारल्या. स्पर्धेचे केंद्रप्रमुख म्हणून सुमित फुलमामडी, दिलीप कोरके,विजय साळुंखे,प्रा.अजय दासरी,तेजस्विनी कदम,विश्वनाथ आवड यांनी तर स्पर्धा समन्वयक म्हणून प्रा.जोतिबा काटे,इम्तियाज मालदार व संजय सावंत यांनी काम पाहिले. यशस्वी व गुणवंत कलावंतांचे स्पर्धा यशस्वी संपन्न करणाऱ्या सर्व कलावंतांचे अभिनंदन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद सोलापूर शाखेचे अध्यक्ष माजी आमदार प्रकाश यलगुलवार यांनी केले.

## कृषी अधिकाऱ्यांची 'दक्षिण'च्या प्रकल्पांना भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी मासिक चर्चासत्र अंतर्गत प्रक्षेत्र भेटीमध्ये दक्षिणमधील विविध गावातील प्रकल्पांना भेट दिली. पद्मश्री सुभाष पाळेकर यांचे शिष्य धर्मराव बिराजदार यांच्या द्राक्ष व तुर पिकाच्या प्लॉटला भेटून नैसर्गिक शेतीची चर्चा केली. बिराजदार यांनी निंबोळी अर्क, जीवामृत, सप्तधानांकुर, स्लरी व इतर बायो केमिकलचे मार्गदर्शन केले.

बाळासाहेब राठोड यांची १२५ एकर आंबा बागा, सामुदायिक शेततळे, कोल्ड स्टोरेजचे मार्गदर्शन घेतले. अप्पासाहेब यलगोंडे यांच्या ठिबक सिंचनावरील गोदावरी वाणाच्या प्रात्यक्षिक प्लॉटला भेट दिली. अंत्रोळी येथील झांबरे पाटील यांच्या बारा एकरातील शेततळे खोदकामास भेट दिली. विंचूरचे नऊ एकरातील शेततळे व सलग साडेतीनशे एकर



द्राक्ष बागेस भेट दत ऑटोमायझेशन सिस्टीम समजून घेतली. यावेळी झांबरे यांनी खत, पाणी व्यवस्थापन, रोग व किडीचे व्यवस्थापनची चर्चा केली. रामचंद्र आपटे यांच्या आधुनिक तंत्रज्ञानाने विकसित दूध डेअरी प्रकल्पास भेट देऊन पाहणी केली. यावेळी आपटे यांनी दुग्ध व दुग्धजन्य पदार्थ विषयी अधिकाऱ्यांच्या शंकांचे समाधान केले. या प्रक्षेत्र भेटमध्ये जिल्हा अधीक्षक कृषी अधिक्षक शुक्राचार्य भोसले, कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख लालासाहेब तांबडे, उपविभागीय कृषी अधिकारी बाळासाहेब लांडगे, रामचंद्र माळी, वाकडे, मंगरूळे, मिसळ, कोयले, तालुका कृषी अधिकारी अवधूत मुळे, किरण सावंत, मंडळ कृषी अधिकारी लादे, साबळे, साखरे, अशोक राठोड, संगम कोरे, स्वप्निल साठे, भारत फरतडे, उमेश कोळी, रमेश फरताडे, विनोद जगदाळे, सहाय्यक जाधव आदी उपस्थित होते.

## पुरस्कार देणाऱ्यांपेक्षा घेणाऱ्याची जबाबदारी वाढते : आ. सचिन कल्याणशेट्टी

■ गुरव समाज मंडळातर्फे विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २७ ऑगस्ट-**

गुरव समाज हा हिंदू घटकांतील श्रेष्ठ व महत्वाचे घटक आहे. त्यांना सर्वतोपरी सहकार्य करू. गुरव भवन, वस्तीगृह बांधकामासाठी मागेल तेवढे निधी देण्यात येईल. पुरस्कार देणाऱ्या पेक्षा घेणा-याची जबाबदारी वाढते त्यामुळे आता पुरस्कार प्राप्तकर्त्यांनी समाजासाठी योगदान वावे, असे आवाहन आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

अक्कलकोट शहर व तालुका गुरव समाज मंडळाच्या वतीने आयोजित समाजातील सामाजिक व शैक्षणि, शासकीय



क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या तब्बल १५ जणांना समाजभूषण पुरस्कार देऊन यांचा झाला सन्मान शासकीय क्षेत्रातील शारदा बिराजदार,विद्याधर गुरव, काशिनाथ फुलारी, अनिल पाटील, अशोक गुरव, दयांनंद खोबण, तुकाराम भहीजें, सामाजिक क्षेत्रातील योगेश फुलारी, सचिन व संदिप गुरव, महेश शावरी, निजगुण नागरसे, चंद्रकांत फुलारी, सचिन फुलारी, बसवराज गुरव, अजय पाटी या १५ जणांना शाल, सन्मानपत्र, ट्रॉफी, वृक्ष देऊन गौरविण्यात आले. अध्यक्षस्थानी अक्कलकोट गुरव समाज संघटना तालुका अध्यक्ष शिवानंद फुलारी हे होते.आ.कल्याणशेट्टी बोलत होते. गुरव समाज मंडळातर्फे आयोजित सत्कार कार्यक्रमात आ. सचिन कल्याणशेट्टी, डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी यांच्यासह पुरस्कारप्राप्त मान्यवरसह अमोलराजे भोसले, महेश हिंडोळे, ॲड. अनिल मंगरूळे, संजय पाटील, हभप काशिनाथ गुरव, बसलिंगप्पा खेडगी, सुधीर माळशेट्टी, मल्लिकार्जुन गुरव, महेश. शावरी, प्रथमेश इंगळे, वर्षाताई पावरकर, पीएसआय कांचन गुरव, काका पाटील, काशीनाथ मिलगेरी, राजशेखर बिराजदार, बसवराज तेलगाव, सुरेश पाटील, जनार्दन नागरसे, करुणा गुरव, रोहिणी फुलारी, मंडळ अधिकारी संतोष फुलारी आदी उपस्थित होते. या कार्यक्रासाठी उद्योगपती चंद्रकांत गुरव, काशिनाथ फुलारी, शरणप्पा फुलारी, अशोक फुलारी, रमेश फुलारी, बसवराज पाटील, उदय पाटील, प्रदीप गुरव, प्रशांत गुरव, स्वामीनाथ आवटे, श्रीधर गुरव, सी.बी गुरव, गुरव, राघवेंद्र गुरव, मुतण्णा स्वामींनाथ फुलारी, आदींनी परिश्रम घेतले. प्रस्ताविक अध्यक्ष शिवानंद फुलारी यांनी केले. सूत्रसंचालन विद्याधर गुरव यांनी केले तर आभार शिवानंद पुजारी यांनी मानले.

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## विठ्ठल-रुक्मिणी मातेस दुर्मिळ सुवर्ण अलंकार परिधान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ ऑगस्ट-**

श्री गणेश चतुर्थी निमित्त बुधवारी (दि.२७) श्री विठ्ठलास सोने मुकुट, नाम हि-याचा, कौस्तुभ मणी, दंडपेट्या जोड, हि-याचा कंगण जोड, मोत्याचा तुरा, मोत्याची कंठी, शिरपेच, मत्स्य जोड, तोडे जोड, तुळशीची माळ, जवेची माठ तसेच श्री रूक्मिणी मातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड तोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, कंबरपट्टा आदी पारंपारिक, दुर्मिळ अलंकार परिधान करण्यात आले होते.







## महत्त्वाचे



### ठोकळ प्रशालेत गणरायाची प्रतिष्ठापना

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय गणेशोत्सव मंडळ यांच्या वतीने श्री गणरायाची मिरवणूक काढून प्रतिष्ठापना करण्यात आली. प्रारंभी शाळेतील गणेशोत्सव मंडळाच्या गणपतीचे डॉ. प्रकाश ढगे, सह. आयुक्त ॲनिमल हजबंडरी यांच्या हस्ते विधिवत पूजा करून प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी तिऱ्हे येथील डॉ. सचिन सुरवसे, डॉ. आनंद रुपनर, प्राचार्य डी. डी. गाजरे यांची प्रमुख उपस्थिती होती. विधिवत पूजा, मंत्रोच्चार श्री चपळगावकर गुरुजी यांनी केली. आरती नंतर मान्यवरांचा प्राचार्य श्री. डी. डी. गाजरे यांच्या हस्ते स्वागत सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास प्रा. डी. डी. गाजरे यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन पी. एच. चव्हाण यांनी केले. श्रींच्या प्रतिष्ठापनाबद्दल संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती निर्मला ठोकळ, संस्थेचे अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, शिल्पा ठोकळ व सचिव भिकाजी गाजरे यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या.



### जिजामाता शाळेत श्रींची प्रतिष्ठापना उत्साहात

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

जिजामाता प्राथमिक शाळा व जिजामाता प्रशाला येथे श्रींची प्रतिष्ठापना उत्साहात करण्यात आली. याप्रसंगी जिजामाता प्रशालेचे मुख्याध्यापक उदय जाधव, जिजामाता प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलू उपस्थित होते. दोन्ही मुख्याध्यापकांच्या हस्ते श्रींची आरती करण्यात आली व त्यानंतर विद्यार्थ्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.



### भंडारकवठेत 'नो डीजे, नो डॉल्बी' ची शपथ

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

भंडारकवठे येथील गणेश मंडळांच्या पदाधिकारी यांची बैठक ग्रामपंचायत कार्यालय येथे घेण्यात आली. यावेळी गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांनी नो डॉल्बी नो डीजेची शपथ दिली. यावेळी सरपंच भीमाशंकर बबलेश्वर, पोलीस पाटील अशोक मुकाणे, सागर चव्हाण, तंटामुक्ती अध्यक्ष बसवराज मुकाणे, ग्रामपंचायत सदस्य सोमनिंग कमळे यांच्यासह ९० पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी सपोनि पवार म्हणाले कि , गणेशोत्सव भक्ती, उत्साह आणि सांस्कृतिक परंपरेचे प्रतीक मानला जातो. गेल्या काही वर्षांपासून डॉल्बी आणि डीजे संस्कृतीमुळे गावागावांत गोंधळ, प्रदूषण आणि वाद निर्माण होऊ लागले आहेत. सर्वत्र डॉल्बीविरोधात जनतेची लाट तयार झाली आहे. डॉल्बीमुळे होणारे दुष्परीणाम टाळण्यासाठी भंडारकवठे गावांमध्ये मिरवणूक दरम्यान डॉल्बी लावल्यास डॉल्बी जप्त करून संबंधितांवर गुन्हा दाखल केला जाईल. मिरवणुका पारंपारिक वाद्यांच्या गजरात काढण्यात यावेत, असे आवाहन सपोनि पवार यांनी केले.



**सोलापूर : श्री गणपती मुर्ती घरी आणताना सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी, परिवारातील सदस्य राघव राठी, रामानुज राठी, मंथन राठी, केशव राठी, मिसका राठी, मास्टर सत्व्य राठी आदी.**

# अकलूज व परिसरात उत्साहात गणेशोत्सवास प्रारंभ

### १०४ नोंदणीकृत गणेश मंडळे

### पाच गावांत एक गाव एक गणपती

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २७ ऑगस्ट-**

अकलूज व परीसरातील अबालवृद्ध गणेश भक्तांनी लाडक्या गणरायाचे आनंदाने स्वागत करुन धार्मिक विधीवत प्रतिष्ठापना केली सकाळी गणेश मूर्ती घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली अकलूज येथील विजय चौक, मारुती मंदिर, शंकर नगर, संग्राम नगर शिवशंकर बाजार

येथे असंख्य गणेश मूर्ती विक्रीसाठी आले आहेत छोट्या मोठ्या गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी मूर्ती घेतल्यानंतर सर्व भक्तांच्या आनंदाला उधाण आले. तेथुन श्री ची मूर्ती वाजत गाज वाजत गाजत मिरवणुकीने आणुन श्रीची विधीत प्रतिष्ठापना केली. अकलुज पोलीस ठाण्यातंर्गत ३२ गावे येतात १०४ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची नोंदणी झाली असुन बिजवडी, गिरझणी, उंबरे वेळापुर, गणेशगांव, कोंढारपट्टा या ५ गावात एक गाव एक गणपती संकल्पना राबवली आहे. खा. धैर्यशील मोहिते-पाटील व त्यांच्या पत्नी शितलदेवी मोहिते-पाटील यांनी घरी वाड्यावर श्रींची पूजा व आरती करुन श्री ची प्रतिष्ठापना केली. यावेळी परीवारातील सर्व सदस्य उपस्थित होते

श्री. विजय गणेशोत्सव मंडळ ट्रस्टच्या श्रीची मिरवणुक भजनी मंडळाच्या साथीने काढण्यात येवुन प्रतिष्ठापना आ. रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी विजय गणेश मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, विश्वतेजसिंह मोहिते पाटील, शिवंशिका मोहिते पाटील, सहकार महर्षी कारखान्याचे व्हा. चेअरमन शंकरराव माने देशमुख, सर्व संचालक, गणेश मंडळाचे ट्रस्टी नितीन खराडे, चंद्रकांत कुंभार, श्रीकांत राऊत, राजेंद्र काकडे, वसुंधरा देवडीकर, तुकाराम जाधव शेख, कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले, खाते प्रमुख अधिकारी, कामगार उपस्थित होते. गणेशोत्सवाचे हे ५७ वे वर्ष आहे. अकलूजच्या गांधी चौकात लोकमान्य गणेशोत्सव मंडळाच्या श्री ची पुजा व प्रतिष्ठापना संचालक अजित राखले यांच्या हस्ते करण्यात आली.

यावेळी मंडळाचे संस्थापकअध्यक्ष किशोरसिंह माने पाटील, सर्व संचालक मंडळ उपस्थित होते या मंडळाचे हे ४३ वर्ष आहे वर्षभर विविध समाज उपयोगी कार्य हे मंडळ करीत असतेविजय चौकातील शिवरत्न गणेशोत्सव मंडळाच्या श्री चे पुजन व माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात येवून प्रतिष्ठापना करण्यात या मंडळाचे हे ४५ वी वर्षा आहे. सिध्दीविनायक गणेशोत्सव मंडळ, महात्मा फुले गणेश उत्सव मंडळ भाजी मंडई, बुरजा गणेशोत्सव मंडळ खाटीक गल्ली, जय मल्हार गणेशोत्सव मंडळ महर्षी कॉलनी, नवभारत गणेशोत्सव मंडळ आझाद चौक, शिवापुर पेठ गणेशोत्सव मंडळ, सदुभाऊ गणेशोत्सव मंडळ, छत्रपती गणेशोत्सव मंडळ गोळीबार चौक या मंडळाचे हे ५१ वर्षाचे असून स्वर्गीय प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी स्थापन केले आहे. डॉक्टर धवल सिंह मोहिते पाटील या मंडळाचे अध्यक्ष आहेत, नृसिंह गणेशोत्सव मंडळासह अकलूज परीसरातील सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाच्या श्री गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात येवुन गणेशोत्सवाला दिमाखात प्रारंभ करण्यात आला. यावर्षी श्री गणेशाच्या मूर्तीची किंमत वाढली आहे. सजावटीचेही मोठ्या प्रमाणावर साहित्य बाजारपेठेत उपलब्ध आहेत तरीही खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी दिसून येत होती.





**अकलूज येथे गणेश चतुर्थीनिमित्त गणरायाचे उत्साहात स्वागत करण्यात आले. तर दुसऱ्या छायाचित्रात श्रींची पूजा करताना आमदार रणजीतसिंह मोहिते-पाटील.**

## माळशिरसमध्ये सहा गावांत एक गाव एक गणपतीची स्थापना



माळशिरस तालुक्यात ३१७ सार्वजनिक गणेश मंडळांनी गणपतीची स्थापना केली आहे. त्यामध्ये तांबेवाडी गणेशगाव गिरझणी उंबरे वेळापूर बिजवडी व कोंढारपट्टा या सहा गावांत एक गाव एक गणपती उपक्रम राबवण्यात आला आहे सार्वजनिक गणेश मंडळांनी डीजे चा वापर करू नये, असे आवाहन पोलीस उपविभागीय अधिकारी संतोष वाळके यांनी केले आहे

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. २७ ऑगस्ट-**

माळशिरस शहर व परिसरात आज गणेश चतुर्थीच्या दिवशी गणपतीचे उत्साहात आगमन झाले घरोघरी नागरिकांनी गणपतीची उत्साहात प्रतिष्ठापना केली तर दिवसभर अनेक मंडळांनी गणपतीची प्रतिष्ठापना केली .गणपती खरेदीसाठी व गणपतीच्या सजावटीच्या लागणाऱ्या वस्तूच्या खरेदीसाठी बस स्थानक परिसरात नागरिकांनी गर्दी केली होती.

यंदा गणेश मूर्ती पंधरा ते वीस टक्क्यांनी महाग झाल्या असल्याने शंभर रुपयांपासून पाच हजारा पर्यंतच्या मूर्ती विक्रीसाठी आल्या होत्या. माळशिरस शहरासह परिसरातील व्यापाऱ्यांनी मूर्ती विक्रीसाठी आणल्या होत्या. त्याचबरोबर गणपती सजावटीसाठी लागणाऱ्या साहित्याची अनेक दुकाने शहरात आली होती. शहरातील पुणे-पंढरपूर महामार्गावर गणपती व सजावटीचे साहित्य खरेदीसाठी नागरिकांची गर्दी दिसत होती. त्यामध्ये बाल गणेश भक्तांची गर्दी चांगलीच जाणवत होती. अनेक मंडळांनी वाजत गाजत गणरायाची मिरवणूक काढत आपल्या मंडळाच्या ठिकाणी गणपतीची स्थापना केली. माळशिरस शहरातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालय तसेच सर्व शाळांमध्ये आज गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली. बस स्थानका समोर वाहतुकीची कोंडी होऊ नये, यासाठी पोलीस तैनात ठेवण्यात आले होते.



### अहिल्याबाई प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात गणरायाचे आगमन

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

अहिल्याबाई प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात वाजतगाजत, ढोल-ताशांच्या गजरात व लेझीमच्या तालावर गणरायाची मिरवणूक काढून जल्लोषात आगमन झाले. गणपती बाप्पाच्या प्रतिमेची प्राणप्रतिष्ठापना प्राचार्य इस्माईल शेख यांच्या हस्ते विधीवत पार पडली. कार्यक्रमाचे आयोजन शाळा व महाविद्यालय व्यवस्थापन समितीच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. शिस्तबद्ध मिरवणूक, पारंपरिक ढोल-ताशांचा नाद, लेझीमची रंगत आणि विद्यार्थ्यांचा उत्साह यामुळे संपूर्ण वातावरण मंगलमय झाले. याप्रसंगी प्राचार्य शेख यांनी मनोगत व्यक्त केले.

# पंढरपुरात घरगुती अन् सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना

**शहरात १४५ तर तालुक्यामध्ये १४७ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ ऑगस्ट-**

गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाच्या गजरात शहरातील घरगुती गणपतीं बरोबरच विविध सार्वजनिक मंडळाच्या गणेशाच्या मुर्तींची बुधवारी (ता.२७) मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. येथील विठ्ठल मंदिरात देखील पारंपारिक पध्दतीने विधीवत गणेशमुर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.उत्सवाचा राजा समजल्या जाणाऱ्या या गणेशोत्सवास आजपासून सुरुवात झालेली आहे. त्यामुळे येथुन पुढे दहा दिवस शहरात सार्वजनिक मंडळांकडून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

दरम्यान गणेशचतुर्थी निमित्त बुधवारी (ता.२७) सकाळ पासूनच येथील भादुले चौक,स्टेशन रस्ता,इंदिरागांधी भाजी मंडई, नाथ चौक परिसर या भागातून गणेशाच्यामुर्ती खरेदीसाठी नागरिकांची तसेच शहरातील विविध सार्वजनिक मंडळाच्या कार्यकर्त्यांची गर्दी झालेली होती. घरगुती गणेशमुर्तींची प्रतिष्ठापना दुपार पर्यंत करण्यात येत होती. त्यामुळे बाजारपेठेत घरातील वडीलधाऱ्या मंडळीं बरोबर बच्चेकंपनी देखील उत्साहात गणेशमुर्तीची खरेदी करताना दिसत होते.

शहरातील अनेक सार्वजनिक मंडळांनी यावर्षी खास पेण, पुणे, नगर, सांगली आणि कोल्हापूर येथून गणेशाच्या मुर्ती आणलेल्या दिसत आहेत. गणेशनगर, मनिषानगर, इसबावी, कोर्टी रस्ता, लिंकरोड, टाकळीरोड, नागालँड चौक, सांगोला रस्ता, वाखरी रस्ता, मंगळवेढा रस्ता आदी उपनगरातील बऱ्याच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या कार्यकर्त्यांनी सायंकाळी पाच, सहा वाजेपर्यंत गणेशमुर्तीची वाजतगाजत मिरवणूक काढून आपआपल्या मंडळामध्ये गणेशमुर्तीची विधीवत पुजा करुन प्राणप्रतिष्ठापना करीत होते. मात्र शहरातील मोठ्या सार्वजनिक मंडळाच्या गणेशमुर्तींची रात्री नऊ, साडेनऊ वाजेपर्यंत प्रतिष्ठापना करण्यात येत असल्याचे दिसत होते.

घरगुती तसेच सार्वजनिक मंडळातील गणेशाच्या मुर्तीच्या आरासासाठी लागणारे विविध प्रकारचे आरास साहित्यांचे स्टॉल्स देखील बाजारपेठेत दिसत होते. या स्टॉल्स वरुन खरेदीसाठी नागरिकांनी गर्दी केली होती. वेगवेगळ्या रंगाच्या रांगोळ्या, गणेशासाठी खास तयार करण्यात आलेले फेटे, मखर, देवघर, गणेशाच्या पाठीमागे लावण्यासाठी लागणारी रंगीबेरंगी चक्रे, लाईटच्या माळा, रंगीबेरंगी दिवे, सोन्या,चांदीसारखे टोप, मोत्यांच्या माळा अशा विविध आकर्षक वस्तुंची रेलचेल दिसत होती.

दरम्यान येथील भादुलेचौक परिसरात मोठ्या प्रमाणावर गणेशमुर्तीच्या विक्रीसाठी स्टॉल्स लावण्यात आलेले होते. या ठिकाणी नागरिकांची सकाळ पासून गणेशमुर्ती खरेदीसाठी गर्दी झाली होती. या भागात वाहतूकीची कोंडी होवू नये यासाठी शहर पोलिसांनी मोठ्या वाहनांना या परिसरात बंदी केली होती. त्यामुळे या भागात कुठेही फारशी वाहतूकीची कोंडी झाली नाही. या वर्षी शहरात १४५ तर तालुक्यामध्ये १४७ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाकडून गणपती बाप्पांची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली आहे. तालुक्यातील नळी, शंकरनगर, भैरवनाथवाडी, बिटरगाव, पुळूजवाडी, आणि अजोती या सहा गावांमधून एक गाव एक गणपतीचे आयोजन करण्यात आले आहे.



### मोठा पोलिस बंदोबस्त तैनात

येथील उपविभागीय पोलिस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक टी.वाय.मुजावर हे तालुक्यात तर शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी शहरात सर्वत्र शांततेमध्ये आणि भक्तीमय वातावरणात, डॉल्बी मुक्त आणि इको फ्रेंडली गणेशोत्सव साजरा व्हावा, यासाठी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात केलेला आहे.



### श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२७ ऑगस्ट-**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर येथे गणेशोत्सवाच्या निमित्ताने बुधवारी (ता.२७) गणेश मूर्तीची स्थापना करण्यात आली. या मंगलप्रसंगी समितीचे लेखाधिकारी मुकेश अनेचा यांच्या हस्ते गणेश पूजन व स्थापना विधी संपन्न झाला.

गणेश पूजनावेळी समितीचे प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत, तसेच मंदिरे समितीचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पारंपरिक पद्धतीने मंत्रोच्चार व धार्मिक वातावरणात हा सोहळा पार पडला. दरम्यान गणेशोत्सव काळात श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने विविध कार्यक्रम आयोजन करण्यात येणार असून, भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.